मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५
पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५
नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८
वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

पालघर-ठाणे | रायगड - रत्नागिरी | RNI No.: MAHAMAR/2014/62313 | शुक्रवार, २७ जून २०२५ | वर्ष: ११ | अंक: २१८ | पाने-८ | किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## सरकारने हिंदीचा हट्ट सोडावा - शरद पवार

मुंबई , दि. २६ प्रतिनिधी

देशातील बहुतांशी वर्ग हिंदी बोलतो. पण, मुले विशिष्ट वयात हिंदी किती आत्मसात करतील याचा विचार व्हावा. त्यामुळे प्राथमिक शिक्षणात हिंदी सक्तीचे नकोच. सरकारनेही पाचवीपर्यंतचा हिंदीचा हट्ट सोडावा, असा सल्ला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिला. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांसाठी आघाडीची बैठक ३० जूनला होईल. त्यामध्ये एकत्रित निर्णय घेऊ, अशी माहितीही त्यांनी दिली. हिंदी विरोधापेक्षा प्रथम मी एआय (कृत्रिम बुध्दीमत्ता) पाहतो. कारण, एआयचे फायदे आहेत. सामान्य कुटुंबातील मुलांनाही एआयचे शिक्षण मिळावं याची काळजी घेतली पाहिजे. एआयचा शेती, उद्योग, शिक्षणातही फायदे आहेत. त्यामुळे केंद्र शासनानेही एआयला मान्यता दिलीय. राज्य शासनानेही ५०० कोटींची तरतूद केली आहे, असे ते म्हणाले.

## अग्रलेख – खरीखरी

### आता महामंडळे

काल महायुतीच्या समन्वय समितीची बैठक झाली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी करण्यासाठी कार्यकर्त्यांना कामाला लावायचे आहे. ते अत्यंत गरजेचे असते. सरकार कोणाचेही असले. तरी सर्वांना आमदार खासदार करता येत नाही. मग काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना कसे सांभाळावे. हा प्रश्न असतोच. कार्यकर्त्यांना सांभाळून ठेवण्यासाठी महामंडळावरती नियुक्ती करणे. हा मार्ग सर्व सत्ताधारी स्वीकारत असतात. ज्याप्रमाणे मंत्रिमंडळात मलाईदार मंत्रालये किंवा मलाईदार खाती मिळवण्यासाठी मंत्र्यांची धडपड असते. त्याचप्रमाणे प्रतिष्ठेची किंवा मलाईदार महामंडळे मिळावी आणि त्यावर नियुक्ती व्हावी. यासाठी नेत्यांसाठी काम करणारे कार्यकर्ते तन, मन आणि धनाने धडपडत असतात. पक्षात कायम चैतन्य रहावे. म्हणून अशा कार्यकर्त्यांना सदैव आशेवर झुलवत ठेवणे गरजेचे असते. कालच्या सत्ताधारी असलेल्या तीनही पक्षांच्या समन्वय समितीच्या बैठकीत महामंडळावर नियुक्तीचे निकष ठरविल्याचे बोलले जात आहे. यात साधारणपणे दीड ते दोन महिन्याचा कालावधी निघून जाईल. त्यानंतर नियुक्त्या होतील, असे सांगितले जाईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजय मिळवणे. सत्ताधारी पक्षासाठी अत्यावश्यक असते. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे तळागाळात काम करणाऱ्या म्हणजेच मतदारांपर्यंत पोहोचणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी हक्काचे सत्ता केंद्र असते. कार्यकर्त्यांना अशा प्रकारे चॉकलेट वाटपाची परंपरा सर्वच पक्ष पार पाडत असतात. राज्यात अनेक महामंडळे असली. तरी आता या महामंडळात पूर्वीसारखी सत्ता मिळत नाही. सध्या अनेक महामंडळे केवळ नावालाच अस्तित्वामध्ये आहेत. जनतेच्या भल्यासाठी विशेष असे उपक्रम त्यातून राबवले जात नाहीत. अशी टीका नेहमीच केली जाते. पण तरीही महामंडळाचे आकर्षण कायम आहे. सर्वच कार्यकर्त्यांना सरकारमध्ये महत्त्वाची पदे देता येत नाहीत. हे खरे असले तरी अजूनही कार्यकर्त्यांना महामंडळाचे आकर्षण असतेच. महाराष्ट्र राज्याच्या वीज मंडळावर नियुक्तीसाठी पूर्वी चांगलाच वशिला लावला जात असे. आता वीज बोर्ड संपून महाजनको, महावितरण आणि महाट्रान्स्को अशा कंपन्या अस्तित्वात आल्या आहेत. त्यामुळे या कंपन्यांवर अनेकांचा डोळा असतो. पूर्वी मरापम म्हणजेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळावर अनेकांचा बारीक डोळा असे. हे एसटी महामंडळ दिवसेंदिवस आता खड्डयात जात आहे. तिकिट विक्रीतून जेमतेम कर्मचाऱ्यांचा पगार निघेतो आणि एसटी प्रवासात ज्या सवलती दिल्या जातात. त्या पैशातून जेमतेम खर्च भागतो. तोटा काही कमी होत नाही. अशी अनेक महामंडळे अस्तित्वात असली. तरी त्यांची नावेही अनेकांना माहीत नाहीत. पण तरीही कोणत्या ना कोणत्या महामंडळावर नियुक्ती व्हावी. त्यासाठी अनेक कार्यकर्ते उत्साहाने वाट बघत असतात. युतीतील तिन्ही पक्षांना सांभाळून घेण्यासाठी आता नेतृत्वाचा चांगलाच कस लागणार आहे. नेहमीप्रमाणे मुख्यमंत्री यामध्ये स्वतः लक्ष घालून या सर्व कार्यकर्त्यांची नाराजी दूर करतील. किंबहुना करावी अशी अनेकांची इच्छा असावी. या महामंडळांवर ज्यांची ज्यांची वर्णी लागेल. त्यांना त्यांना आमच्या शुभेच्छा. आतापासून सर्वच महामंडळेच्छुक कार्यकर्त्यांनी जोरदारपणे कामाला लागावे आणि आपले हक्काचे पद मिळवावे. यासाठी त्यांना वेगळे काही करण्याची गरज नाही. प्रत्येक कार्यकर्त्याचे गॉडफादर आहेत. ते आपले वर्चस्व दाखवून कर्तव्य पार पाडत असतात. कारण या कार्यकर्त्यांच्या बळावरच त्यांना पुढील निवडणूक जिंकायची आहे. राजकारणातील हा प्रयोग अनेक वर्षापासून सातत्याने सुरू आहे. पुढेही तो तसाच सुरू राहील यात शंका नाही. आता फक्त मुहूर्ताची वाट पाहायची. तो मुहूर्त निघाला रे निघाला की, कार्यकर्त्यांचे चांगभले होईल, यात अजिबात शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# मोर्चाने सरकारला धडकी भरेल : राज ठाकरे

मुंबई, दि. २६ प्रतिनिधी



शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. शिवतीर्थ निवासस्थानी झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी हिंदी सक्तीबाबत राज ठाकरे यांच्या भूमिकेबाबत माहिती दिली. यानंतर राज ठाकरे यांनीही हिंदी सक्तीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली.

राज्यात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा ही तिसरी पर्यायी भाषा म्हणून शिकवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मनसेसह विविध राजकीय पक्ष व संघटनांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे. मुद्द्यावर मनसेने आक्रमक भूमिका घेत थेट रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे. राज्यभरातून या निर्णयाविरोधात संताप व्यक्त होत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व संबंधित तज्ज्ञांशी सल्लामसलत करूनच पुढील निर्णय घ्यावेत, अशा सूचना दिल्या होत्या.यावर आज शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आज राज ठाकरेंची भेट घेत त्रिभाषा सूत्रीवरती सरकारची भूमिका मांडली. दोघांमध्ये सुमारे अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ चर्चा झाली.

भुसेंबरोबर झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सरकारची हिंदीबाबतची भूमिका मान्य नाही. हिंदी सक्तीला आमचा पूर्णपणे विरोध आहे. हिंदी किंवा अन्य कोणत्याही भाषेची सक्ती आम्ही होवू देणार नाही, असे स्पष्ट करत ५ जुलै रोजी गिरगाव चौपाटीपासून आम्ही मोर्चा काढणार आहोत. या मोर्चाचे नेतृत्व मराठी माणूस करेल. या मोार्चात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले.

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी हिंदी सक्तीबाबत माझ्याशी चर्चा केली. यावेळी राष्ट्रीय शिक्षण धोरणात अन्य पर्यायही आहेत. यामध्ये मुलांना भाषेऐवजी पोहणे हाही पर्याय आहे, असे मी सांगितले. महाराष्ट्रात हिंदीच काय अन्य कोणत्याही भाषेची सक्ती चालणार नाही, असे स्पष्ट करत ६ जुलै रोजीच्या मोर्चाने सरकारला धडकी भरेल. कारण ६ जुलैला आषाढी एकादशी आहे. त्यादिवशी आम्ही मोर्चा काढणार आहोत, आता हिंदी सक्ती नको, याबाबत पांडुरंगाने सरकारला सुबुद्धी द्यावी, असा टोलाही यावेळी राज ठाकरे यांनी लगावला.

### मनसेचा मोर्चा ६ ऐवजी ५ जुलै रोजी

राज्यात पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या निर्णयाविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. सरकारच्या या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवण्यासाठी, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी येत्या ६ जुलै रोजी एका भव्य मोर्चाची घोषणा केली होती. मात्र, आता त्यांच्या या मोर्च्याचा दिवस बदलला आहे. एक निवेदन जारी करून त्यांनी याची माहिती दिली आहे. मनसेचा हा मोर्चा आधी ६ जुलै रोजी होणार होता. मात्र, आता त्याच्या तारखेत बदल झाला असून, ६ ऐवजी ५ जुलै रोजी म्हणजेच शनिवारी हा मोर्चा काढण्यात येणार आहे. त्रिभाषा सूत्र विरोधी समन्वय समितीने ७ जुलै रोजी मोर्चाचं आयोजन केले आहे. उद्धव ठाकरेंनी ७ जुलैच्या मोर्चाला पाठिंबा देण्याचे जाहीर केले. त्यानंतर मनसेची पत्रकार परिषद झाली. त्यात मनसेने ६ जुलै रोजी मोर्चाचं आयोजन केले. मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते यांच्यासह त्रिभाषा समन्वय समितीकडून दोन ऐवजी एकच मोर्चा काढण्यासंदर्भात चर्चा सुरू असल्याची सूत्रांची माहिती आहे.

## हिंदी सक्ती लादू देणार नाही - उद्धव ठाकरे

मुंबई, दि. २६ प्रतिनिधी

महाराष्ट्रात हिंदी भाषा सक्तीविरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. कुणी, कितीही प्रयत्न केला तरी महाराष्ट्रात हिंदी सक्ती लादू देणार नाही, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी दिला. त्यांनी पत्रकार परिषद घेत, सर्वांनी पक्षभेद विसरुन हिंदी सक्तीविरोधातील आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. जोपर्यंत ही सक्ती मागे घेतली जात नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.



हिंदी सगळ्यांना येते. आम्ही इतर भाषेचा द्वेष करत नाही. पण हिंदी सक्ती लादून घेणार नाही. आमचा हिंदी भाषेला विरोध नाही. पण हिंदी सक्तीला विरोध आहे. हे दळण कशासाठी दळताय? असा सवाल त्यांनी राज्य सरकारला केला.

हिंदी चित्रपटाला आम्ही जोपासले. हिंदीचे वावडे आम्हाला नाही. भाषिक आणीबाणीचा विरोध आम्ही करणार आहे. आम्ही कोणतीच सक्ती स्वीकारणार नाही. हिंदी सगळ्यांना येत असते. भय्या जोशी मुक्ताफळे उधळून गेले. आपला देश संघराज्य आहे. प्रत्येक भाषेनुसार प्रांत झाला आहे. मुख्यमंत्री असताना, मीच मराठी भाषा सक्तीची केली. मराठीच दालन करण्याचे मी ठरवले होते. तीदेखील जागा आता ही लोक बिल्डरच्या घशात घालत आहे. आता अजितदादा गप्प का आहेत? असेही उद्धव ठाकरे यांनी नमूद केले.

राज्यात कारण नसताना हिंदीची सक्ती केली जात आहे. भाजपचे हे एकाधिकारशाहीचे छुपे धोरण आहे. शिवसेना संपवून त्यांना हुकूमशाही आणायची आहे, असा आरोपही त्यांनी केला. सरकारच्या या सक्तीविरोधात मराठी माणसांनी, तमाम भाषा प्रेमी, विशेषतः मराठी चित्रपट सृष्टीतील लोकांनी एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले.

उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांच्यासोबत मराठी अभ्यास क्रेंद्राचे प्रमुख दीपक पवार उपस्थित होते. हिंदी सक्तीविरोधात आंदोलनाची दिशा ठरविण्यापूर्वी २९ जून रोजी एक जाहीर सभा आयोजित करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### हिंदी सक्ती नाही- मुख्यमंत्री

दरम्यान, उद्धव ठाकरेंच्या पत्रकार परिषदेपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, पत्रकारांशी बोलताना हिंदी सक्तीबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. हिंदी सक्ती नाही. मराठी सक्ती आहे. हिंदी ऑप्शनल आहे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. उद्धव ठाकरेंनी टोमणे मारण्यापेक्षा मराठी भाषेत जास्त अलंकार आहे. त्याचा वापर करावा, असा टोलाही लगावला.

## चीनमध्ये राजनाथ सिंहांची कठोर भूमिका

क्विंगदाओ (चीन), दि. २६ वृत्तसंस्था

चीनमधील क्विंगदाओ येथे झालेल्या शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या संरक्षण मंत्र्यांच्या बैठकीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज संयुक्त निवेदनावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. वृत्तानुसार, या निवेदनात पहलगाममधील भयानक दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख टाळण्यात आला होता, परंतु बलुचिस्तानमधील दहशतवादी कारवायांचा थेट उल्लेख होता. पाकिस्तानने वारंवार भारतावर बलुचिस्तानच्या स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा देण्याचा आरोप केला आहे, जो आरोप भारताने पूर्णपणे नाकारला आहे.

शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या बैठकीत एप्रिलमध्ये झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राजनाथ सिंह यांनी दहशतवादाविरोधात कडक संदेश दिला आणि पाकिस्तानवर जोरदार टीका केली.

## ३० जून ते १८ जुलैपर्यंत अधिवेशन

मुंबई, दि. २६ प्रतिनिधी

यंदाच्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा कार्यक्रम आणि वेळापत्रक निश्चित झाले आहेत. त्यानुसार २० जून ते १८ जुलै या काळात पावसाळी अधिवेशन होणार आहे. यंदाच्या पावसाळी अधिवेशनात शाळांमध्ये पहिलीपासूनची हिंदी भाषेची सक्ती , शक्तीपीठ महामार्ग आणि कर्जमाफीच्या मुद्द्यावरुन विरोधकांकडून महायुती सरकारला घेरले जाण्याची शक्यता आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे २९ जूनला प्रथेप्रमाणे चहापानाचा कार्यक्रम होईल. या कार्यक्रमाला विरोधक उपस्थिती लावणार की नाही, हे बघावे लागेल. या अधिवेशनाच्या निमित्ताने विरोधी पक्षातील आमदार विविध समस्या आणि मुद्द्यांवरुन सरकारला घेरण्याचा प्रयत्न करतील. या सगळयाला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि महायुती सरकारचे मंत्री कशाप्रकारे सामोरे जाणार, हे बघावे लागेल.

विधिमंडळाचे अधिवेशन हे विविध समस्या आणि मुद्द्यांवरुन सरकारला घेरण्याची उत्तम संधी असते. मंत्र्यांना विरोधकांनी सभागृहात विचारलेल्या प्रश्न आणि समस्यांबाबत अधिकृतरित्या सर्वांसमोर भूमिका मांडावी लागते. त्यामुळे विरोधक सत्ताधाऱ्यांना अडचणीचे प्रश्न विचारु शकतात. सध्या राज्यात शाळांमधील पहिली भाषेपासूनच हिंदी विषयाची सक्ती आणि शक्तीपीठ महामार्गाचा मुद्दा गाजत आहे. त्यामुळे अधिवेशनात याचे पडसाद उमटू शकतात. कोल्हापूर, धाराशिव, बीड आणि अन्य भागात शक्तीपीठ महामार्गाच्या सर्वेक्षणाला विरोध केला जात आहे. भूसंपादनाच्या प्रक्रियेसाठी जाणाऱ्या सराकारी अधिकाऱ्यांना स्थानिक शेतकऱ्यांकडून हुसकावले जात आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळी अधिवेशनात विरोधक या मुद्द्यावरुन सरकारला घेरु शकतात.

## 'ब्लॅक बॉक्स'मधून डेटा रिकव्हर करण्यात यश



अहमदाबाद, दि. २६ वृत्तसंस्था

अहमदाबादमध्ये १२ जून २०२५ रोजी एअर इंडियाचे विमान कोसळले. या भीषण अपघातानंतर सापडलेल्या ब्लॅक बॉक्समधून २४ जून रोजी क्रॅश प्रोटेक्शन मॉड्यूल (CPM) सुरक्षितपणे काढण्यात आले. बुधवार, २५ जून रोजी ब्लॅक बॉक्समधील डेटा डाउनलोड करण्यात आला आहे, अशी माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने आज एका निवेदनाच्या माध्यमातून दिली आहे.

१२ जून रोजी अहमदाबादहून लंडनला जाणार्या एअर इंडियाचे बोईंग ७८७-८ विमान एका वैद्यकीय वसतिगृह संकुलात कोसळले. विमानातील २४१ प्रवाशांसह २७० हून अधिक लोक या दुर्घटनेत मृत्युमुखी पडले होते. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे की, "१२ जून रोजी अहमदाबादमध्ये कोसळलेल्या एअर इंडिया ड्रीमलाइनरच्या . "(ब्लॅक बॉक्स) डेटाचे विश्लेषण सुरू आहे. अपघाताला कारणीभूत असलेल्या घटनांचा क्रम पुन्हा तयार करणे आणि विमान वाहतूक सुरक्षा वाढविण्यासाठी आणि भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी हे महत्त्वपूर्ण आहे."

२४ जूनच्या डीजी एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोच्या नेतृत्वाखालील पथकाने आणि (अमेरिकेच्या) राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळाच्या (एनटीएसबी) तांत्रिक सदस्यांनी डेटा काढण्याची प्रक्रिया सुरू केली. समोरील ब्लॅक बॉक्समधून 'क्रॅश प्रोटेक्शन मॉड्यूल' (सीपीएम) सुरक्षितपणे मिळवण्यात आला. तसेच २५ जून रोजी मेमरी मॉड्यूल यशस्वीरित्या ॲक्सेस करण्यात आला आणि त्याचा डेटा एएआयबी लॅबमध्ये डाउनलोड करण्यात आला आहे. आता विमान अपघाताची कारणे शोधण्यासाठी ही माहिती.महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## शक्तीपीठ महामार्गामुळे आर्थिक दिवाळखोरीची वाट - सुप्रिया सुळेंचा घणाघात

मुंबई, दि. २६ प्रतिनिधी

शेतकऱ्यांचा विरोध, अर्थ खात्याची नोट, आणि हजारो कोटींचा कर्जभार – शक्तीपीठ महामार्गावरून राज्य सरकार अडचणीत येण्याची शक्यता व्यक्त करत, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज राज्य सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडलं. त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की, "रस्ता झाला तरी महाराष्ट्राचा आर्थिक रस्ता बंद होईल!"



मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना सुळे म्हणाल्या, “शेतकरी विचारत आहेत की आधीच रस्ते असताना, आणखी एक द्रुतगती महामार्ग कशासाठी? त्यांच्या जमिनी जाणार, पर्यावरणाचा ऱ्हास होणार आणि उपयोग मात्र अपुरा! मग हे कुणासाठी?” असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

सुळे यांनी जोरदार आरोप करत सांगितलं की, "वित्त विभागाने या प्रकल्पासाठी ६.७५ टक्के व्याजदराने २० हजार कोटी रुपये कर्ज घेण्यास विरोध नोंदवला आहे." शाळा, आरोग्य, जल जीवन मिशन यासाठी पैसे उपलब्ध नाहीत, पण असा भव्य रस्ता मात्र बांधला जातोय यावर सुळे यांनी राज्य सरकारला "प्राधान्य क्रमाचा विसर" पडल्याचा टोला लगावला.

राज्याच्या एकूण अर्थसंकल्पातील २२ टक्के रक्कम जर केवळ व्याज भरण्यात खर्च होत असेल, तर इतर विकासकामांचे काय? असा ज्वलंत सवाल त्यांनी उपस्थित केला. "हे सरकार भविष्यात महाराष्ट्राला कर्जाच्या दलदलीत लोटणार आहे," असा इशाराही त्यांनी दिला.

सुप्रिया सुळे यांनी समृद्धी महामार्गावरील खड्डेप्रकरणी तत्काळ एसआयटी नेमण्याची मागणी केली. "नितीन गडकरी ब्लॅकलिस्टेड कंपन्यांवर कारवाई करतात, मग राज्य सरकार कशासाठी गप्प आहे?" असा प्रश्न विचारत त्यांनी अटल सेतूवरील खड्ड्यांकडेही लक्ष वेधले आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.

### "वाढवण प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी स्वतः लक्ष घालावे"

वाढवण बंदर प्रकरणावरही सुळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना उद्देशून थेट बोललं – "लोकांचं म्हणणं ऐका, आणि त्यांच्या भावना समजून घ्या. प्रकल्पांचे राजकारण करताना सामान्य जनतेचा आवाज दुर्लक्षित होऊ नये."

"हे सरकार केवळ घोषणांचा आणि उद्घाटनांचा आभासी राजमार्ग तयार करत आहे, पण जमिनीवरची जनतेची तगमग, कर्जबाजारीपणा आणि विकासाच्या अडचणी विसरत आहे," असा थेट आरोप सुळे यांनी करत सरकारला आळंकारिक नव्हे, तर वास्तवाशी जुळणारं धोरण स्वीकारण्याचं आवाहन केलं. राजकीय वर्तुळात आता प्रश्न आहे रस्त्याचे राजकारण सरकारला कुठल्या वळणावर नेईल?

## सेवक आहोत, मालक नव्हे!

## लोणीकरांच्या वादग्रस्त वक्तव्यावर मुख्यमंत्री नाराज

मुंबई, दि. २६ प्रतिनिधी

भाजपचे माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांविषयी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून राज्यात मोठा संताप व्यक्त होत आहे. जनतेचा रोष आणि विरोधकांची टीका यामुळे अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर प्रतिक्रिया देत लोणीकरांच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली आहे. “आम्ही जनतेचे सेवक आहोत, मालक बनण्याचा कोणालाही अधिकार नाही,” अशा स्पष्ट शब्दांत मुख्यमंत्री फडणवीसांनी लोणीकरांना समज देण्याचे जाहीरपणे सांगितले.



मुख्यमंत्री म्हणाले, “पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतःला देशाचे प्रधानसेवक म्हणतात. आम्ही सर्व जण जनतेचे सेवक आहोत. त्यामुळे कोणीही असा भासही करू नये की आपण जनतेचे मालक आहोत. बबनराव लोणीकरांचं वक्तव्य हे पूर्णतः अयोग्य, अतिरेक आणि चुकीचं आहे. जरी त्यांनी काही विशिष्ट लोकांना उद्देशून ते बोलले असले तरी, अशा प्रकारचं विधान करणं पक्षशिस्तीच्या विरोधात आहे.”

लोणीकर यांनी शेतकऱ्यांचे कपडे, मोबाईल, चपला “आमच्या पैशातून चालतात” असे विधान केल्याने राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. अनेक विरोधी पक्षांनी हे वक्तव्य ‘शेतकऱ्यांचा अपमान’ ठरवत भाजपवर हल्लाबोल केला होता. यावर मुख्यमंत्री फडणवीसांनी तात्काळ हस्तक्षेप करत लोणीकरांना समज देण्याचा निर्णय घेतला.

विरोधकांनी या मुद्द्यावरून सरकारला घेरलं असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रवक्ते, आणि काँग्रेस नेत्यांनी हे विधान "सत्तेची मस्ती आणि शेतकऱ्यांचा अपमान" ठरवलं आहे.

राजकीय पंडितांच्या मते, महापालिका, नगरपालिका, जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अशा वक्तव्यांनी सरकारची प्रतिमा डागाळण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळेच मुख्यमंत्र्यांनी वेळीच हस्तक्षेप करून स्वतःची भूमिका स्पष्ट केली आहे. आता हे पाहणं महत्त्वाचं ठरेल की भाजप पक्षशिस्तीच्या अनुषंगाने लोणीकरांवर पुढील कारवाई करतो की फक्त समज देऊन प्रकरणावर पडदा टाकतो.

## 'ड्रॅगन ग्रेस'यानाचे यशस्वी डॉकिंग

आयएसएस, दि. २६ वृत्तसंस्था

ॲक्सीऑम स्पेस आणि स्पेस एक्स यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या ॲक्सीऑम-४ खासगी अंतराळ मोहिमेचे यान ‘ड्रॅगन ग्रेस’ आज भारतीय वेळेनुसार बुधवारी दुपारी १२ वाजता केनेडी स्पेस सेंटर येथून यशस्वीरीत्या प्रक्षेपित करण्यात आले.

या मोहिमेत भारतीय वायुसेनेचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला हे मिशन पायलट म्हणून सहभागी असून त्यांच्यासोबत मिशन कमांडर पेगी व्हिटसन, आणि मिशन स्पेशालिस्ट स्लावॉस उझनान्स्की-व्हिस्न्येव्स्की व टिबोर कपु हे देखील आहेत. दरम्यान, शुभांशु शुक्ला हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले भारतीय ठरले आहेत. भारताच्या दृष्टीने ही ऐतिहासिक कामगिरी आहे. या यानाने भारतीय वेळेनुसार दुपारी ४.३० वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या हारमॉनी मॉड्यूलच्या स्पेस फेसिंग पोर्टवर यशस्वीरित्या डॉकिंग केले. यानाचे पहिला सॉफ्ट कॉन्टॅक्ट भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ४.०१वाजता झाला.




डॉकिंग ही एक तांत्रिक प्रक्रिया आहे ज्यामध्ये एखाद्या अंतराळयानाला अंतराळ स्थानकाशी जोडले जाते. याचा अर्थ असा की आता अंतराळवीर सुरक्षितपणे स्थानकात प्रवेश करू शकतात आणि तेथील संसाधनांचा उपयोग करू शकतात. डॉकिंग झाल्यानंतर शुभांशु शुक्ला आणि त्यांच्या टीमचा खरा मिशन सुरू झाला आहे.

### आयएसएसवर होतील ६० पेक्षा जास्त वैज्ञानिक प्रयोग

ॲक्सिओम-४ या मोहिमेंतर्गत शुभांशु आणि त्यांची टीम सुमारे १४ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर राहणार आहे. या कालावधीत ते सुमारे ६० वैज्ञानिक प्रयोग करतील. या प्रयोगांमध्ये मायक्रोग्रॅव्हिटी, मानवी शरीरावर अंतराळाचा परिणाम, नवीन औषधांची चाचणी आणि पर्यावरणाशी संबंधित संशोधन यांचा समावेश आहे. हा आतापर्यंतचा ॲक्सिओम मिशनमधील सर्वाधिक वैज्ञानिक दृष्टिकोनातून समृद्ध असा मिशन मानला जात आहे.

शुभांशु शुक्ला यांची ही अंतराळयात्रा भारतासाठी एक नवी सुरुवात आहे. इस्रोने (इसरो) आधीच चांद्रयान आणि गगनयानसारख्या मोहिमांद्वारे देशाला गौरव प्राप्त करून दिला आहे, आणि आता खाजगी तसेच आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळे भारतीय वैज्ञानिक आणि अंतराळयात्र्यांना जागतिक स्तरावर संधी मिळत आहे. शुभांशु यांची ही झेप पुढच्या पिढ्यांसाठी प्रेरणादायक ठरेल.





## राज्य उत्पादन शुल्क मंत्री श्री गणेश नाईक यांच्या हस्ते जगातील पहिली टागो व्हॅन एकात्मिक कचरा प्रणालीचे उद्घाटन



नवी मुंबई: विष्णुदास नाट्यगृह आवारात आज महाराष्ट्राचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री श्री गणेश नाईक यांच्या हस्ते tow -go कचरा व्यवस्थापन प्रणालीचे उद्घाटन केले याप्रसंगी गणेश नाईक यांच्या सोबत माजी खासदार संजय नाईक यांनी या कचरा प्रणालीला एक उत्कृष्ट आणि कचराविरहित लोकांच्या आरोग्यासाठी एक लाभदायी ठरेल. यामुळे दुर्गंधी येणार नाही आणि लोकांच्या आरोग्याला धोका नाही सेच या लास ग्रीन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री साई कल्याणी यांनी सांगितले कि वेस्ट मॅनेजमेंट साठी हा सगळा कचरा डम्पिंग ग्राउंड वर जातो त्यामुळे लोकांना श्वसनाचा व इतर रोगांना सामना करावा लागतो. आम्हाला ही संकल्पना आमचे प्रसाद वाणी टेक्निकल डायरेक्टर यांनी सुचवली आणि आम्ही ही व्हॅन व प्रत्येक बनविन्याचे ठरविले, शहरांमध्ये जागा नसल्यामुळे डम्पिंग्ला विरोध लोकांचा विरोध असतो त्यामुळे ही आम्हाला संकल्पना सुचली. जगामध्ये ही टेक्नॉलॉजी फक्त आमच्याकडेच आहे तेथील कचरा उचलून व्हॅनमध्ये टाकेल कचरा डिस्पोजल होईल आणि त्याच्यानंतर त्याच्यापासून खत निर्माण होईल आणि त्याचा कुठेही लोकांच्या जीवनावर परिणाम होणार नाही अशीही व्हॅन आम्ही तयार केली आहे यासाठी नवी मुंबई महानगरपालिका तसेच बीएमसी आणि इतर महानगरपालिकेसाठी या व्हॅन मागणी मोठ्या प्रमाणात आहे. आम्ही त्यानुसार प्रत्येक महानगरपालिका याबाबत माहिती देऊन तेथील कचऱ्याचे निवारण करण्यासाठी आम्ही पुढाकार घेणार आहोत आणि लोकांचे आरोग्य चा प्रश्न यामुळे मार्गी. या प्रणालीमुळे जो कचरा आहे त्याचा खत तयार होईल या व्हॅन ची स्टोरेज कॅपॅसिटी 6.5 टाईम आहे. या क्षेत्रात कंपनी पंधरा वर्षे झालेली आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात 25 महानगरपालिका आहेत, दीड वर्षांपूर्वी ठाणा मुन्सिपल कॉर्पोरेशनने दोन मशीन घेतले, ठाणे मुन्सिपल कॉर्पोरेशनने दोन वर्ष ती चालून बघितले लोकांकडून या प्रणालीला चांगला चांगला रिस्पॉन्स आलेला आहे सहा हजार लोक घरात ओला सुखा कचरा वेगळा करतात आमची गाडी जाते ओला व सुखा कचरा घेते हे बघून मुनिसिपल कॉर्पोरेशनने अजून 22 गाड्यांचा टेंडर या कंपनीला दिलेला आहे मीरा-भाईंदर मध्ये 22 गाड्या संपूर्ण महाराष्ट्रात 70 गाड्याची आत्ता मागणी आहे. नवी मुंबई महानगरपालिका नाईक साहेबांनी इनेशेटीव्ह घेऊन अगर ही गाड्याची रिपोर्ट चांगला आला तर नवी मुंबई महानगरपालिका गाड्या खरेदी करू शकते एका नगरसेवकाकडे वार्डाचे वीस हजार घर असतील या फक्त सहा सात गाड्या त्यांच्या वार्डमध्ये फिरल्या तर हा कचरा डम्पिंग ग्राउंड मध्ये न जाता या गाड्यांमध्ये रिसायकलिंग होऊन त्याच्या खत तयार होईल. 27 टाईपचे आम्ही सेग्रीकेशन करून रिसायकिंगला पाठवतो. इंडस्ट्रीमध्ये त्याला रोमॅटेरियल म्हणून वापरतात यासाठी आम्ही तीन गाड्या घेतल्या आणि स्क्रॅप केल्या. यावरती सहा वर्ष काम केलं जगात मध्ये असा कोणी विचारच केला नाही की अशी प्रणाली आपल्या भारतात बनेल. या एका गाडीची किंमत दीड करोड पर्यंत आहे यासाठी तुम्हाला जागा लागत नाही डम्पिंग ग्राउंड लागत नाही म्हणून ही प्रणाली आपल्या भारतात फार लवकरच मोठ्या प्रमाणातआणि आमचं सगळ्यांशी बोलणं चालू आहे. या व्हॅन मध्ये ओला व सुका कचरा वेगळा करते. याची एका दिवसात दीड टन कचरा हा सायकलिंग होतो यातून मिथेन बाहेर येत नाही त्यामुळे ओझोनचा थर तयार होणार नाही व त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंग होणार नाही याच्यामध्ये लिचेड तयार होत नाही महत्वाच आहे आमच ठाण्यामध्ये 22 गाड्या मीरा-भाईंदर मध्ये दहा गाड्या आणि इतर महानगरपालिकेत 70 गाड्या ऑर्डर मिळण्याची अपेक्षा आहे असे मॅनेजिंग डायरेक्टर श्री साई कल्याणी यांनी सांगितले या कंपनीचे डायरेक्टर विजय वोझाला तसेच हेड ऑपरेशन गुलाब जाधव उपस्थित होते

## अशोक ल.लोखंडे विद्यालयात उत्कृष्ट वाचक पुरस्कार प्रदान



मुरुड जंजिरा: पिटसई येथील अशोक ल.लोखंडे विद्यालयात आज राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या 151 व्या जयंती निमित्ताने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या शाळेचे चेअरमन खेळू वाजे,मुख्याध्यापक अरुण खुळपे,ज्येष्ठ शिक्षक अकिल मुलाणी सर यांच्या शुभ हस्ते शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पमाला व फुले अर्पण करून उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची माहिती विशद करण्यात आली.या जयंतीचे औचित्य साधून सन 2024/ 25 या शैक्षणिक वर्षात शाळेच्या ग्रंथालयातून ज्या विद्यार्थ्याने जास्तीत जास्त पुस्तके वाचली त्या शालेय विद्यार्थ्यांना उत्कृष्ट वाचक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.उत्कृष्ट वाचक पुरस्कार मध्ये प्रथम क्रमांक प्रविणा पांडुरंग अडखळे हिला प्राप्त झाला आहे.या विद्यार्थिनिस रोख रक्कम 500 रुपये व प्रमाणपत्र देण्यात आले.तर द्वितीय क्रमांक साची संतोष बामणे हिला प्राप्त झाला असून रोख रक्कम 300 रुपये व प्रमाणपत्र,तृतीय क्रमांक चेतना नरेश सावरटकर हिला प्राप्त झाला असून रोख रक्कम 200 रुपये व प्रमाणपत्र तर उत्तेजनार्थ बक्षीस धीरज मंगेश अडखळे याला रोख रक्कम 200 व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले आहे.सर्व यशस्वी व पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेचे चेअरमन खेळू वाजे,मुख्याध्यापक अरुण खुळपे,ज्येष्ठ शिक्षक अकिल मुलाणी सर यांच्या हस्ते करण्यात आला.सदरील कार्यक्रमास सुप्रिया रेडीज, संजय ठमके, सुखदेव सर्जे भागिनाथ बांगर, नीलम गोळे, संदीप इंगावले, रेखा रेडीज, सुनील तेलंगे, एकनाथ कोळी,वरिष्ठ लिपीक दीपक भोसले आदी मान्यवर यांच्यासह असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## मागासवर्गीय मुलांचे मुलींचे शासकीय वस्तीग्रह महाड येथे राजश्री शाहू महाराज जयंती साजरी



महाड: सामाजिक न्याय विभाग मार्फत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रायगड अलिबाग यांचे अधिनस्त महाड तालुक्यातील मागासवर्गीय मुलांचे मुलींचे शासकीय वस्तीग्रह येथे सामाजिक न्याय दिनानिमित्त छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली मुलांचे शासकीय वस्तीग्रह महाड येथे श्री अनिल मोरे गृहपाल यांच्या समवेत पत्रकार निलेश लोखंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना अभिवादन केले तसेच मुलांची शासकीय वस्तीगृह महाड येथे श्रीमती कुंदागिरी प्रभारी गृहपाल यांनी राजश्री शाहू महाराज प्रतिमेस पूजन करून अभिवादन करण्यात आले दोन्ही वस्तीगृहात भारताचे संविधान प्रास्ताविक उपस्थित समवेत वाचन करण्यात आले मुलांचे शासकीय वस्तीग्रह महाड ते मुलांचे शासकीय व स्त्री व महाड पर्यंत रॅली काढण्यात आली सदर रॅलीत मुले मुली समवेत कर्मचारी व बाह्य स्त्रोत कर्मचारी आणि सहभाग घेतला मुलांची शासकीय वस्तीगृह महाड येथे राजश्री छत्रपती शाहूमारे यांच्या जीवनपटावर आधारित विद्यार्थ्यांच्या भाषण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती सदर स्पर्धेत कुमार पवन रामा बी टेक कुमारी भगवती थोरात टी वाय बी टेक कुमार धम्मदीप गोडबोले बी टेक यांना प्रथम दुतीय तृतीय क्रमांक देण्यात आले असून कुमार प्रणव गायकवाड टी वाय बी ए यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले सदर सामाजिक न्याय दिनानिमित्त कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्त्री अनिल मोरे गृहपाल मुलांचे शासकीय वस्तीग्रह महाड यांनी केले पत्रकार निलेश लोखंडे प्रमुख उपस्थितीत यांनी राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्यकालात ते सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी सदैव दक्ष होते दुर्बल घटकांसाठी त्यांनी विशेष सहानुभूती होती असे सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाची सांगता श्रीमती कुंदा गिरी गृहपाल यांनी करून उपस्थितांचे आभार मानले

## रायगड जिल्ह्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांची बोनस ची प्रतिक्षा संपली

मुरुड जंजिरा: शासनाने अलिकडे भाताला हमी भाव जाहीर केल्यामुळे सावकार वा व्यापाऱ्यांच्या पिळवणूकी पासुन शेतकऱ्यांना मुक्तता होण्यास मदत झाली आहे . एकेकाळी रायगड जिल्हयाची ओळख भाताचे कोठार म्हणून होत असली तरी मध्यंतरी भात लागवड क्षेत्रात लक्षणीय घट झाली होती .

शेतकरी वर्ग पुन्हा पारंपारिक भात शेतीकडे वळविण्या साठी शासन शेतकऱ्यांना प्रोत्साहित करीत आहे . त्यासाठी विविध कृषी योजना कार्यान्वीत होत असुन भात पिकाला हमीभाव तसेच बोनस अदा केल्यामुळे शेतकरी वर्गात आनंद व्यक्त होत आहे . राज्य शासनाच्या पणन विभागातर्फे भात शेती उत्पादकांना गेल्या 7/8 वर्षा पासुन भाताला हमी भाव दिला जात असुन भात खरेदी केंद्रांची तालुका निहाय नियुक्ती करण्यात आली आहे . रायगड जिल्ह्यात35 हुन अधिक भात खरेदी केंद्र कार्यरत असुन भात विक्रीची रक्कम आता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केली जात आहे .भातावर दरवर्षी एप्रिल अखेर मिळणाऱ्या

बोनस ची रक्कम यंदा जून मध्ये अदा करण्यात आल्याने शेतकरी वर्गाला पेरणी च्या तोंडावर थोडा फार आर्थिक हातभार लागणार आहे . गतवर्षी शासनाने भात उत्पादकांना प्रती हेक्टरी 20 हजार बोनस दिला होता . सदर लाभ दोन हेक्टर पर्यंत सिमित होता . अर्थात बोनस ची एप्रिल2024 अखेर दिली होती . यंदा बोनस ची रक्कम दोन महिने रखडली होती . यंदा राज्य सरकारने भात उतपादकांना प्रती हेक्टरी 20 हजार रुपये बोनस जाहीर करून टप्प्याटप्प्याने सदर रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग होत आहे . भाताला मिळणारा हमी भाव अधिक बोनस ची रक्कम शाश्वत स्वरूपात मिळाल्याने जिल्हयातील पडीक भात शेती क्षेत्र लागवडीखाली येईल असा विश्वास व्यक्त होत आहे . राज्य शासनाने भाताला प्रति क्विंटल रु.2383 इतका हमीभाव दिला असुन महायुती शासनाने आश्वासन दिल्या प्रमाणे बोनस ही दिल्यामुळे शेतकरी वर्ग आनंदी झाल्याचे तिरुपती बालाजी भात गिरणी चे मालक दिनेश मिनमिणे यांनी सांगितले . या संदर्भात रायगड जिल्हा पणन अधिकारी के . बी . ताटे यांना विचारले असता ते म्हणाले की, रायगड जिल्हयात 31824 भात उत्पादक असुन राज्य सरकारने प्रति हेक्टरी 20 हजार रुपये बोनस जाहिर केला आहे . बोनस म्हणून जिल्हयात 76 कोटी 97 लाख रुपये मंजुर करण्यात आले आहेत पैकी 27058 खातेदारांना 53 कोटी 65 लाख 20 हजार रुपये वितरित करण्यात आले आहेत . बँक खाते पडताळणी अंती उर्वरित बोनस रक्कम ही वाटप करण्यात येईल अशी माहिती ताटे यांनी दिली .

## पनवेल महानगरपालिकेच्यावतीने प्लास्टिक विरोधी कारवाई;125 किलो साठा जप्त, 10 हजाराचा दंड वसूल



पनवेल: आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार पनवेल महानगरपालिकेच्या खारघर प्रभागांमध्ये दिनांक 25 जून रोजी प्लास्टिक विरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये सुमारे 125 किलो सिंगल युज प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. तसेच सुमारे 10 हजाराचा दंड वसूल करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात बुधवारी मोठी प्लास्टिक विरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये प्रभाग समिती 'अ ' खारघर प्रभागामध्ये सेक्टर 35 नीलकंठ स्वीट, रावेची मार्ट असे विविध स्वीट मार्ट,बाजार अशा अनेक ठिकाणी प्लास्टिक पिशवी (सिंगल युझ प्लास्टिक) बंदी कारवाई करण्यात आली. दरम्यान या कारवाई अंतर्गत सुमारे रुपये 10 हजार रूपयांचा दंड आकारण्यात आला. यावेळी सुमारे 125 किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. या कारवाईवेळी स्वच्छता निरीक्षक कुणाल गायकवाड, अतुल मोहोकर, संदिप भोईर अतिक्रमण पथकाचे शिवदास पाटील, व कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महापालिका क्षेत्रात एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकवरती प्रतिबंध करण्यात आला आहे. उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार प्रतिबंधित प्लास्टिकची साठवणूक, विक्री आणि वापर करणाऱ्यांवर महानगरपालिकेच्यावतीने कठोर कारवाई करण्यात येत आहे. प्लास्टिक विरोधी कारवाईमध्ये पहिला गुन्हा नोंद झाल्यावर ५ हजार रुपये, दुसरा गुन्हा नोंद झाल्यावर १० हजार रुपये तिसरा गुन्हा नोंद झाल्यावर २५ हजार रूपये दंड आणि तीन महिन्याचा कारावास असणार आहे.तरी महापालिका कार्यक्षेत्रातील विविध आस्थापनांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर करू नये असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त बालसभांचे आयोजन



पनवेल: पनवेल महानगरपालिका आयुक्त श्री.मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आज गुरूवार 26 जून रोजी राजर्षी शाहू महाराज जयंती अर्थात सामाजिक न्याय दिवसाचे औचित्य साधून मनपाच्या सर्व शाळांमध्ये बालसभेचे आयोजन करण्यात आले.

या निमित्त सर्व शाळांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.फ त्यानंतर सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना शिक्षकांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनाचा परीचय माहितीच्या रूपाने,गोष्टींच्या रूपाने सांगण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये होणा-या सर्व उपक्रमांचे नियोजन केल्याप्रमाणे या बालसभांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी देण्याबाबतच्या सुचना शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी दिलेल्या होत्या.त्यानूसार या बाल सभेचे नियोजन करण्यात आले.

नविन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच बालसभेचे पालिकेच्या सर्व शाळांनी यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल श्री.चव्हाण यांनी सर्व विद्यार्थी,शिक्षक व मुख्याध्यापक यांचे कौतुक केले.

## स्थानिक पत्रकारांच्या बातमीची दखल



माणगाव : पन्हळघर बुद्रुक — स्थानिक पत्रकारांनी उचललेल्या गंभीर समस्या लक्षात घेऊन सरपंच संतोष वातेरे यांनी तत्परतेने कारवाईसाठी पुढाकार घेतला आहे. पन्हळघर बुद्रुक येथील मुख्य नदीवरील रामदास पूल आणि छोटा साकव या दोन पूलांची अत्यंत खराब झालेली स्थिती यामुळे येथील रहिवासी, विद्यार्थी आणि वाहतूक करणाऱ्या नागरिकांना गंभीर संकट निर्माण झाले होते. या संदर्भातील स्थानिक पत्रकार श्री राम भोस्तेकर यांनी या समस्येवर आधारित बातमी प्रसिद्ध केली आणि गावकऱ्यांच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना व्हाव्यात, अशी मागणी केली. सरपंच संतोष वातेरे यांनी या बातमीची गांभीर्याने दखल घेत संबंधित बांधकाम विभागाच्या उपअभियंता साहेबांना पुन्हा एकदा स्मरणपत्र देऊन पूलांच्या दुर्दशेची माहिती दिली आहे. त्यांनी या समस्येचा वेळीच निराकरण व्हावे आणि वाहनचालन तसेच चालणे-सायकलने ये-जा करणाऱ्या सर्वांसाठी पूल सुरक्षित व्हावा, यासाठी तातडीने योग्य ती कारवाई करावी, असा आग्रह ठेवला आहे. उपअभियंता साहेबांनी त्वरित स्थलावर येऊन योग्य कारवाई करण्याचे आश्वासन सरपंचांच्या समोर दिले असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे येणाऱ्या दिवसांत या पूलांची दुरुस्ती होऊन गावकऱ्यांना होणारा त्रास लवकरच कमी होणार असल्याची आशा व्यक्त केली जात आहे. याशिवाय, मनोज मोरे यांच्या घराजवळ मोरी मोडकळी झाल्याच्या घटनेचा संदर्भ देत स्थानिक पत्रकार राम भोस्तेकर यांनी तातडीने याबाबत बातमी प्रसिद्ध केली होती. यामुळे संबंधित विभागांकडे त्वरित लक्ष गेला आणि योग्य उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. सरपंच संतोष वातेरे यांनी या दोन्ही प्रसंगी स्थानिक हितासाठी पाठपुरावा करत कामकाजाची खात्री करून दिली आहे. पन्हळघर बुद्रुकमधील या सार्वजनिक सुरक्षिततेच्या मुद्द्यांवर स्थानिक पत्रकारांच्या जबाबदार वृत्तांकनामुळे योग्य प्रतिसाद मिळाला आहे, ज्यामुळे लोकांच्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी दूर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या घटनांनी ग्रामस्थांमध्ये माध्यमांच्या कार्याची भूमिका आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर विश्वास वाढविला आहे.

## कॉम्रेड भूषण पाटील यांचे उपोषण स्थगित



उरण: नवी मुंबईतील येऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत केंद्र सरकारने उद्घाटनापूर्वी अधिसूचना काढण्याच्या मागणीसाठी कामगार नेते आणि जेएनपीटीचे माजी विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील यांनी २४ जून २०२५ रोजी जासई येथील हुतात्मा स्मारकाजवळ सुरू केलेलं आमरण उपोषण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सरबत घेत स्थगित केले.प्रकल्पग्रास्तांचे झुंझार लोकनेते दि.बा. पाटील यांचा १२ वा स्मृतिदिन मंगळवारी होता. याच दिवशी कॉम्रेड भूषण पाटील यांनी उपोषणाला सुवात केली होती. तसेच दुपारच्या दरम्यान उपोषण स्थळी जाहीर श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला विमानतळ नामकरण समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, वाय. टी. देशमुख, दि.बा.पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, दीपक म्हात्रे, जे. डी. तांडेल, कामगार नेते सुरेश पाटील, जितेंद्र म्हात्रे, सीमा घरत, नंदराज मुंगाजी, सुधाकर पाटील, नीलेश पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.यावेळी दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील यांनी नामकरणाबाबतची सद्यस्थिती स्पष्ट केली आणि विमानतळाच्या उद्घाटनाच्या दिवशीच नामकरण होईल, असा विश्वास व्यक्त केला. नामकरण समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही अतुल पाटील यांच्या भूमिकेला दुजोरा दिला. उपस्थित सर्व मान्यवरांनी केलेल्या विनंतीनुसार, कॉम्रेड भूषण पाटील यांनी आपलं उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

## अपात्रता, निकष डावलून राजकीय संबंधांमुळे महापालिकामध्ये बेकायदा बढती



उरण: नवी मुंबई महापालिका शहर अभियंता शिरीष गंगाधरराव आरदवाड यांना स्पष्ट अपात्रता असूनही कायदेशीर तरतुदी आणि सरकारी आदेशांचे, सेवा नियमांचे उल्लंघन करुन बेकायदेशीर बढती देण्यात आली असून, शिरीष आरदवाड यांना महापालिका मध्ये देण्यात आलेल्या सर्व नियुक्त्या, पदोन्नती आणि अतिरिक्त शुल्काची सखोल, निष्पक्ष आणि कालबध्द चौकशी तात्काळ सुरु करा, विहित सेवा नियम आणि सरकारी अधिसूचनांनुसार त्यांची पात्रता पडताळून पहा, अशी मागणी करणारी नोटीस नवी मुंबई मधील सामाजिक कार्यकर्ते संतोष श्रीमंत जाधव यांनी वकिलामार्फत नगरविकास विभागाचे प्रधान सचिव आणि महापालिका आयुक्त यांना पाठविली आहे. नोटीस मिळाल्यापासून निर्धारित वेळेत समाधानकारक कारवाई केली गेली नाही, १५ दिवसांच्या आत या नोटीसीला प्रतिसाद म्हणून केलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल दिला नाही तर उच्च न्यायालय किंवा इतर सक्षम मंचांसमोर धाव घेण्यासह सर्व उपलब्ध कायदेशीर उपायांचा अवलंब माझे अशिल संतोष जाधव करतील, असे त्यांच्या वकिलांनी कायदेशीर नोटीस मध्ये नमूद केले आहे.

महापालिका परिवहन उपक्रम (एनएमएमटी) महाव्यवस्थापक, मुख्य अग्निशमन अधिकारी, अतिरिक्त शहर अभियंता, अतिरिक्त महापालिका आयुक्त आणि सध्या शहर अभियंता या पदांवर शिरीष आरदवाड बेकायदेशीर आणि मनमानीपणे नियुक्ती आणि बढती देण्यात आली आहे

## राजर्षि शाहू महाराज जयंती निमित्ताने महापालिका मुख्यालयात अभिवादन



पनवेल: पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज (26जून) सामाजिक समतेची शिकवण देणारे, लोकनेते राजर्षि शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे ,परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त मंगला माळवे,मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, सचिव अक्षय कदम ,लेखा परिक्षक संदिप खुरपे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. भगवान गीते, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी व पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## उत्तर कोकणात यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस दक्षिण कोकणात सरासरीपेक्षा पावसाचे प्रमाण कमी



अलिबाग: यंदा उत्तर कोकणात सरासरीच्या तुलनेत जास्त पाऊस नोंदवला गेला आहे. तर दक्षिण कोकणात सरासरी पर्जन्यमानाच्या तुलनेत पावसाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे. रत्नगिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात जून महिन्यात सरासरी पावसाच्या तुलनेत कमी पाऊस पडला आहे. तर रायगड, ठाणे आणि पालघर जिल्ह्यात सरासरची पर्जन्यमानापेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

राज्यातील इतर विभागांच्या तुलनेत कोकणात जास्त पाऊस पडतो. त्यातही सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात पावसाचे प्रमाण जास्त असते. यंदा मात्र या दोन जिल्ह्यात जून महिन्यातील सरासरी पेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात जून महिन्याती सरासरीच्या तुलनेत 76 टक्के तर रत्नागिरी जिल्ह्यात 93 टक्के पावसाची नोंद झाली आहे. या उलट रायगड, ठाणे आणि पालघर या जिल्ह्यात जून महिन्यातील सरासरी पावसापेक्षा जास्त पाऊस नोंदवला गेला आहे. रायगड जिल्ह्यात 102 टक्के, ठाणे जिल्ह्यात 111 टक्के तर पालघर जिल्ह्यात 123 टक्के पाऊस पडला आहे.

जून महिन्यात पालघर जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान हे 329 मिलीमीटर असते, त्या तूलनेत 24 जून पर्यंत जिल्ह्यात 406 मिमी पावसाची नोंद झाली. ठाणे जिल्ह्याचे जून महिन्याचे पर्जन्यमान 369 मिमी आहे. तिथे 411 मिमी पाऊस पडला आहे. रायगड जिल्ह्यात जून महिन्यात सरासरी 524 मिमी पाऊस पडतो तिथे 24 जून पर्यंत 538 मिमी पाऊस पडला आहे. महिना संपायला आणखिन एक सहा दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे पावसाचे प्रमाण अजून वाढणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात जून महिन्यात 24 जून पर्यंत साधारणपणे 650 मिमी पाऊस पडतो. यंदा मात्र तिथे 610 मिमी पावसाची नोंद झाली आहे, सिंधुदुर्ग जिल्ह्यात 24 जून पर्यंत 704 मिमी पावसाची नोंद होत असते. तिथे 534 मिमी पाऊस पडला आहे. राज्य सरकारच्या महारेन या संकेत स्थळावरील आकडेवारी नुसार यंदा दक्षिण कोकणाच्या तुलनेत उत्तर कोकणातील जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे. पावसाचा पॅटर्न बदलला असल्याचे दिसून येत आहे.

## जनसुरक्षा विधेयकविरोधी समितीच्या वतीने ३० जूनला मुंबईत विराट मोर्चा.

उरण: 'महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४' हे घटनाविरोधी आणि लोकशाहीस बाधक विधेयक असून, जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे आहे. त्यामुळे हे विधेयक रद्द करावे, या मागणीसाठी राज्यभर व्यापक लढा उभारण्याचा निर्धार भाकप, माकप,भाकप माले,शेकाप,सकप, लाल निशाण पक्षांसह विविध डाव्या व लोकशाहीवादी पक्ष - संघटनांनी केला आहे. याअंतर्गत २२ एप्रिल रोजी जनसुरक्षा विधेयकाविरोधात राज्यातील सर्व तहसील कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये याठिकाणी निदर्शने करण्यात आली होती . राज्यातील सर्व जिल्ह्यात व एकूण ७८ ठिकाणी या विधेयकाचा निषेध करण्यासाठी आंदोलन करण्यात आले होते.आता ३० जून रोजी मुंबई येथे सुरू होणाऱ्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विराट मोर्चा काढण्यात येणार आहे अशी माहिती भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)चे रायगड जिल्हा सेक्रेटरी रामचंद्र म्हात्रे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ या विषयावर सविस्तर अभ्यास करून या विधेयकाला विरोध करण्यासाठी जनसुरक्षा विधेयक विरोधी समिती तातडीने कृती कार्यक्रम हाती घेतला . राज्यात विभागीय मेळावे घेऊन या विधेयकाला विरोध का करायचा, याबाबत जनतेपर्यंत माहिती पोहोचवून जनमत तयार करण्यात आले. आता ३० जून रोजी मुंबई येथे सुरू होणाऱ्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विराट मोर्चा काढण्यात येणार आहे. . तसेच समाज माध्यमांमधून याबाबत प्रचार - प्रसार करुन, सर्व आमदारांच्या घरावर व कार्यालयावर जाऊन हे विधेयक रद्द करावे म्हणून विधानसभा, विधान परिषदेत भूमिका मांडण्याबाबत दबाव निर्माण करण्यात येणार आहे. सदर विधेयक मंजूर करण्यापूर्वी विधीमंडळाच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले. या समितीने जाहीर केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन त्या नुसार आजपर्यंत दिलेल्या तारखेला या विधेयकाला प्रत्यक्ष व दिलेल्या संकेतस्थळावर सुचना व विरोध नोंदवण्यात आला आहे. राज्य भरातून १२००० पेक्षा अधिक हरकती दाखल करण्यात आलेल्या आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर हरकती दाखल होण्याचे हे पहिलेच उदाहरण आहे. यावरून जनसामान्यांच्या मनात काय आहे हे लक्षात येते. परंतु सदर विधीमंडळाच्या संयुक्त समिती ने कोणालाही प्रत्यक्ष म्हणणे मांडण्याची संधी दिलेली नाही. हे लोकशाही प्रक्रियेला साजेसे नाही. याचा आम्ही निषेध करतो. आमचे हरकतीचे मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत

## जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांना ज्येष्ठ नागरिक समितीची शुभेच्छा भेट



माणगाव: रायगड जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघांच्या समन्वय समितीने जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती आचल दलाल यांची शुभेच्छा भेट घेतली. या भेटीत जिल्हा पोलीस अधीक्षक यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. समितीच्या अध्यक्ष सुरेश पालकर, उपाध्यक्ष अविनाश म्हात्रे, खजिनदार काशिनाथ पिंगळे, अलिबाग ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष राऊत, उपाध्यक्ष श्रीमती कोरडे, पत्रकार वालेकर , पेण ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रामदास पाटील आणि निवृत्त पोलीस अधिकारी दशरथ खाजणे उपस्थित होते.

भेटीदरम्यान, जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघांच्या पुढाकारातून जिल्हास्तरावरील केंद्रीय सुरक्षा समितीच्या बैठकीबाबत चर्चा झाली. या समितीच्या कामकाजावर विचारमंथन करताना, माननीय जिल्हा पोलीस अधीक्षकांनी भक्कम सुरक्षा उपाययोजनांसाठी या बैठकींचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी पुढील दोन महिन्यांत या बैठकीची नियमितपणे आयोजन करण्याचा आश्वासन दिला, ज्यामुळे जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसंदर्भातील धोरणे अधिक प्रभावीपणे अमलात आणली जातील.

या भेटीमुळे पोलीस विभाग आणि ज्येष्ठ नागरिक संघ यांच्यातील सहकार्य अधिक दृढ होण्याची शक्यता दिसून आली आहे. यामुळे खास करून वयोवृद्ध नागरिकांच्या सुरक्षिततेशी निगडीत मुद्दे आणि त्यांच्या अडचणींवर लक्ष केंद्रित करता येणार आहे. या संधीचा उपयोग करून पोलीस आणि स्थानिक नागरिक संघटना यांच्यातील संवाद वाढवण्यावर भर देण्यात आला.

जिल्हा पोलीस अधीक्षकांसमवेत या महत्त्वाच्या बैठकीत झालेल्या चर्चांमुळे रायगड जिल्ह्यातील सुरक्षा उपाययोजना अधिक सुसंगत आणि समन्वित होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी पोलीस प्रशासनाकडून नियमित पुढाकार घेण्यावरही बल देण्यात आले.

## तळा पोलिसांकडून महाविद्यालयात जागतिक अमली पदार्थ विरोधी सप्ताह जनजागृती.



तळा: तळा पोलिसांकडून अशोक लोखंडे विद्यामंदिर व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय तसेच जी. एम.वेदक कॉलेज ऑफ सायन्स या महाविद्यालयात अंमली पदार्थ विरोधी सप्ताह जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले.या अनुषंगाने अंमली पदार्थ विरोधी कार्यशाळा परिसंवादाचे आयोजन करून जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला.सदर कार्यक्रमामध्ये अंमली पदार्थ विरोधी दिना बाबत विद्यार्थ्यांना माहिती व मार्गदर्शन करण्यात आले, त्याच बरोबर सद्या वाढणारे सायबर क्राईम, महिलांविषयी वाढते गुन्हेगारी, डायल ११२, आणीबाणीचा प्रसंग आला तर मुलींनी सेल्फ डिफेन्स कसा करावा, तसेच पोलीस दीदी व पोलीस काका मधील नेमलेले अंमलदार यांचे मोबाईल नंबर देऊन,जनजागृती करून विद्यार्थ्यांना योग्य ती माहिती देण्यात आली.याप्रसंगी तळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिश गवई, सपोई विजय पाटील,पो.ह.मढवी,पो.ना.साळुंखे,पो.शी.बोराडे यांसह दोन्ही शाळांमधील शिक्षक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तलासरीत लाखो रुपयांची चोरटी दारु जप्त



**तलासरी, दि. २६ : प्रतिनिधी**

तलासरी पोलिसांनी दारू तस्करीवर मोठी कारवाई करत तब्बल १३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून,याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई उधवा नवापाडा (ता. तलासरी) येथे करण्यात आली. रत्नेश लालजी उपाध्याय (वय २९, व्यवसाय चालक, रा. गांगडेपाडा, वसई) याने दादरा नगर हवेली येथून महिंद्रा बोलेरो पिकअप (MH 48 CQ 1981) गाडीतून चोरटी दारु गुजरातच्या दिशेने नेत असताना, तलासरी पोलिसांनी ही कारवाई केली. यावेळी पोलिसांनी बोलेरो वाहनासह त्यामधील चोरटी विदेशी दारू असा एकूण १३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, आरोपी रत्नेश उपाध्याय विरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, उपविभागीय पोलिस अधिकारी अंकिता कणसे व तलासरी पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अजय गोरड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत देवरे, पोलीस उपनिरीक्षक जयराम उमतोल, सहाय्यक फौजदार हिरामण खोटरे, पोलीस हवालदार प्रविण चौरे, संदीप चौधरी यांच्या पथकाने केली.

आपल्या परिसरात कुठेही जुगार, गुटखा, अंमली पदार्थ वा अवैध दारू वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास ९६२३९६१००० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असेआवाहन प्रभारी अधिकारी अजय गोरड यांनी नागरिकांना आवाहन केले आहे.

# वाढवण बंदर सर्वे विरोधात पुन्हा स्थानिकांचा उग्र संघर्ष

## पोलिसी बळाचा वापर; महिलांचा जलसमाधीचा इशारा





> सुप्रीम कोर्टाचे आदेश धाब्यावर बसवत, कोणतीही पूर्वसूचना न देता पोलिस बंदोबस्तात सुरू असलेला ड्रोन सर्व्हे आणि चोरीछुपे काम म्हणजे लोकशाहीचा गळा दाबण्याचा प्रयत्न आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ वाढवणमध्ये येऊन स्थानिकांच्या भावना ऐकाव्यात.
>
> **- मिलिंद राऊत, वाढवण बंदर संघर्ष समिती**

**डहाणू, दि. २६ : प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील मोदी सरकारचा महत्वाकांक्षी समजला जाणारा आणि स्थानिक भूमीपुत्रांचा प्रखर विरोध असलेला बहुचर्चित वाढवण बंदर प्रकल्प विरोधात सुरु असलेला जनआंदोलक संघर्ष आता संकटाचे सावट बनू लागला आहे. स्थानिक जनतेचा विरोध धुडकावून लावत, पोलिसी बळाखाली पुन्हा एकदा गुरुवारी हायटाईड ड्रोन सर्वेक्षण सुरू करण्यात आला. मात्र, या विरोधात उसळलेला स्थानिकांचा रोष, संतप्त महिलांचा जलसमाधीचा इशारा आणि पोलीस नागरिक संघर्षामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

गुरुवारी पहाटे साडेसहा वाजता, वाढवण किनाऱ्यावर मोठ्या संख्येने पोलिसांचा फौजफाटा दाखल झाला. विशेष म्हणजे कोणतीही पूर्वसूचना न देता, थेट बंदोबस्तात ड्रोन सर्वे सुरू करण्यात आला. ग्रामस्थांनी हे हेरून रोषाने पोलिसांना रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रशासनाने आक्रमक भूमिका घेत आंदोलकांना बाजूला हटवलं, काही ठिकाणी चकमकीची स्थिती निर्माण झाली."बंदर हटाव, जीवन वाचवा!" या घोषणांनी किनारा दुमदुमला. स्थानिक महिलांनी हातात फलक घेऊन थेट समुद्रात उतरून जलसमाधी घेण्याचा इशारा दिला. संतप्त महिलांनी सरकारच्या धोरणांवर थेट हल्ला चढवला. पर्यावरण, मच्छीमारांचे हक्क आणि जीवनशैली उद्ध्वस्त करणाऱ्या प्रकल्पाला थेट विरोध नोंदवत त्यांनी आंदोलन अधिक तीव्र केले.

सर्वेक्षण खासगी कंपनीमार्फत गुपचूप पद्धतीने राबवले जात आहे, असा आरोप वाढवण बंदर संघर्ष समितीकडून करण्यात आला आहे. ग्रामपंचायतीला याबाबत माहिती नाही आणि ग्रामस्थांशी कोणतीही पूर्व चर्चा न करता सर्वे रेटून नेला जातोय. "हा काय विकास आहे? स्थानिकांच्या नाकावर टिचून?" असा सवाल गावकऱ्यांकडून उपस्थित केला जातोय.

दरम्यान, सर्व्हे पूर्ण करून परतणाऱ्या पोलिस आणि सर्व्हे करणाऱ्या पथकाला स्थानिकांनी रोखण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिस आणि ग्रामस्थांमध्ये काही काळ झटापटही झाली. साधारण पाच तासांपर्यंत पोलिस प्रशासन आणि स्थानिकांमध्ये तणावाचे वातावरण होते. परिस्थिती हाताबाहेर जाण्याच्या स्थितीत असतानाच, पालघरच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करत तणाव निवळवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आंदोलन स्थगित झाले. मात्र, हे केवळ तात्पुरते शमन असून संघर्ष पुन्हा पेटण्याची शक्यता स्पष्टपणे जाणवते आहे.

"समुद्र आमचा जीव आहे. मच्छीमारी आमचा व्यवसाय आहे. पर्यावरण आमचं भविष्य आहे. पण आमच्यावर बळाचा वापर करून आमचं सगळं हिरावून घेतलं जातंय," असा संतप्त सूर स्थानिकांकडून उमटतो आहे. केवळ विकासाच्या नावाखाली आमचं सर्वस्व नष्ट करणं हा अन्याय आहे, असा संतप्त सवाल स्थानिक करत आहेत. तर दुसरीकडे प्रशासनाकडून सांगण्यात येते की, सर्व्हे प्रक्रिया कायदेशीर आहे आणि प्रकल्पाच्या नियमानुसारच ही कारवाई केली जात आहे. मात्र, ही माहिती पारदर्शकतेच्या अभावामुळे आणि स्थानिकांच्या सहभागाशिवाय राबवली जात असल्याने तणावाचे वातावरण गडद होत आहे.

वाढवण बंदरविरोधी आंदोलन हा केवळ एका प्रकल्पाचा विरोध नाही, तर तो स्थानिकांच्या जीवनशैलीचा, अस्तित्वाचा आणि लोकशाहीचा लढा आहे. या प्रकल्पामुळे हजारो कुटुंबं विस्थापित होतील, जैवविविधता नष्ट होईल आणि किनारपट्टीवरचा नैसर्गिक समतोल कोलमडेल अशी गंभीर चिंता पर्यावरण कार्यकर्ते आणि ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. गावकऱ्यांचा एकच सवाल आहे की, केंद्र सरकार आणि जिल्हा प्रशासन किती काळ स्थानिकांच्या आवाजाकडे दुर्लक्ष करणार? शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्यांवर पोलिसी बळ का? संवादाऐवजी दडपशाही का? या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर, वाढवण बंदर प्रकल्पाविरोधातील संघर्ष अधिक तीव्र होण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. सरकारने वेळेत जनतेशी संवाद साधून निर्णय घ्यावा, अन्यथा संघर्षाचा भडका उडण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने आंदोलन दडपण्यासाठी घेतलेली पोलिसी भूमिका, महिलांचा जलसमाधीचा इशारा आणि गुप्त पद्धतीने सुरू असलेला सर्व्हे या सगळ्या बाबी स्थानिकांच्या असंतोषाचा केंद्रबिंदू ठरत आहेत.

# तुंगार पर्वतामध्ये इतिहास प्रेमींचे वृक्षारोपण

**वसई, दि. २६ : प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील पौराणिक तुंगार पर्वत, तुंगार दुर्ग आपल्या कुशीत अनेक पौराणिक गुपिते लपवून बसला आहे. यात अनेक पौराणिक संदर्भ अवशेष गूढ कुतूहल निर्माण करत आजही अज्ञात आहेत. तुंगार पर्वताच्या पोटात आजही विलक्षण कथा संदर्भ लुप्त होत आहेत. या कथांना आधार आहे पुराणांचा व आपल्या सांस्कृतिक वैभवाचा. किल्ले वसई मोहिम परिवार अंतर्गत पौराणिक संदर्भ सांगणारी तुंगार पाषाण होडी पाहण्यासाठी विशेष पौराणिक कथा व खजूर, फळभाज्यांच्या बियांचे रोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.. सदर मोहिमेत कांदिवली वसई मुंबई मालाड भागातील २३ दुर्गमित्र सहभागी झाले होते.

मोहिमेत पौराणिक कथा व घटना मार्गदर्शन करण्यासाठी इतिहास अभ्यासक श्रीदत्त नंदकुमार राऊत उपस्थित होते. यावेळी राऊत यांनी पौराणिक कथा व साधने, श्री भगवान परशुराम, श्री इंद्र देव, विमलासुर, जहाज कथा, वैद्यकीय व वैज्ञानिक दृष्टिकोन, तुंगार औषधी वनस्पती, वसईची मोहीम प्रसंग, तुंगार माहात्म्य इत्यादी शेकडो विषयावर अनेक कथा तपशीलवार मार्गदर्शन केले. उपस्थित दुर्गमित्रांसाठी



निसर्गरम्य वातावरण व ऐतिहासिक संदर्भ माहिती खजिना या दोन्ही गोष्टी विशेष ठरल्या. वन्यजीवांसाठी व निसर्गसंपदा हेतू तब्बल ८ हजार ५०० हून अधिक फळ बिया रोवण्यात आल्या. सोबतच चाफ्याच्या २०० फांद्याचे रोपण करण्यात आले. एकूण ७ स्थळांवर नवीन बिया रोवण्यात आल्या. सर्व विक्रमी वृक्षारोपण वसई किल्ला पोलीस प्रशासन कार्यालय अंतर्गत योगदान देऊन करण्यात आले. गेली अनेक वर्ष तुंगार पर्वतात दडलेला इतिहासाचा बहुमोल संदर्भ अनेकांना परिचित करून देण्याचे काम राऊत सातत्याने करत आहेत. आजच्या मोहिमेत तुंगार पर्वताच्या गच्च झाडीत दडलेली पाषाण नैसर्गिक होडी पाहताना सर्व वयोगटातील व्यक्ती अत्यंत भारावून गेल्या होत्या. किल्ले वसई मोहिमेच्या माध्यमातून सातत्याने पालघर जिल्ह्यातील अपरिचित अथवा लुप्त होणाऱ्या ऐतिहासिक संदर्भ ठेवा संकलन करण्याचे काम सातत्याने सुरू आहे. मोहिमेत उपस्थित सर्व दुर्गमित्रांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. मुसळधार पावसात तुंगार पर्वताची पायी दमछाक करून ज्येष्ठ व्यक्तींनी यात जबाबदारीपूर्वक सहभाग नोंदवला याचे विशेष कौतुक आहे. गेली काही दिवस सदर भव्य नियोजनात पोलीस अधिकारी बाळकृष्ण , निखिल हडळ, प्रतीक भायदे, जीवन पाटील यांचे महत्वाचे योगदान लाभले. दुर्गमित्रांनी अतिशय परिश्रमपूर्वक सर्व वृक्षारोपण साहित्य पायी चालत तुंगार पर्वतावर नेले हे विशेष. किल्ले वसई मोहिमेचे दुर्गमित्र निखिल हडळ यांच्या मते "पौराणिक तुंगार पर्वताच्या सानिध्यात संकलित झालेला इतिहास, पुरातत्वीय अवशेष, नैसर्गिक साधन संपत्ती, इतिहास यांची सांगड घालून इतिहासाचे बहुमोल संदर्भ जपण्यासाठी सर्वोत्तम योगदान देण्याचा संकल्प सातत्याने दरवर्षी पूर्ण करीत आहोत.

# जिल्हा परिषदेच्या नववीसह दहावीच्या वर्गांना शिक्षकच नाही

**वाडा, दि. २६ : प्रतिनिधी**




वाडा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या डाहे व वरसाळे या दोन शाळांमध्ये इयत्ता नववी व दहावीचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. मात्र, या दोन्ही शाळांमध्ये यावर्षी अजूनही शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षकाविनाच शाळेत बसून राहावे लागत आहे. पालघर जिल्हा परिषदेकडून २०१७ पासून इयत्ता नववी व दहावीचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. या दोन वर्गांसाठी मानधन तत्वावर खाजगी शिक्षणाची नेमणूक करण्यात आली असून त्यांचे मानधन जिल्हा परिषद सेस फंडातून दिले जाते. मात्र, यावर्षी शाळा सुरू होऊन 15 दिवस होत आले तरीही सदर शिक्षकांची नेमणूक केली नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे.

वाडा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या डाहे व वरसाळे या दोन शाळांमध्ये इयत्ता नववी व दहावीचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. या दोन्ही शाळा अतिदुर्गम गावात आहेत. मात्र या दोन्ही शाळांमध्ये यावर्षी अजूनही शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आले नसल्याने पालकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

> 2023 सालापासून पालघर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून 44 शाळांमध्ये इयत्ता नववी व दहावीचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. मात्र दरवर्षी या दोन वर्गांसाठी शिक्षकांची मानधन तत्वावर नियुक्ती केली जाते. ही संपूर्ण प्रक्रिया होईपर्यंत खूप उशीर उशीर होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. याबाबत तातडीने कार्यवाही करून शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात याव्यात.
>
> **- जयेश शेलार, अध्यक्ष : पालक संघ वाडा तालुका**

# निवृत्त प्राध्यापकाला 1 कोटी 35 लाख 69 हजारांचा गंडा

**वसई, दि. २६ : प्रतिनिधी**

वसईत राहणाऱ्या निवृत्त प्राध्यापकाला ट्रायने दाखल केलेल्या गुन्ह्यात अटक करण्याची धमकी देऊन १ कोटी ३५ लाख ६९ हजार रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. याप्रकरणी वसई पोलिसांनी तीन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सेवानिवृत्त प्राध्यापकाला १९ मे २५ ते १३ जून २५ दरम्यान संदीप राव, निरज कुमार आणि विजय खन्ना यांनी वारंवार व्हॉटसअप व्हिडीओ कॉल करून धमकी दिली होती. कॅनरा बँकेत तुमच्या आधारकार्डाचा वापर करून खाते उघडण्यात आले असून त्याची रेग्युलेटरी अथॉरिटी इंडिया (ट्राय) ची पोलीस केस सुरु असून तुमच्या नावाचे अटक वॉरंट असल्याची बतावणी केली होती. इतकेच नाही तर तुम्ही कुलाबा पोलीस ठाण्यात आला नाहीत तर पोलीस घरी येऊन अटक करतील अशी धमकी दिली होती. अटक टाळायची असेल तर पैशांची मागणी करण्यात आली होती. अटकेला घाबरून प्राध्यापकाने आरोपींनी दिलेल्या वेगवेगळ्या सात बँक अकाउंटवर १ कोटी ३५ लाख ६९ हजार रुपयांची रक्कम पाठवली होती. त्यानंतर आपली फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यावर प्राध्यापकाने वसई पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यावर पोलिसांनी संदीप राव, निरज कुमार, विजय खन्ना यांच्याविरोधात फसवणुकीसह आयटी अक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

# वकिलाची 26 लाख 98 हजारांची ऑनलाईन फसवणूक

**वसई, दि. २६ : प्रतिनिधी**

विरारमधील एका वकिलाला ऑनलाईन ट्रेडिंगच्या बहाण्याने एका व्हॉटसअप ग्रुपवर समाविष्ट केले. त्यानंतर आरोपींनी पाठवलेल्या युपी आयडीवर वकिलाने दहा हजार रुपये पाठवले. त्यानंतर आरोपींनी वकिलाच्या बँक खात्यातून तब्बल २६ लाख ९८ हजार रुपयांची रक्कम घेऊन फसवणुक केल्याचा प्रकार उजेडात आला आहे. याप्रकरणी विरार पोलिसांनी लेरीसा ईगोरीया, अनुप मेहरा आणि रोहित याआरोपींविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# रिसॉर्टच्या रुममध्ये पॉर्न व्हिडीओ

**भाईंदर, दि. २६ : प्रतिनिधी**

भाईंदर घोडबंदर रोडवर असलेल्या पाली व्हिलेज हॉटेल अँड रिसॉर्टमधील एका रुममध्ये तीन पुरुष आणि एका महिलेचा शारिरिक संबंध करतानाचा पॉर्न व्हिडीओ बनवल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. याप्रकरणी याप्रकरणी हॉटेल व्यवस्थापनासह एका अज्ञात इसमाविरोधात काशिगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० मे २५ रोजी दुपारी एक ते तीनच्या सुमारास घोडबंदर रोडवर असलेल्या पाली व्हिलेज हॉटेल अँड रिसॉर्टमधील एका रुममध्ये तीन पुरुष आणि एका महिलेचा शारिरिक संबंध करत असतानाचे चित्रीकरण एका अज्ञात इसमाने केल्याचे फिर्यादीला आढळून आले. पॉर्न व्हिडीओ बनवल्याने तो वायरल झाल्यास चुकीचा संदेश जाण्याची शक्यता असल्याने फिर्यादीने काशिगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यातक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तसेच रुम देऊन अशा प्रकाराला सहाय्य केल्याप्रकरणी रिसॉर्ट व्यवस्थापनाच्याविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डहाणू-बोर्डी मुख्य मार्गावरच चित्रीकरण

## वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांचे हाल, कारवाईची मागणी

**डहाणू, दि. २६ : प्रतिनिधी**

डहाणू-बोर्डी या महत्वाच्या सागरी राज्य मार्गावर खाडीपाडा येथे म्युझिक अल्बमच्या चित्रीकरणामुळे प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.. भर रस्त्यावर थेट शूटिंग सेट उभारण्यात आला होता. त्यासाठी काही काळासाठी वाहतूकही पूर्णतः बंद करण्यात आली होती. त्यामुळे प्रवाशी, पर्यटक आणि स्थानिक वाहन चालकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागले होते. या चित्रीकरणासाठी ना पोलीस विभागाची, ना सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी घेण्यात आली होती. दोन्ही विभागांनी "कोणतीही अधिकृत माहिती नाही" असे स्पष्टपणे सांगितले आहे. त्यामुळे "अशा बिनधास्तपणे सार्वजनिक रस्त्यावर चित्रीकरण करणाऱ्यांना परवानगी कुणाची?" असा सवाल उपस्थित होत आहे.

डहाणू-बोर्डी हा मार्ग पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर फेसाळणाऱ्या लाटा आणि निसर्गाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने या मार्गावर येतात. मात्र, याच मार्गावर परवानगीशिवाय आणि वाहतूक सुरक्षेची कोणतीही खबरदारी न करण्यात आलेल्या चित्रीकरणामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, चित्रीकरण सुरू असताना घटनास्थळी ना वाहतूक पोलीस, ना पीडब्ल्यूडीचे अधिकारी उपस्थित होते. वाहनांची



दोन्ही बाजूंनी लांबच लांब रांग लागली होती. काही प्रवाशांना वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालय गाठायचे होते, तर काहीजण वेळेत कामावर पोहोचण्याच्या घाईत होते. मात्र, सर्वांनाच रस्त्यात थांबवण्यात आले. या प्रकारामुळे प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. डहाणू-बोर्डी सारख्या पर्यटनदृष्ट्या संवेदनशील मार्गावर शिस्तभंग करणाऱ्यांवर कोणाचेच नियंत्रण उरलेले नाही, हे या घटनेतून दिसून आले आहे.

नागरिक आणि पर्यटकांनी संतप्त प्रतिक्रिया देत, अशा घटनांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. "फक्त निसर्ग सौंदर्याच्या नावावर कोणालाही मुक्तपणे रस्ते अडवण्याची परवानगी दिली जाऊ नये. कायदेशीर चौकशी आणि कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे," अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, पोलिस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने चित्रीकरणासाठी कोणतीही अधिकृत परवानगी दिली नसल्याची माहिती आहे. त्यामुळे आता याप्रकरणी कारवाई केली जाईल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बोगस वैद्यकीय व्यवसायाविरोधात कारवाई करा- जिल्हाधिकारी डॉ.इंदूराणी जाखड

**पालघर, दि. २६ : प्रतिनिधी**

बोगस वैद्यकीय व्यवसायाला आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.इंदूराणी जाखड यांनी दिले आहेत. जिल्हास्तरीय बोगस वैद्यकीय व्यवसायीक शोध समितीची सभा जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समिती बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रामदास मराड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. शशिकांत साळुंके तसेच सर्व तालुका आरोग्य् अधिकारी तसेच पोलिस विभागाचे प्रतीनीधी उपस्थित होते. समित्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व वैद्यकीय व्यवसायिकांच्या अर्हतांची तपासणी पुर्ण करावी. अशी तपासणी एकदा पुर्ण झाल्यानंतर नवीन स्थापन होणारे दवाखाने कोणते आहेत व ते चालवणारे व्यवसायिक अधिकृत आहेत की अनअधिकृत यांचा शोध घेणे समितीस सोपे होईल, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी बैठकीत केल्या. तपासणीत अनधिकृतपणे वैद्यकीय व्यवसायिक आढळल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल करावेत. तसेच समाजमाध्यम व इतर ठिकाणावरुन प्राप्त होणाऱ्या तक्रारीची तात्काळ दखल घेऊन तपासणी करावी. बोगस डॉक्टर आढळुन आल्यास तात्काळ गुन्हा दाखल करावा असेही आदेश जिल्हाधिकारी डॉ.इंदूराणी जाखड यांनी संबंधित अधिकारी यांना दिले आहेत.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विभाग, पालघर**
**निविदा सुचना क्रमांक २४ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर, हे खालील कामाच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी- दि. ०३/०७/२०२५ ते दि.१०/०७/२०२५ सकाळी ११.०० ते संध्या ५.४५ वाजेपर्यंत (https://pwd.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर, हे भरुन पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडतील.

टिप - सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०८ (आठ) कामे समाविष्ट आहेत या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

1) www.pwd.maharashtra.gov.in 2) https://paytopwd.emahapwd.com/

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. लक्ष (रुपये) (जी. एस.टी. वगळून) | अंदाजित रक्कम रु. लक्ष (अक्षरी) (जी.एस.टी. वगळून) | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | कोचाई जुना आवारपाडा येथे साकव बांधणे ता. तलासरी जि.पालघर | रु.८२०८३८/- | अक्षरी रु. आठ लक्ष वीस हजार आठशे अडतीस मात्र | ४२२५ अनुचित जाती अनुमुचित जमाती इतर मागासवर्ग व (४२२५ १४५७), ५३, मोठी बांधकामे |
| २ | कोचाई बारगापाडा येथे साकव बांधणे ता. तलासरी जि. पालघर | रु.८२१२४२/- | अक्षरी रु. आठ लक्ष एकवीस हजार दोनशे बेचाळीस मात्र | ४२२५ अनुसुचित जाती अनुसुचित जमानी इनर मागासवर्ग व (४२२५ १४५७),५३. मोठी बांधकामे |
| ३ | घिमानिया पारसपाडा येथे साकव बांधणे ता. तलासरी | रु.८२२६८३/- | अक्षरी रु. आठ लक्ष बाबास हजार सहाशे त्र्याऐंशी मात्र | ४२२५ अनुसूचित जाती अनुसूचित जमाती इतर मागासवर्ग व (४२२५ १४५७),५३, मोठी बांधकामे |
| ४ | घिमानिया शिपाईपाडा येथे साकाव बांधणे ता. तलासरी जि. पालघर | रु.८२४०३६/- | अक्षरी रु. आठ लक्ष चोवीस हजार छत्तीस मात्र | ४२२५ अनुसूचित जाती अनुसूचित जमानी इतर मागासवर्ग व (४२२५ १४५७).५३. मोठी बांधकामे |
| ५ | आशागड धोडीपाडा येथे रस्ता तयार करणे ता.डहाणू जि.पालघर | रु.८०६२१०/- | अक्षरी रु. आठ लक्ष सहा हजार दोनशे दहा मात्र | २२२५ अनुचित जाती अनुचित जमाती इतर मागासवर्ग व (२२२५ ई ४०९), २७, लहान बांधकामे |
| ६ | चिंचले खडीकीपाडा येथे रस्ता तयार करणे ता.डहाणू जि.पालघर | रु.८१७२५०/- | अक्षरी रु. आठ लक्ष सतरा हजार दोनशे पन्नास मात्र | २२२५ अनुसुचित जाती अनुचित जमाती इतर मागासवर्ग व (२२२५ ई ४०९), २७.लहान बांधकामे |
| ७ | नागझरी बोंडपाडा येथे रस्ता तयार करणे ता.डहाणू जि.पालघर | रु.८१८७८१/- | अक्षरी रु. आठ लक्ष अठरा हजार सातशे एक्क्याऐंशी मात्र | २२२५ अनुचित जाती अनुसूचित जमाती इतर मागासवर्ग व (२२२५ ई ४०९). २७. लहान बांधकामे |
| ८ | नागझरी वसावला ते नंबरपाडा येथे रस्ता तयार करणे ता.डहाणू जि. पालघर | रु.८२१६१९/- | अक्षरी रु. आठ लक्ष एकवीस हजार सहाशे एकोणीस मात्र | २२२५ अनुसुचित जाती अनुचित जमाती इतर मागासवर्ग व (२२२५ ई ४०९), २७, लहान बांधकामे |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आह. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरिल कामाची निविदा उपलब्ध कालावधी- दि. ०३/०७/२०२५ ते दि. १०/०७/२०२५ पर्यंत

निविदा उघडणे दि. १३/०७/२०२५ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर

**जा.क्र. सा.बां.वि/पालघर/निविदा/५१११**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. विभाग, पालघर**
**बांधकाम भवन इमारत,**
**ढवळे रुग्णालया शेजारी,**
**पालघर-बोईसर रोड,**
**ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४**
**दिनांक : 25 JUN 2025**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर**

**विमाका/कोवि/२०२५-२०२६/७५**

'नीट' परीक्षेत कमी मार्क पडल्याने मुख्याधापक पित्याने मुलीला बेदम मारहाण केली अन् लेकीने जीव सोडला. सांगलीतील हा धक्कादायक प्रकार पाहून पुरोगामी महाराष्ट्राला 'अरे कुठे नेऊन सोडला महाराष्ट्र माझा' असे म्हणावेसे वाटते. शिक्षक म्हणून कवडीचाही लौकिक नसलेल्या बापाची हुशार लेक आज जगात राहिली नाही. दहावीला ९५ टक्के मार्क मिळालेल्या साधनाला म्हणावेसे वाटते की, साधना तू पास झाली आहे, पण तुझा बाप जीवनात नापास झाला. बारावीत शिकणाऱ्या मुलीला नीटला कमी मार्क पडल्याच्या रागातून माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक असणाऱ्या पित्याने आपल्या पोटच्या मुलीला लाकडी खुंट्यानं बेदम मारहाण केली. सांगलीतील आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी येथे ही घटना घडली. याप्रकरणी धोंडीराम भोसले या 'राक्षस' मुख्याध्यापक पित्यास अटक करण्यात आली. परीक्षेत कमी गुण कसे पडले? म्हणत रागाच्या भरात हा प्रकार घडला. साधना भोसले ही विज्ञान शाखेत शिकत होती. बारावीच्या चाचणी परीक्षेत साधनाला कमी गुण मिळाले. हे समजल्यावर हे महाशय प्रचंड संतापले. मुलीची आई प्रीती भोसले यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली ही महत्वाची बाब समजावी लागेल. एका बाजूला नराधम पती तर दुसऱ्या बाजूला जीव गमावलेली लेक. काय वाटले असेल त्या माऊलीला. साधना भोसले ही बारावीमध्ये शिक्षण घेत होती. डॉक्टर बनण्याचे तिचे स्वप्न होते. तिला नीटच्या चाचणी परिक्षेत कमी गुण मिळाले होते. दोन दिवसांपूर्वी ती घरी नेलकरंजी येथे गेली होती. कमी मार्क मिळाल्यानंतर ती प्रथमच घरी आली व तिला गंभीर मारहाण झाली. त्यामध्ये ती गंभीर जखमी झाली होती. विशेष म्हणजे तिला रुग्णालयात उपचारासाठी न नेता दुस ?या दिवशी सकाळी राक्षस जातीचा हा पिता 'योग दिन' साजरा करण्यासाठी शाळेत निघून गेला. ज्या मुलीला दहावीमध्ये ९५ टक्के गुण मिळाले होते, ती मठ्ठ असू शकते का? डॉक्टर बनण्याचे तिचे स्वप्न होते. परंतु केवळ नीटच्या चाचणी परिक्षेत कमी गुण मिळाले म्हणून तिचा हकनाक बळी गेला. रात्रभर वेदनांनी विव्हळणारी साधना कधी कायमची झोपी गेली हे कुणालाच कळले नाही. आईने हालवून पाहिलं, ती निष्प्राण होती. दवाखान्यात दाखल करण्यात आले. उपचार सुरू झाले. डॉक्टर होऊन इतरांच्या वेदनेवर औषधोपचार करून त्यांना बरे करण्याचे तिचे स्वप्न होते. मात्र तिच्या देहाचे व स्वप्नाचंही शवविच्छेदन झाले होते. स्वतः शिक्षक असलेले वडील आता जेलमध्ये जाऊन बसले. स्वतःच्या मुलीला मारून बसले. शिकवण्याच्या नावाखाली गुण, शिस्त आणि गुन्हा या घटनेने एक प्रश्न आपल्या सर्वांसमोर ठेवला आहे, गुण हेच यशाचं मोजमाप का? अपेक्षा इतक्या कठोर असतात का? शिकवण्याचा अधिकार असलेल्यांना, प्रेम करण्याची जबाबदारी नाही का? साधना गेली. एक मुलगी, एक स्वप्न, एक विश्वास सगळं हरवलं. आता उरले आहेत काही पेपर क्लिप्स, वह्यांच्या शेवटी लिहिलेलं मी डॉक्टर होईन पप्पा, फक्त थोडा वेळ द्या... एक मूक साद बापाला व समाजाला. ही घटना केवळ एक गुन्हा नाही, ही एक साद आहे पालकांना. मुलांच्या गुणांपेक्षा त्यांचं मन वाचा. शिक्षकांनी शिस्त द्या, पण दडपण नाही. समाजाने यशची परिभाषा परत लिहावी. कारण पुन्हा एखादी साधना मारली जाऊ नये!






# साधना तू पास.... पण, तुझा बाप नापास!



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

संबंधित नराधम शिक्षक स्वतःच्या लेकीला इतकी अमानुषपणे मारहाण करुन जिव घेत असेल, तर शाळेतील विद्यार्थ्यांसोबत तो काय वर्तन करत असेल? याची केवळ कल्पनाच केलेली बरी.

हा रानटी शिक्षकच असा बिघडला तर समाजानं कुणाकडं आशेने बघायचं? अशा माथेफीरू शिक्षकांमुळे चांगल्या शिक्षकांना तोंड दाखवायचीच नव्हे; तर ताठ मानेने फिरायची चोरी झाली आहे. पण साधनाच्या मृत्यूमुळे अनेक घटकांविषयी आता विचार करायची वेळ आली आहे. मुलांना काय वाटतं? त्यांना कोणत्या शाळेत जायचं आहे? त्यांच्या आवडीनिवडी कोणत्या? यांचा साकल्याने विचार न करता मुलांच्या आयुष्याचं सगळं काही जणू आपल्याला कळतं, अशा गुर्मीत असलेले पालक मुलांच्या आयुष्याचे जवळपास सगळे निर्णय मुलांच्या परस्पर घेतात.

मुलांच्या आवडीनिवडी काय आहेत? हे अनेक पालकांच्या गावी नसते. वास्तविक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मुलांचा आदर पालकांनी करायला हवा. मात्र अलीकडे पालक मुलांचे मालक झाल्यासारखे वागताना दिसतात. मातापित्यांच्या लैंगिक सुखाच्या प्रेरणेतून, नैसर्गिक गरजेतून मुलांचा जन्म होतो.

पालकत्व ही जबाबदारी आहे. ती समजून उमजून विचारपूर्वक करायची कृती आहे हे किती पालक लक्षात घेतात? पालक व्हायच्या आधी हे सगळं लग्न झालेल्या दाम्पत्याला नीट समजून सांगितले पाहिजे. मुलांचं करिअर निवडताना पालक प्रचंड गोंधळलेले आहेत. संभ्रमात आहेत. ते इतरांचे कोणाचे तरी अनुकरण करताना दिसतात. यातून मुलांचे त्रास आणखी वाढत आहेत.

पालकांकडे पैसे आहेत म्हणून नीट किंवा जेईईसारख्या परीक्षांच्या तयारीसाठी शिकवणी लावली जाते. दहावीत मिळालेले भरमसाट मार्क्स अकरावी-बारावी विज्ञान आणि त्यापुढील प्रवेश परीक्षेत फारसे कामाला येत नाहीत. आपली मुलं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय किंवा आयआयटीमध्ये जाण्याची स्वप्नं त्यांनी उराशी बाळगलेली असतात. आपल्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा आकांक्षा मुलांकडून पूर्ण करून घेण्याच्या उद्देशाने महागडे क्लास लावले जातात.

'गुंतवणूक आणि परतावा' अशी मार्केटची भाषा पालक मुलांसाठी वापरताना दिसतात. पैसे खर्च केले तर मार्क्स मिळायला हवे असा आग्रह असतो. अनेक मुलांना गुंतागुंतीचे किचकट प्रश्न सोडवता येत नाहीत. संकल्पना स्पष्ट नसतात. शिकवलेलं समजलेलं नसलं तरी परीक्षा कठोर वातावरणात होतात. अशा वेळी मुलांच्या नाकी नऊ येतात.

तीव्र स्पर्धा असल्याने आई-बाबांनी पैसे खर्च केलेले असतात. तरी देखील अपेक्षित मार्क्स मिळत नाहीयेत. आई-वडिलांना मार्क्स पाहिजेत. मुलांमध्ये असणारा कोंडमारा त्यांना असह्य होतो आहे. अभ्यासात मन लागत नाही. तीव्र चिंता सतावत असते. मनात भीती घर करून बसलेली असते. आतल्या आत प्रचंड खळबळ सुरू असते. रेसच्या घोड्यावर लावतात तसे पालकांनी मुलांवर पैसे लावलेले असतात! त्यांना केवळ यश हवं असतं!

मूल म्हणजे मार्क्स मशीन नाहीयेत याचं भान हरपून गेले आहे. परिणामी मुलं त्रासात व ताणात आहेत. त्यांची विचित्र कोंडी झाली आहे. सांगता येत नाही आणि सहनही होत नाही, अशी मनोवस्था मुलं अनुभवत आहेत. वरवर पाहता सगळं काही ठीक चाललं आहे असं वाटत असतं तरी पालकांना मुलांच्या अंतरंगातला कल्लोळ आणि त्रास यांचा अंदाज येत नाही.

प्रेशर कुकरला शिटी असते. मुलांच्या डोक्याला तशी सोय नाही. न झेपणाऱ्या विचारांची कोंडलेली वाफ धडका देत असते याची पुसटशी जाणीव पालकांना असते का? सांगलीत मुख्याध्यापक असलेल्या बापाला लेकीपेक्षा तिच्या शिक्षणावर खर्च केलेले पैसे महत्त्वाचे वाटत होते!

गुंतवणूक करूनही अपेक्षित रिटर्न्स मिळाले नाहीत म्हणजे आपलं नुकसान झाल्यासारखं पालकांना वाटत असेल तर हा आजार किती गंभीर स्वरूपाचा आहे याचा आपल्याला अंदाज येतो. हा बाप माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होता. अशा मानसिकतेचा मुख्याध्यापक म्हणजे तिथल्या मुलांचीदेखील चिंता वाटते. आपण इतका खर्च करतो तर मुलांनी टॉपर म्हणून मार्क मिळवत राहावे, असे पालकांना वाटते.

इतकं सोपं असतं का खरेच हे सगळं? आपल्या मुलांची क्षमता किती आहे? याचा विचार मागे पडलेला आहे. गोष्टी लादल्या गेल्याने त्यातला आनंद संपलेला असतो. मुलं दुबळी आणि पालक सबळ असतात. निमूटपणे सहन करण्याशिवाय मुलांपुढे अन्य पर्याय नसतो. गुमान गप्प बसून बिचारी मुलं सगळं काही सहन करतात. आतली खळबळ न सांगता. अनेकदा या मानसिक ताणतणावातून मुलं नैराश्याच्या फेऱ्यात सापडतात. नीट आणि जेईई या परीक्षांच्या तयारीसाठी राजस्थानमधल्या कोटा येथे गेलेल्या मुलांपैकी अनेक मुलं कमी मार्क्स घेऊन येतात. तेव्हा त्यांना आपण जणू काय आपल्या पालकांचे गुन्हेगार आहोत, असा अपराधगंड छळत असतो.

कोटा शहरात मुलांच्या होणाऱ्या आत्महत्या गंभीर चिंतेचा विषय असूनही अनेक मध्यमवर्गीय, निम्न मध्यमवर्गीय पालक मुलांना या चरकात आपणहून ढकलताहेत. या चरकात अडकलेल्या अनेक मुलांमधला जीवनरस संपून त्यांचं पार चिपाड होऊन जातं. दिवसेंदिवस ही समस्या आणखीन उग्ररूप धारण करते आहे.

मुलांच्या यशात स्वतःचे यश शोधणारे पालक आपल्या पोटच्या पोरांशी क्रूर वागू लागलेत. आयआयटीमधून शिक्षण लाखांचे पॅकेज किंवा डॉक्टर होऊन दवाखाना थाटणार आणि मग सोंगाढोंगात लग्न कार्य, कथित सामाजिक प्रतिष्ठेपायी आईवडील कसे बहकत चाललेत, याचं प्रत्यंतर सांगलीसारख्या मन विदीर्ण करणाऱ्या विदारक घटनांनी येतं.

खलिल जिब्रान म्हणतो तुमची मुलं तुमच्या पोटी जन्माला आलेली असली तरी ती काळ प्रवाहाची अपत्ये आहेत. तुमचे विचार तुमच्या अपेक्षा मुलांवर लादू नयेत. अन् अंतिम सत्य तेच आहे.

## पालकांचं ताळतंत्र सुटत चाललं आहे

आपल्या समाजात पालकत्वाचे कोणतेही शिक्षण नाही. पहिल्या वर्गात प्रवेश घेताना शाळा आणि माध्यम निवडण्यापासून करिअरच्या निर्णायक टप्प्यावर पोहोचेपर्यंत निर्णय पालक घेतात. पालकांच्या मनातला गोंधळ, संभ्रम नजरेस पडत राहतो. मुलांच्या भविष्याची प्रामाणिक काळजी पालकांना वाटते हे वास्तव नजरेआड करता येत नाही. आपल्या मुलांचं काय होईल? अशी असुरक्षितता पालकांच्या मनात असते. काहीशी ती स्वाभाविकही आहे. अलीकडे मात्र पालकांचं ताळतंत्र सुटत चाललं आहे. या गोंधळाचे वाईट परिणाम मुलांवर होताहेत. याबाबत समाजात जाणीवजागृती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शासकीय पातळीवर काही होईल अशा अपेक्षा करणे गैर आहे. वाढत चाललेला स्क्रीन टाईम, अकॅडमीक ओव्हरलोड, आकर्षणातून निर्माण होणाऱ्या लैंगिक समस्या, हिंसा आणि व्यसनांचे आकर्षण अशा अनेक गोष्टी आहेत. मुलं ताणात आणि त्रासात आहेत. प्रत्येक माध्यमिक शाळेत आणि महाविद्यालयात समुपदेशकाची नेमणूक करण्याची मागणी करूनही सरकार दुर्लक्ष करत आले आहे. कारण अकरावी बारावीचे वर्ग ओस पडलेले आहेत आणि क्लासेस ओसंडून वाहत आहेत. प्रवेश परीक्षांना सामोरे जाताना मुलांच्या मनावर मेंदूवर किती ताण येतो, त्यांची मनःस्थिती कशी असते? एकूण शिक्षण, करियर आणि एकूण मानसिक आरोग्याबाबत एखादा अभ्यास केल्यास यातलं भीषण वास्तव समोर येईल.

## पप्पा, तुम्ही कुठे कलेक्टर झालात?

पप्पा, तुम्ही कुठे कलेक्टर झालात तुम्हालाही कमीच मार्क पडले होते ना? असं उलट उत्तर साधनाने दिल्याने संतापलेल्या बापाने साधनाला अमानुष मारहाण केली. या घटनेत तिचा मृत्यू झाला आहे. तिला लाकडी दांड्याने मारहाण सुरू असतांना पप्पा, मी खूप अभ्यास केला. पण एवढेच गुण आले, असे सांगतांना साधनाचे डोळे पाणावले होते, आवाज थरथरत होता. वडील धोंडीराम भोसले मात्र तळतळत होते. ते शिक्षक होते तसेच मुख्याध्यापकही होते. पण त्या रात्री ते फक्त 'अपयश पेलू न शकणारे वडील' होते. त्या रात्री घरात फक्त गुणांची चर्चा नव्हती, तर स्वप्नांची परीक्षा होती. अपेक्षांचा भार आणि एका मुलीच्या जीवाची किंमत सारखीच होती.? साधना बारावीची विद्यार्थिनी होती. डोळ्यांत डॉक्टर होण्याचं स्वप्न, मनात अभ्यासाचं वेड. वडील स्वतः शिक्षक असल्याने घरात शिक्षणाचं वातावरण. पण तेच वातावरण कधी दडपणात बदललं, हे साधनालाही कळलं नाही. नीटच्या सराव परीक्षेत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाले आणि तिचं जगच बदलून गेलं. ₹काय होणार तुझं? डॉक्टर म्हणतेस स्वतःला? एवढेच गुण मिळाले? पोटात लाथ बसली. डोक्यावर आघात झाला. आईने आड येण्याचा प्रयत्न केला, पण राग आंधळा असतो, तो कुणाचं ऐकत नाही. गुण म्हणजेच माझं मोल आहे का? रात्री ती झोपी गेली वेदनांनी कासावीस होऊन. सकाळ झाली, पण ती उठलीच नाही. पण साधनाच्या मृत्यूने समाजापुढे अनेक प्रश्न निर्माण केले हे मात्र खरं!

---

# ज्ञान मार्गाचे प्रभावी माध्यम भाषा

सरकारने इयत्ता पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती करणारा अद्यादेश काढला आहे. त्या विरुद्ध अनेक विरोधी प्रतिक्रिया विविध समाज माध्यमातून समोर आल्या आहेत. अभिवक्ता असीम सरोदे यांनी हिंदी भाषा सक्तीच्या सरकारी नियमांविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या प्रतिक्रिया पाहिल्यानंतर विरोधासाठी विरोध होत असल्याचे लक्षात येते.

१. काहींच्या मते इतक्या लहान वयापासून तिसऱ्या भाषेची सक्ती करणे चुकीचे आहे. मला त्या लोकांना प्रश्न विचारायचा आहे की त्यांचा विरोध तिसरी भाषेची सक्ती आहे की हिंदी भाषेची सक्ती आहे. जर तिसऱ्या भाषेची सक्ती असेल तर सरकारने नवीन अध्यादेश काढून महाराष्ट्रातील सर्व शाळा मग ती कॉन्व्हेंट असो, इंग्रजी माध्यमाची असो, मराठी माध्यमाची असो, हिंदी असो वा अन्य माध्यमांची शाळा असो, सर्वांनी प्रथम भाषा म्हणून मराठी व द्वितीय भाषा म्हणून हिंदी शिकवावी व त्या नंतर त्यांना हवी असलेली भाषा शिकवावी.

सरकारने असा अध्यादेश काढला तर सर्वजण त्याला समर्थन देतील का? हिंदीची सक्ती हा विषय असेल किंवा मुद्दा असेल तर इंग्रजीपेक्षा हिंदी भाषा समजायला, लिहायला व वाचायला सोपी आहे. मग त्याचा उपयोग शालेय शिक्षणाच्या प्रथम वर्गापासून केला तर काय हरकत आहे. देश स्वतंत्र होऊन सात दशकापेक्षा जास्त काळ लोटला आहेण असे असूनही आपण भाषिक गुलामगिरीतून कधी मुक्त होणार?

याचा अर्थ असा नाही की माझा इंग्रजी विषयाला विरोध आहे. भाषा ही ज्ञान प्राप्त करण्याचे एक महत्त्वाचे माध्यम असल्याने अनेक भाषा शिकणे काही गैर नाही.

२. काही जणांनी त्याचा संबंध बिहार निवडणुकीशी लावला आहे. बिहार राज्यातील हिंदी भाषिकांना खुश करण्यासाठी हा निर्णय घेतला गेला आहे. दर पाच वर्षांनी कोणत्या ना कोणत्या राज्यात निवडणूक होते. मग एका राज्याचा निर्णयाचा परिणाम दुसऱ्या राज्याच्या निवडणुकीवर होऊ शकत नाही. निवडणुकीत मुद्दे हे त्या त्या राज्याचे असतात.

३. काहींच्या मते हिंदी भाषा शिकविण्यासाठी एक लाखापेक्षा जास्त उत्तर भारतीय शिक्षकांची गरज असल्याचे सांगितले. त्यांच्या वेतन व इतर सवलतीवर सुमारे ८७० करोड रुपये खर्च होईल. तो खर्च सरकार आमच्याच कडून वसूल करून घेईल.

मी जेव्हा शाळेत होते तेव्हा मराठी, हिंदी,संस्कृत, इंग्रजी, फ्रेंच व जर्मन भाषा तसेच गणित व विज्ञान हे विषय शिकविण्यासाठी मराठी शिक्षक होते व त्यांनी खूप छान पद्धतीने आम्हाला शिकविले. माझे वडील स्वतः उत्तम शिक्षक होते व त्यांनी जवळजवळ 25 ते 30 वर्ष इंग्रजी, गणित, विज्ञान हे विषय शिकविले.

वरील नियम अन्य भाषेच्या संदर्भात लावला तर आपल्याला विदेशी भाषा शिकविण्यासाठी अनेक शिक्षक आयात करावे लागतील व त्यांच्यावर होणारा खर्च हा कितीतरी मोठा असेल व तेवढी माणसांची उपलब्धता असण्याची शक्यता किती आहे.

भाषा ही संवाद, विकास व प्रगतीचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे त्यामुळे बहुभाषिक रहिवाशी संकुलात राहणारे लहान मुले सर्वात जलद सर्व भाषा शिकतात व बोलतात. आपण मोठ्या अभिमानाने माझ्या मुलाला किंवा मुलीला चार भाषा येतात हे सांगतो. आपण त्यांना हिंदी भाषा शिकू नको, बोलू नको असे सांगत नाही आणि सांगितले तरी ती मुले ऐकणार नाही. त्यांना इतर मुलांबरोबर खेळायचे असते. बोलीभाषा ही सदोष असते. जेव्हा आपण एखादी भाषा शाळेत शिकतो तेव्हा ती दोषमुक्त असते. आपण भाषेचे सर्व नियम, व्याकरण समजून घेऊन शिकतो.

नसेल हिंदी भाषा राष्ट्र भाषा किंवा राज्यभाषा पण ती आपली भाषा आहे. आपण विदेशी भाषा शिकतो मग आपली भाषा शिकायला काय हरकत आहे? विदेशी भाषांना अतिरिक्त गुण दिले जात असल्याने, गुणांच्या शर्यतीत ते निर्णयक ठरत असल्याने लोक विदेशी भाषा शिकतात. उद्या जर हे अतिरिक्त गुण काढून टाकले तर कोणी ही विदेशी भाषा शिकणार नाही. विरोधासाठी विरोध करणे हे चुकीचे आहे. आपल्याला जर ज्ञान मिळवायचे असेल तर जास्तीत जास्त भाषा शिकणे आवश्यक आहे.

आपण ज्या प्रदेशात राहतो तिथल्या राज्यभाषेला दुय्यम स्थान देणे हे चुकीचे आहे. सर्वांनी सर्व भाषेचा मानसन्मान ठेवलाच पाहिजे. सरकारच्या ह्या निर्णयाला पाठींबा द्यायचा नसेल तर सारासार विचार करून सुयोग्य व सर्व सामान्य मंजूर होईल असा पर्याय देणे गरजेचे आहे. मला सरस्काराच्या ह्या निर्णयात काही वावगे वाटत नाही. प्रत्येक बाबतीत राजकारण करणे चुकीचे आहे.

■ लीना गाडगीळ, पनवेल.

---

# दोन वेळा फसवणूक झालेली पिढी, आता प्रतिष्ठेवर घाव

शालार्थ घोटाळा

सायबर फसवणुकीनंतर आता ज्येष्ठ शिक्षकांवर शिक्षण खात्याच्या डिजिटल अपयशाचा अन्यायकारक ठपका. मागील काही वर्षांत सायबर फसवणुकीच्या अनेक घटनांमध्ये देशभरातील लाखो ज्येष्ठ नागरिकांनी आपली आयुष्यभराची पुंजी गमावली. एनसीआरबी आणि आरबीआय च्या अहवालांनुसार, २०२० ते २०२४ या कालावधीत भारतात सायबर गुन्ह्यांमुळे तब्बल १० हजार कोटींपेक्षा अधिक आर्थिक नुकसान झाले असून, महाराष्ट्र यात सातत्याने आघाडीवर राहिला.

फसवणुकीची पद्धत साधी होती, ओटीपी सांगणे, फेक लिंकवर क्लिक करणे, ॲप डाऊनलोड करणे झ आणि गुन्हेगारांनी डिजिटल अनभिज्ञतेचा फायदा घेतला. परंतु आता फक्त आर्थिक नुकसान न पुरेसं वाटल्यासारखं वाटतंय झ कारण आता त्या पिढीच्या प्रतिष्ठेलाही सुरुंग लावला जातोय.

**शालार्थ आयडी घोटाळ्यात ज्येष्ठ शिक्षकांचं नाव गोत्यात**

नागपूर जिल्ह्यातील शालार्थ पोर्टलवर बनावट आयडी तयार करून बोगस पगार काढल्याचा प्रकार उघड झाला आहे. यासंदर्भात विशेष तपास पथक ( एसआयटी ) स्थापन करण्यात आलं. मात्र तपासाच्या दिशेबाबत अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. डिजिटल यंत्रणेमधील दोष शोधण्याऐवजी, ६०-७० वयाचे मुख्याध्यापक, संस्थाचालक हेच गुन्हेगार ठरतायेत.

शाळेच्या नियामक कागदपत्रांत नाव असल्याच्या केवळ आधारावर ज्येष्ठ शिक्षकांना पोलिस कोठडीची भीती दाखवली जाते आहे. काही महिला शिक्षक, विधवा, वृद्ध शैक्षणिक कार्यकर्ते, ज्यांनी संगणक हातातही घेतलेला नाही यांच्यावर एसआयटी कायद्याखाली कारवाईचा बडगा उगारला जातोय. ज्यांना आयडी कसे तयार होतात? किंवा लॉगिन म्हणजे काय? याचंही ज्ञान नाही, तेच शासकीय यंत्रणेच्या चुकीमुळे आता गुन्हेगार ठरवले जात आहेत.

**तपासाचा रोख चुकीच्या दिशेने?**

शालार्थ ही पूर्णतः डिजिटल प्रणाली आहे झ जिचं नियंत्रण शिक्षण विभागाकडे आहे. आयडी तयार करणं, ते सक्रिय करणं, वेतन प्रणालीत नोंद करणं हे सर्व सरकारी यंत्रणेकडूनच होतं.

मग तपासाचा केंद्रबिंदू तिथे का नाही?

लॉग तपासले गेले का? कोणी प्रवेश केला हे सिद्ध झालं का? प्रणालीमध्ये कोणत्याही स्तरावर पडताळणीचा अभाव का होता? सरकारने योग्य प्रशिक्षण न देता शिक्षण संस्थांना डिजिटल यंत्रणेत ढकललं, आणि गैरप्रकार घडल्यावर जबाबदारी त्यांच्यावरच ढकलली. ही मोठी शासकीय चूक आहे.

**सन्मानाने वागवा...**

ज्यांनी आपलं आयुष्य शिक्षणसेवेसाठी झिजवलं, त्यांचं नाव आता गुन्हेगारांच्या यादीत टाकणं हे न्याय व्यवस्थेचा पराभव आहे. चुकीचं कोण करतंय, ते शोधा. कारवाई करा. पण ज्येष्ठ शिक्षकांच्या मान-सन्मानावर गदा आणणं थांबवा. त्यांचा पैसा हरवला... आता प्रतिष्ठा तरी वाचवा!



अरूण सोपानराव कराळे
सेवानिवृत्त पदाविधर शिक्षक
एम.ए. (मराठी ), एम.ए. (समाजशास्त्र ), डी.एड. बी.एड., डी.एस.एम
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

---

## वारीची परंपरा आणि पुरोगामी प्रवृत्तींचा डाव

वाचक लिहितात

आषाढी एकादशी म्हटली की, अवघ्या महाराष्ट्राला पंढरपूरची आणि पांडुरंगाची आठवण येते. पृथ्वीतलावरील एक अत्यंत प्राचीन तीर्थक्षेत्र म्हणजे पंढरपूर. आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी असे याचे वर्णन केले जाते. कलियुगात विष्णूचे सगुण रूप म्हणजे साक्षात पंढरपूरची विठ्ठल मूर्ती या विठ्ठलाच्या दर्शनाला भाविक श्रद्धेने पायी वारी करतात कारण पायी वारी केल्याने शारीरिक तप घडते, हे मानले जाते.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरी या ग्रंथाच्या माध्यमातून समाजात भागवत धर्माची स्थापना केली. समाजात भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी नामदींडी, म्हणजेच पंढरपूरच्या वारीची परंपरा सुरू झाली जी आजतागायत अखंडपणे सुरू आहे.

परंतु, या पवित्र वारीमध्ये आज काही दुष्ट प्रवृत्ती, तथाकथित पुरोगामी आणि साम्यवादी मंडळी सामील होत आहेत. संविधान समता दिंडी या नावाखाली हे लोक म्हणे वारकऱ्यांमध्ये राज्यघटनेविषयी जागृती करत आहेत. प्रत्यक्षात हे वारकऱ्यांना भ्रमित करण्याचा प्रयत्न आहे.

संत ज्ञानेश्वर माऊलींनी रेड्यामुखी वेद बोलवले, भिंत चालवली; संत तुकाराम महाराजांचे अभंग इंद्रायणीच्या पाण्यावर तरंगले; तसेच त्यांचे सदेह वैकुंठगमन या दिव्य घटना 'काल्पनिक रम्य कथा' आहेत असे सांगण्यात या मंडळींनी आयुष्य घालवले.

आता मात्र हेच लोक संतांच्या पालख्यांमध्ये सहभागी होत आहेत. संत ज्ञानेश्वर माऊली व जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्याबाबत पूर्वी निंदानालस्ती करणाऱ्यांना संतांचे श्रेष्ठत्व उमगून ते भक्त बनलेत, असे समजणे भाबडेपणाचे ठरेल. या तथाकथित पुरोगामी-साम्यवादी मंडळींनी भक्तीमार्ग स्वीकारलेला नाही; ते वारीचा वापर स्वतःच्या राष्ट्रघातकी अजेंडासाठी करत आहेत. म्हणूनच, अशा मंडळींपासून खऱ्या वारकऱ्यांनी सावध राहायला हवे!

■ सौ. रमा देशमुख
नागपूर

---

# मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी रामबाण ठरतील हे ६ सुपरफूड



डायबिटीस म्हणजेच मधुमेह हा आजार सध्या जगभर झपाट्याने वाढतो आहे. एकदा हा आजार झाला की, तो पूर्णपणे बरा होणं शक्य नसतं, मात्र योग्य आहार आणि जीवनशैलीच्या मदतीने त्यावर नियंत्रण ठेवता येऊ शकतं. विशेषतः उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होतं आणि ब्लड शुगर लेव्हल झपाट्याने वाढण्याची शक्यता असते. अशा वेळी डाएटमध्ये योग्य अन्नपदार्थांचा समावेश केल्यास मधुमेह नियंत्रणात राहतो आणि शरीरही ताजंतवानं राहतं.

**साखर नियंत्रणासाठी कोणते फूड्स फायदेशीर?**

**१. ओट्स :** ओट्स हा एक लो-ग्लायसेमिक इंडेक्स फूड आहे, म्हणजेच यामुळे रक्तातील साखर झपाट्याने वाढत नाही. ओट्समध्ये असणारा फायबर शरीरात साखरेचे शोषण हळूहळू करतो. यामुळे शुगर नियंत्रणात राहते. शिवाय, ओट्समुळे वजन कमी होण्यास मदत होते आणि हृदयाच्या आरोग्यासाठीही ते फायदेशीर ठरतं.

**२. कारले :** कारले हा मधुमेहींसाठी सुपरफूड मानला जातो. यामध्ये ॲक्टिव्ह कंपाऊंड्स असतात जे शरीरात इन्सुलिनची संवेदनशीलता वाढवतात. हे ब्लड शुगर कमी करण्यास मदत करतं. कारले पचनक्रिया सुधारण्यातही उपयुक्त आहे.

**३. दुधी :** उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी आणि हायड्रेटेड राहण्यासाठी लौकी एक चांगला पर्याय आहे. यामध्ये भरपूर पाणी असतं आणि फारच कमी कॅलोरी. मधुमेहींसाठी दुधी खाणं फायदेशीर ठरते. ते वजन घटवण्यास उपयुक्त ठरते आणि पचनतंत्रही सुधारते.

**४. बेरी :** स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी, रास्पबेरी यासारख्या बेरीज अँटीऑक्सिडंट्स आणि फायबरने भरलेल्या असतात. यामुळे शरीरात इन्सुलिन रेजिस्टन्स कमी होतं आणि रक्तातील साखर नियंत्रणात राहते. बेरीज इम्युनिटी सुधारतात आणि हृदयासाठीही फायदेशीर असतात.

**५. काकडी :** काकडी हा उन्हाळ्यातील सर्वात उपयुक्त आणि सहज उपलब्ध होणारा पदार्थ आहे. यामध्ये सुमारे ९५% पाण्याचं प्रमाण असतं, जे शरीराला डिहायड्रेट होण्यापासून वाचवतो. डायबिटीसवरही नियंत्रण ठेवण्यास मदत होते.

**६. भरपूर फायबरयुक्त आहार :** डायबिटीस असणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या रोजच्या आहारात फायबरयुक्त गोष्टींचा समावेश आवर्जून करावा. फायबर पचनक्रिया सुधारते आणि रक्तातील साखरेची पातळी हळूहळू वाढवते. फळं, भाज्या, संपूर्ण धान्य यामध्ये फायबर अधिक प्रमाणात असतो. ■ ■

---

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## आनंदी आनंद गडे ..

बळीच्या चेहऱ्यावरील
हास्य घेतलं नाही हिरावून
निसर्ग एवढा निर्दयी नाही
पाऊसाला देलं पाठवून ..

निसर्गा, तुच आमचा दाता
आम्ही तुझी स्वार्थी लेकरे
पर्यावरणाची करतो हानी
तरी तू बरसला ना गडे ..!

दे आम्हाला सुबुद्धी
कृतज्ञतेने वागण्याची
आमचे गुन्हे अक्षम्य
कृती आहे मुर्खपणाची ..!

# गुडघा, कंबर, खांदा आणि कोपर यांची जॉइंट रिप्लेसमेंट सर्जरी हे जीवन बदलणारे आणि दीर्घकाळ टिकणारे उपाय आहेत!



**यवतमाळ, २६ जून :** पूर्वीच्या पिढीतील अनेक वृद्ध लोक सांध्यांच्या वेदनांसाठी डॉक्टरांकडे जाणे टाळायचे, पण आजचे सक्रिय प्रौढ व्यक्तीं संपूर्ण जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेमुळे मोठा दिलासा मिळवत आहेत. वय वाढल्यामुळे सांध्यांवर झीज होणे ही नैसर्गिक गोष्ट आहे आणि त्यासोबत येणाऱ्या वेदना सुद्धा अपरिहार्य असतात. भारतात वृद्ध व्यक्तींमध्ये सर्वाधिक आढळणारा संधिवाताचा प्रकार म्हणजे ऑस्टियोआर्थरायटिस. आपल्या सांध्यांमधील हाडांच्या टोकांवर झीजप्रतिरोधक उपयुक्त अशा कूर्चा (कार्टिलेज) थर असतो, जो झटका व कंपन शोषून घेतो आणि हाडांना सुरळीत हालचालीस मदत करतो. संधिवातामुळे ही कार्टिलेज हळूहळू झिजते आणि त्यामुळे हाडं एकमेकांवर घासू लागतात, ज्यामुळे तीव्र वेदना होतात. ऑस्टियोआर्थरायटिस सर्व सांध्यांना होऊ शकतो, परंतु कंबर आणि गुडघ्यासारखे वजन सहन करणारे सांधे सर्वाधिक वेदनादायक ठरतात. जे लोक दीर्घकाळ वेदनांमुळे दैनंदिन जीवन जगू शकत नाहीत, विश्रांती दरम्यान किंवा रात्री वेदना होतात, आणि हालचालींमध्ये मर्यादा येतात, अशा रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असते.

जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेचा मुख्य उद्देश म्हणजे झिजलेल्या किंवा दुखापत झालेल्या सांध्यांच्या पृष्ठभागाला मेटल, प्लास्टिक, पॉलीइथिलीन, सिरॅमिक्स किंवा अशा अनेक सामग्रींच्या साहाय्याने बदलणे. आजच्या काळात कृत्रिम सांध्यांचे अधिक प्रकार उपलब्ध झाले आहेत, आणि हाडांच्या आजारांमध्ये तज्ज्ञ असलेले ऑर्थोपेडिक सर्जन्स रुग्णाच्या गरजेनुसार कोणता पर्याय सर्वोत्तम आहे हे ठरवण्यास मदत करतात.

जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेनंतर मिळणारे परिणाम पूर्वीपेक्षा अधिक अधिक स्थिर आणि यशस्वी होत आहेत, याचे श्रेय आधुनिक तंत्रज्ञान, नव्या शस्त्रक्रिया पद्धती आणि प्रगत साहित्याला जाते. काही निवडक रुग्णांमध्ये सबव्हॅस्टस पद्धतीने मिनिमली इनवेसिव्ह गुडघ्याच्या शस्त्रक्रिया करता येते, ज्यामुळे वेदना कमी होतात, रुग्णालयात राहण्याचा कालावधी कमी होतो आणि रुग्ण लवकर बरा होतो. या शस्त्रक्रियेसाठी वयोमर्यादेचे बंधन नाही बहुतांश रुग्ण ५० ते ८० वयोगटातील असतात. योग्य पूर्वतयारी केल्यास जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया अधिक सुलभ ठरते जसे की वजन कमी करणे, शस्त्रक्रियेपूर्व व्यायामाचे नियोजन आणि ऑपरेशननंतर स्वतंत्रपणे चालण्यासाठी घरातील वातावरण सुरक्षित आणि आरामदायक बनवणे.

एका रुग्णाने जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेनंतर स्वतंत्रपणे चालायला सुरुवात केली आणि सांगितले की त्यांनी ही शस्त्रक्रिया करून घेण्यासाठी विनाकारण खूप वेळ वाट पाहिली. खांदा आणि कंबरेचे प्रत्यारोपण झालेल्या रुग्णांमध्ये शस्त्रक्रियेनंतर मोठ्या प्रमाणात सुधारणा दिसून येते. रुग्णांची जागरूकता, आरोग्यशिक्षण, वैद्यकीय सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान, प्रत्यारोपणासाठी लागणाऱ्या उपकरणांची उपलब्धता, वेदनानियंत्रण आणि अॅनेस्थेशिया देण्याच्या आधुनिक पद्धती यामध्ये झालेली प्रगती यामुळेच संधिवाताने त्रस्त रुग्णांसाठी जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया हे एक वरदान ठरले आहे.

# फोनपे आणि एचडीएफसी बँकेने भागीदारी करत सादर केले को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड




**नागपूर, २६ जून :** फोनपे आणि एचडीएफसी बँकेने आज 'फोनपे एचडीएफसी बँक को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड'च्या लाँचची घोषणा केली. या निमित्ताने फोनपेने को-ब्रँडेड कार्ड क्षेत्रात प्रवेश केला आहे. भारतीय ग्राहकांच्या बदलत्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन एचडीएफसी बँकच्या भागीदारीने सादर करण्यात आलेली रुपे को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड्सची ही नवी श्रेणी तयार करण्यात आली आहे. विशेषत: फोनपे प्लॅटफॉर्मवरून करण्यात आलेल्या युपीआय पेमेंट्सवर लाभ उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या लाँचविषयी फोनपेच्या कन्झ्युमर पेमेंट्स विभागाच्या चीफ बिझनेस ऑफिसर श्रीमती सोनिका चंद्रा म्हणाल्या, एचडीएफसी बँकेच्या भागीदारीने आमचे पहिले को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड सादर करत असल्याचा आम्हाला आनंद आहे. ही भागीदारी म्हणजे आमच्या व्यापक युजर बेससाठी नावीन्यपूर्ण आर्थिक सेवा देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. हे कार्ड बिल पेमेंट्स, रिचार्जेस आणि ट्रॅव्हल बुकिंग्ज यांसारख्या निवडक खर्चांवर १०% रिवॉर्ड पॉइंट्स देत असल्यामुळे फोनपेच्या ग्राहकांना त्यांच्या दैनंदिन व्यवहारांवरही फायदे मिळतील. या शिवाय युपीआयच्या माध्यमातून पेमेंट स्वीकारणाऱ्या लाखो व्यापाऱ्यांकडे हे कार्ड सहज वापरता येते. एचडीएफसी बँकेशी झालेली ही धोरणात्मक भागीदारी आणि या कार्डमधील फायद्यांच्या जोरावर कोट्यवधी भारतीयांसाठी क्रेडिट कार्ड वापरण्याच्या अनुभवात अमूलाग्र बदल होईल, असा आम्हाला विश्वास आहे.

एचडीएफसी बँकेच्या पेमेंट्स, लायेबिलिटी प्रॉडक्ट्स, कन्झ्युमर फायनान्स आणि मार्केटिंग, पराग राव म्हणाले, भारतातील कार्ड जारी करणारा आघाडीची कंपनी म्हणून, ग्राहकांसाठी प्रभावी आणि त्यांच्यासाठी उपयुक्त असलेल्या सेवा सादर करण्याचा आणि क्रेडिट सुविधा अर्थपूर्ण पद्धतीने अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न असतो. फोनपेसोबतच्या भागीदारीमुळे आम्हाला डिजिटल व्यवहारांशी सख्य असलेल्या ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी प्राप्त झाली आहे. युपीआयसारख्या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड्स अधिक फायदेशीर ठरतील आणि सहज वापरता येतील. कारण युपीआय हे आज भारताच्या डिजिटल पेमेंट्स इकोसिस्टीममध्ये केंद्रस्थानी आले आहे. या को-ब्रँडेड कार्डच्या माध्यमातून ग्राहकांना एचडीएफसी बँकेच्या विश्वासार्ह क्रेडिट कार्ड प्लॅटफॉर्मचा आणि फोनपेच्या ग्राहककेंद्री डिजिटल अनुभवाचा दुहेरी लाभ मिळतो.

योग्य पात्रता असलेले फोनपे वापरकर्ते फोनपे मोबाईल अॅपवरून या को-ब्रँडेड क्रेडिट कार्डसाठी अर्ज करू शकतात. अर्ज करण्याची प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल आहे. एचडीएफसी बँकेकडून जारी एकदा कार्ड झाले की, युजर ते फोनपेवरून लिंक करू शकतात आणि युपीआय द्वारे व्यापाऱ्यांना पेमेंट करू शकतात. तसेच, वापरकर्ते फोनपे अॅपवरूनच हे कार्ड मॅनेज करू शकतात आणि आपल्या क्रेडिट कार्डचे मासिक बिलही भरू शकतात.

हे कार्ड पात्र फोनपे युजरसाठी टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यात येईल.

## उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत आपल्या भावंडांचा ताबा मिळवण्यासाठी, आपण सक्षम पालक असल्याचे सिद्ध करण्याचा कैरीचा प्रयत्न

**मुंबई, २६ जून :** सोनी सबवर अलीकडेच सुरू झालेली उफ्फ ये लव है मुश्किल ... ही मालिका त्यातील लोभस व्यक्तिरेखा आणि नव्या प्रकारच्या कथानकामुळे लगेच लोकांची आवडती झाली आहे. मालिकेची नायिका कैरी शर्मा (आशी सिंह) एक होतकरू वकील आहे आणि खूप परिश्रमानंतर स्वतःसाठी आणि आपल्या भावंडांसाठी एक स्थिर भविष्य निर्माण करण्याची धडपड करत आहे. पण तिला सतत आयुष्यात धक्के मिळत असतात. कैरीच्या प्रवासात युग (शब्बीर अहलूवालिया)ची मोठी भूमिका आहे. युग एक हुशार आणि गंभीर प्रकृतीचा वकील आहे. त्याचा एक भूतकाळ आहे, ज्यातून त्याचे व्यक्तिमत्व घडले आहे. त्यामुळे या दोघांचा संबंध तितकाच गुंतागुंतीचा आणि तरीही आकर्षक आहे.

आगामी भागांमध्ये, कैरीला मनाविरुद्ध युगच्या हाताखाली इंटर्न म्हणून काम करावे लागणार आहे. त्यांच्यात इतका तणाव असल्यामुळे त्याच्या हाताखाली काम करण्याबाबत कैरी साशंक आहे. या नाजुक परिस्थितीतून मार्ग काढत असतानाच तिला ज्याची भीती वाटत असते, ते घडते. त्यांना सोडून गेलेले तिचे वडील कुंदन (मधुवेंद्र झा) परत येतात आणि तिच्या लहान भावंडांचा ताबा मिळवण्यासाठी दावा करतात. आपल्या भावंडांचे भवितव्य असे अधांतरी असताना, आपण त्यांचा सांभाळ करण्यासाठी सक्षम आणि विश्वास ठेवण्याजोगे पालक आहोत हे कैरीला सिद्ध करावे लागेल. याच वादळात युगचा जुना शत्रू विकी मल्होत्रा (रजत दहिया) देखील अचानक परततो. विकी कैरीला नोकरी आणि नवी सुरुवात करण्याची संधी देऊ करतो. तिने ही नोकरी स्वीकारली तर तिची स्वतःची केस कोर्टात सबळ होणार आहे. युगचा अनियमित पण मनापासून मिळणारा आधार आणि विकीकडून आलेला सुरक्षित नोकरीचा प्रस्ताव यापैकी काय स्वीकारावे या संभ्रमात कैरी आहे. तिने सुरक्षित मार्ग स्वीकारावा की आपल्या मनाचे ऐकावे?

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरीची भूमिका करणारी आशी सिंह म्हणते, आपल्या वडिलांशी आपल्या भावंडांच्या ताब्यासाठीचा लढा, भावंडांबाबतची तिची जबाबदारी आणि तिच्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनात युगने उभी केलेली आव्हाने अशा चौफेर समस्येत कैरी अडकली आहे. मला या कथानकात कैरी जी शांतपणाची ताकद दाखवते, प्रश्न सोडवण्याची वृत्ती दाखवते ते मला फार आवडले आहे. याचे कारण म्हणजे योग्य विचार करण्याची ताकद तिच्यात आहे. बाकी सगळे अनिश्चित असले तरी जे आपल्याकडे आहे ते मनोभावे सांभाळले पाहिजे हे या कथेतून सांगितले आहे. प्रेक्षकांना भावनिक कलाटण्या आणि अनपेक्षित निर्णय बघायला मिळतील.

# डीएस ग्रूपचा पल्स कँडी बनला ७५० कोटी रुपयांचा कन्झ्युमर ब्रँड



**नवी दिल्ली, २६ जून :** धरमपाल सत्यपाल ग्रूप (डीएस ग्रूप) या आघाडीच्या एफएमसीजी बहूउद्योग समुहाने पल्स या त्यांच्या लोकप्रिय ब्रँडच्या यशोगाथेतील महत्त्वाच्या टप्प्याची घोषणा केली आहे. पल्स कँडीने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ७५० कोटींहून अधिक ग्राहक किमतीचा टप्पा नोंदवला आहे. म्हणजे या एका वर्षात ७५० कोटी पल्स कँडीज विकल्या गेल्या. यामुळे ही भारतातील सर्वाधिक वितरित झालेली हार्ड बॉइल कँडी ठरली आहे. हार्ड बॉइल कँडी विभागात मागील ९ वर्षांपासून असलेले पल्सचे अबाधित स्थान आणि ग्राहकांमधील शाश्वत लोकप्रियता या यशामुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे. भारतातील पारंपरिक कन्फेक्शनरी ब्रँड म्हणून पल्सला विविध पद्धतीने आणि विविध पातळ्यांवर उत्क्रांत करणे हा डीएस ग्रूपचा उद्देश आहे. संबंधित उत्पादन विभागांमधील प्रवेश, नाविन्यपपूर्ण नव्या पद्धतीने हाताळणी आणि प्रादेशिक चवींच्या समृद्ध वारशाचा लाभ घेणे अशा धोरणात्मक पद्धतीने आम्ही ही वाटचाल करत आहोत. ब्रँडची ओळख निर्माण करणे, ग्राहकांचा सहभाग वृद्धिंगत करणे आणि बाजारपेठेत अधिक सखोल अस्तित्व निर्माण करणे यावर सतत भर दिल्याने आम्हाला नेतृत्व स्थान टिकवून ठेवण्यात साह्य लाभले. आम्ही व्यवसायवृद्धीसाठी देशातील आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही बाजारपेठांमध्ये प्रचंड सक्रिय आहोत. देशात आमच्या दमदार वितरण जाळ्याचा वापर आम्ही करत आहोत. आजघडीला भारतभरात आम्ही ३५ लाखांहून अधिक आऊटलेट्सपर्यंत पोहोचलो आहोत, असे डीएस ग्रूपचे उपाध्यक्ष राजीव कुमार म्हणाले.

फळांची चव आणि गमतीशीर झटका देणारी आंबटगोड चव असा मेळ असणाऱ्या पल्समुळे ग्राहकांना अतुलनीय चवींचा आनंद मिळतो, विशेषत: कैरीची आंबटगोड चव असणाऱ्या पल्समुळे. काही काळापूर्वी कँडींचे स्वरूप काहीसे पाश्चिमात्य पद्धतीचे होते. त्यामुळेच, भारतातील आंबटगोड चवींच्या प्राधान्यक्रमाला ही अनोखी चव साजेशी ठरली. आता वस्तूंच्या मुल्यासंबंधी अधिक सजग झालेल्या भारतीय ग्राहकाच्या आवडीनिवडीचे प्रतिक म्हणून पल्स कँडीने ओळख निर्माण केली. आता या बदलेल्या परिस्थितीला समजून घेत डीएस ग्रूपने आपले किमतींचे धोरणही विचारपूर्वक राबवले. जेव्हा ८६ टक्के हार्ड बॉइल कँडी ५० पैशांना मिळत होती तेव्हा पल्सने अत्यंत धाडसाने रुपया किमतीवर पदार्पण केले. ही फक्त अधिक किंमत नव्हती हे अधिक मूल्य होते, जे आपल्या चवींच्या संवेदना आणि आपली क्रयशक्ती या दोन्ही बाबींना साजेशी ठरली, असे कुमार पुढे म्हणाले.

## माझे पात्र क्वचितच बोलते पण नेहमीच बाजी मारून जाते : निखिल आर्या

मुंबई, २६ जून : सोनी सबवरील तेनाली रामा ही एक ऐतिहासिक मालिका आहे. या मालिकेत तेनाली (कृष्ण भारद्वाज) रामाच्या चातुर्याच्या आणि सुजाणतेच्या रोचक कथांची मांडणी केली आहे. ही मालिका सर्व वयोगटातील लोकांच्या पसंतीस उतरली आहे. या मालिकेतील एक अत्यंत मनोरंजक पात्र आहे, विजयनगर साम्राज्यातील कोतवालाचे. हा शांत स्वभावाचा कोतवाल निखिल आर्य या अभिनेत्याने खूप ताकदीने आणि गांभीर्याने साकारला आहे. अत्यंत तीव्र, उत्कट प्रसंगांमध्ये देखील त्याचा शांत, अबोल परफॉर्मन्स उठून दिसतो. या मनमोकळ्या संभाषणात निखिल आर्यने या मालिकेविषयी, आपल्या प्रभावी व्यक्तिरेखेविषयी आणि आपल्या सह-कलाकारांशी असलेल्या नात्याविषयी सांगितले आहे.

१. तेनाली रामा मालिकेत इतिहास आणि जीवनोपयोगी धडे यांची सांगड घालून ते मिश्रण मनोरंजक पद्धतीने सादर केले आहे. एक अभिनेता म्हणून या मालिकेतील कोणत्या गोष्टीने तुला आकर्षित केले?

मला या मालिकेचे स्वरूप, त्याचा फॉरमॅट फार आवडला. देव, भव्य दिव्य युद्ध यांनी भरलेल्या सर्वसामान्य ऐतिहासिक मालिकांपेक्षा ही मालिका वेगळी आहे. यामध्ये गंभीर रहस्ये हलक्या-फुलक्या, मजेदार आणि उपरोधाच्या शैलीत सोडवली जातात.

२. तुझी व्यक्तिरेखा खूपच बदलली, मोठी झाली आहे. तुला समाधान देणारे (किंवा आव्हानात्मक वाटलेले) क्षण कोणते? तुझ्या व्यक्तिरेखेच्या प्रवासाशी तुझे स्वतःचे किती साधर्म्य आहे?

मला आनंद वाटतो की, माझी व्यक्तिरेखा खूप बदलत गेली आहे. मी राज्याच्या कोतवालाची भूमिका करत आहे. हा एक अत्यंत गंभीर माणूस आहे, जो क्वचितच हसतो किंवा बोलतो. पण उत्कट आणि गंभीर परिस्थितीत त्याचे निर्विकार चेहऱ्याने वावरणे काम करून जाते. शांत दृश्यांपासून भावनिक गहिरेपण असलेल्या दृश्यांपर्यंतचा प्रवास समाधानकारक आहे.

३. संवादांवर फारसे विसंबून न राहता तुझी व्यक्तिरेखा प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेते. अशा प्रकारे शब्दांपेक्षा हालचालींवर आधार ठेवणाऱ्या या परफॉर्मन्सबाबत तुझा काय दृष्टिकोन आहे?

खरं तर तीच या भूमिकेतील सगळ्यात आव्हानात्मक आणि गंमतीशीर गोष्ट आहे. तुम्हाला फार अंगविक्षेप करावे लागत नाहीत, विनोद करण्यासाठी आवाजी व्हावे लागत नाही- सगळा भर टायमिंग, हावभाव आणि निर्विकारपणावर आहे. असे करून लक्ष वेधून घेता येणे तसे कठीण असते, पण ते एकदा क्लिक झाले की, ते खूपच मजेदार होते आणि उठून दिसते. ही या भूमिकेतली मजा आहे.

४. इमानदारी, बुद्धीचातुर्य आणि न्यायप्रियता हे तुझ्या व्यक्तिरेखेचे मुख्य गुण आहेत. व्यक्तिरेखा साधी आणि चारचौघांसारखी ठेवून हे गुण पडद्यावर आणण्यासाठी तू काय तयारी केलीस?

हे गुण व्यक्तिशः माझ्याशी खूप मिळतेजुळते आहेत. फक्त फरक इतकाच आहे की ही व्यक्तिरेखा अगदी वेगळ्या काळातील आहे. त्यामुळे त्यादृष्टीने पात्र जिवंत करण्यासाठी देहबोली आणि भाषा यावर मला जास्त काम करावे लागले.

५. तुझे काम प्रामुख्याने कुणाल, आदित्य आणि कृष्ण यांच्यासोबत असते. पडद्याच्या मागे तुमच्यातील सख्याचा पडद्यावरील परफॉर्मन्सवर किती प्रभाव पडला आहे? पडद्यामागचा एखादा प्रसंग सांगता येईल का, ज्यामधून तुमच्यातील खेळकर संबंध दिसून येतील?

पडद्याच्या मागे आमच्यात जे सख्य आहे ते अर्थातच पडद्यावर प्रतिबिंबित होते. आमच्या चौघांचे खरोखरच खूप छान जमते. त्या मोकळेपणामुळे आमची दृश्ये सहज उतरतात. एक गंमतीशीर आठवण अशी आहे की, एकदा मला एका दृश्यासाठी खूप कौतुक मिळाले पण नंतर समजले की मी विग घालायला विसरूनच गेलो होतो! मेकअप करणारा मला कोतवालच्या केसांचा विग घालायला विसरला होता.

## जेव्हा सानंद वर्मा यांना समजले, 'आय लाइक इट' हे वाक्य घराघरामध्ये लोकप्रिय ठरले आहे!

**मुंबई, २६ जून :** एण्ड टीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर है' भारतीय टेलिव्हिजनवरील दीर्घकाळपासून सुरू असलेली मालिका आहे, तसेच ही मालिका प्रेक्षकांमध्ये खूप लोकप्रिय ठरली आहे. मालिकेमधील विनोदी एपिसोड्स प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहेत, तसेच विलक्षण पात्र आणि त्यांच्या संस्मरणीय संवादांनी प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. यापैकी एक भूमिका आहे अनोखे लाल सक्सेना, जी प्रतिभावान अभिनेते सानंद वर्मा साकारत आहेत. त्यांचा ट्रेडमार्क संवाद 'आय लाइक इट'ने सोशल मीडियावर धुमाकूळ निर्माण केला आहे, ज्यावर अनेक मीम्स व व्हिडिओज बनवण्यात आले आहेत. या संवादाच्या लोकप्रियतेबाबत सांगताना सानंद वर्मा ऊर्फ अनोखे लाल सक्सेना म्हणाले, ''प्रेक्षक माझ्या भूमिकेचे, विशेषत: संवादाचे कौतुक करत असल्याचे पाहून मला खूप आनंद होत आहे. मला मिळणारे प्रेम व प्रतिक्रिया उत्साहवर्धक आहेत आणि मी त्यांचा खूप आनंद घेतो. यामधून मालिकेवरील प्रेक्षकांचे प्रेम दिसून येते.''

या संवादाच्या लोकप्रिय प्रभावाबाबत समजलेल्या पहिल्या क्षणाबाबत सांगताना सानंद म्हणाले, ''एकदा मी मुंबईत होतो, तेव्हा माझी भेट एका शेजाऱ्याशी झाली, जो व्यावसायाने पोलिस अधिकारी आहे. गप्पागोष्टी करताना त्याने एक घटना सांगितली, ज्याबाबत तो गोंधळून गेला. त्याने सांगितले की तो त्याच्या मुलाला ओरडत होता आणि मुलगा शांतपणे म्हणाला 'आय लाइक इट'. माझा शेजारी गोंधळून गेला आणि मुलाला तसे का म्हणाला याबाबत विचारले. तेव्हा त्याच्या पत्नीने स्पष्टीकरण केले हा मालिका 'भाबीजी घर पर है'मधील लोकप्रिय संवाद आहे, सक्सेना त्यांची भूमिका साकारताना म्हणतात. त्यानंतर त्याने स्वत: मालिका पाहायला सुरूवात केली. आज, ही त्याची आवडती मालिका आहे आणि मला वाटते की त्याला देखील ही भूमिका आवडते.'' सानंद पुढे म्हणाले, दैनंदिन जीवनात असो किंवा कोणत्याही संमेलनामध्ये असो चाहत्यांसोबत संवाद साधताना मी नेहमी भावूक होतो. बॉलिवुड पार्टी व सामाजिक कार्यक्रमांमध्ये देखील लोक हा संवाद म्हणत माझ्या भूमिकेचे कौतुक करतात.

# बजाज फिन्सर्व्ह एएमसीचा स्मॉल कॅप फंड लॉन्च: गुणवत्ता, वाढ आणि मूल्य या ३ इन १ फायद्यासह

**नागपूर, २६ जून :** बजाज फिन्सर्व्ह एएमसीने बजाज फिन्सर्व्ह स्मॉल कॅप फंडच्या सुरूवातीची घोषणा केली आहे. हा एक ओपन-एंडेड इक्विटी योजना असून, प्रामुख्याने स्मॉल कॅप शेअर्समध्ये गुंतवणूक करतो आणि गुणवत्ता, वाढ व मूल्य यांचा लाभ देतो. या फंडासाठी सदस्यता २७ जून २०२५ पासून सुरू होणार असून, ११ जुलै २०२५ रोजी बंद होणार आहे.

BAJAJ FINSERV

सध्या स्मॉल कॅप शेअर्समध्ये नुकत्याच झालेल्या घसरणीमुळे दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी आकर्षक प्रवेश बिंदू उपलब्ध झाला आहे. जरी ८०% हून अधिक स्मॉल कॅप कंपन्यांनी ३८% इतक्या मजबूत नफ्याच्या वाढीबरोबरच चांगले रिटर्न रेशो नोंदवले असले, तरी बहुतांश कंपन्यांचे व्यवहार अजूनही त्यांच्या ५२ आठवड्यांच्या उच्चांकाच्या १५% ते ४५% खाली सुरू आहेत. या अलीकडील बाजार घसरणीमुळे या कंपन्यांच्या वास्तविक मूल्यात आणि सध्याच्या बाजार किमतीत एक स्पष्ट फरक निर्माण झाला आहे.

मेक इन इंडिया उपक्रमाचा जोर, वाढती औपचारिकता आणि विविध क्षेत्रातील डिजिटल रूपांतरण यासारख्या संरचनात्मक सकारात्मक प्रवाहांमुळे स्मॉल कॅप कंपन्या आगामी विकास चक्रात अतिरिक्त प्रमाणात लाभ घेण्याच्या उत्कृष्ट स्थितीत आहेत, ज्यामुळे ही गुंतवणुकीसाठी एक आकर्षक संधी ठरते.

या लाँचविषयी बोलताना, बजाज फिन्सर्व्ह एएमसीचे व्यवस्थापकीय संचालक गणेश मोहन म्हणाले, स्मॉल कॅप फंड चा लाँच हा भारतातील गतिशील स्मॉल कॅप शेअरविश्वाच्या दीर्घकालीन संभाव्यतेवरील आमच्या ठाम विश्वासाचे प्रतीक आहे. स्मॉल कॅप शेअर्समध्ये सामान्यत: व्यापक निर्देशांकांच्या तुलनेत अधिक अस्थिरता दिसून येते, त्यामुळे बाजारातील चढ-उतारांमधून मार्ग काढण्यासाठी आणि गुणवत्तापूर्ण संधी ओळखण्यासाठी सक्रिय व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित होते. ही रणनीती अशा उच्च-गुणवत्तेच्या कंपन्यांना ओळखण्यावर आधारित आहे, ज्या त्यांच्या वाढीच्या सुरुवातीच्या टप्प्यात आहेत आणि काळानुसार अधिक चांगले प्रदर्शन करु शकतात. अलीकडील स्मॉल कॅप घसरण लक्षात घेता, हा नवीन फंड ऑफर (एनएफओ) या सुवर्णसंधीचा फायदा घेण्याच्या योग्य स्थितीत आहे आणि गुंतवणूकदारांना अशा व्यवसायांमध्ये भाग घेण्याची संधी मिळवून देतो, जे दीर्घकाळात प्रगती करतील आणि अर्थव्यवस्थेत प्रभावी आणि सार्थक योगदान देतील.

फंडामध्ये किमान अर्ज रक्कम रुपये ५०० (त्यापुढील रु.१च्या पटीत) असून, किमान अतिरिक्त अर्ज रक्कम रुपये १०० (त्यापुढील रु.१ च्या पटीत) आहे. वाटपाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत गुंतवणूक रिडीम केल्यास १% एक्झिट लोड लागू होईल. या फंडामध्ये वाढ आणि आयडीसीडब्ल्यू (इन्कम डिस्ट्रीब्युशन कम कॅपिटल विदड्रॉवल) असे दोन्ही पर्याय उपलब्ध आहेत.

## आज का अंदाज

शुक्रवार २७ जून २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ८ | ४ | ५ | ६ | ९ |
| २३६ | १५६ | १६८ | २६० | १५८ | १४० | ६०० | २३४ |
| ४७० | २३७ | ३४८ | ४५९ | ६८० | २६७ | १२३ | ४५० |
| १२८ | ५७० | २३० | ३५० | ३५६ | ७८० | ३३० | ३६० |
| १० | २० | ५४ | ८४ | ४० | ५० | ६७ | ९७ |
| १९ | २९ | ५३ | ८३ | ४१ | ५१ | ६८ | ९८ |
| १७ | २७ | ५६ | ८६ | ४२ | ५२ | ६३ | ९३ |

**२७ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | ६२ | ७३ | ०३ |
| ३४ | ६४ | ७५ | ०५ |
| ३० | ६० | ७८ | ०९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## गौतम अदानी यांच्या ६३व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन



**अहमदाबाद, २६ जून :** २४ जून रोजी अदानी समूहाचे चेअरमन श्री गौतम अदानी यांचा ६३वा वाढदिवस साजरा करण्याच्या निमित्ताने, अदानी ग्रुपची सामाजिक कल्याण आणि विकास शाखा असलेल्या अदानी फाउंडेशनने देशभरातील २१ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांतील २०६ शहरांमध्ये भव्य रक्तदान मोहीम आयोजित केली. ही मोहीम मागील वर्षीच्या २५,२८२ युनिट्सच्या विक्रमावर मात करत विक्रमी ठरली आहे. अदानी हेल्थकेअर टीमच्या नेतृत्वाखाली राबवलेल्या या मोहिमेत अदानी समूहाचे कर्मचारी आणि भागीदार यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. या मोहिमेत २७,६६१ युनिट्स (सुमारे ११,१०० लिटर) रक्त संकलित झाले असून, यामुळे ८३,००० हून अधिक रुग्णांना लाभ होणार आहे. या संकलित रक्तामधून पूर्ण रक्त, पीसीव्ही, प्लेटलेट कॉन्सेंट्रेट्स, प्लाझ्मा, एफएफपी, क्रायोप्रेसिपिटेट आणि अल्ब्युमिन असे विविध रक्तघटक उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, जे रुग्णांना जीवनदायी उपचारासाठी उपयुक्त ठरतील. अदानी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदानी म्हणाल्या, या सेवाभावी उपक्रमात पुढे येऊन सहभाग नोंदविलेल्या आपल्या अदाणी परिवाराचे मी मनःपूर्वक आभार मानते. आपल्या उदारतेमुळे असंख्य जिवांचे आयुष्य उजळणार आहे. ही मोहीम रेड क्रॉस ब्लड बँक आणि शासकीय रुग्णालयांच्या सहकार्याने राबवली गेली. या मोहिमेला अदानी समूहातील ३,००० हून अधिक डॉक्टर, पॅरामेडिक्स, डेटा ऑपरेटर्स आणि प्रशासनिक कर्मचारी यांनी पाठिंबा दिला.

## राशीभविष्य

**मेष :** आज जमिनीशी संबंधित कामात अडथळे येऊ शकतात. दुसजया कोणाकडे नवीन व्यवसायाची जबाबदारी देण्याऐवजी, तुम्ही ते स्वत: घ्यावे. अन्यथा नुकसान होऊ शकते.

**वृषभ :** आज तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा. अन्यथा भांडण होऊ शकते. कामाच्या ठिकाणी अतिरिक्त जबाबदाजयांमुळे त्रास होईल. तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते.

**मिथुन :** आज व्यवसायात अनावश्यक धावपळ होईल. महत्त्वाचे काम पूर्ण होत असताना अडथळे येऊ शकतात. आयात-निर्यात या कामात गुंतलेल्या लोकांना कठोर परिश्रमानंतर लक्षणीय यश मिळेल.

**कर्क :** आजचा दिवस सामान्य राहील. तुमचे आरोग्य उत्तम राहील. आज तुम्ही एखाद्या लांबच्या प्रवासाला जाऊ शकता. वाहन जपून चालवा. मित्रांकडून आर्थिक मदत मिळेल. व्यवसायात फायदा होईल.

**सिंह :** आज तुमचे मनोबल वाढेल. नोकरीसाठी तुमचा शोध पूर्ण होईल. तुमचा विश्वास अचानक एखाद्या विशिष्ट विषयात रूची वाढेल. व्यवसायात सुसंवाद राखा. यामुळे तुमचे संपर्क वाढतील.

**कन्या :** कामाच्या ठिकाणी नोकरांच्या वाईट वागण्यामुळे तुमच्या मनात असंतोष निर्माण होईल. कधीकधी संघर्षाची परिस्थिती निर्माण होईल. महत्वाचं काम झाल्याने आज तुमची चिंता मिटेल.

**तुळ :** व्यवसायातील तुमच्या समजूतदारपणामुळे मोठ्या नुकसानापासून वाचाल. आज आर्थिक क्षेत्रात, अडकलेले पैसे उशिरा मिळतील. जमिनीशी संबंधित कामातून नफा होईल. घर बांधणीत अडथळे येतील.

**वृश्चिक :** आज तुमची तब्येत काहीशी नरम असेल. जर तुम्ही कोणत्याही गंभीर आजाराने ग्रस्त असाल तर तुमचे आरोग्य सुधारेल. प्रवासात असताना आरोग्याकडे अधिक लक्ष पुरविणे आवश्यक आहे.


**धनु :** आज सुख-सुविधांमध्ये अडथळा येईल. घरगुती जीवनात तुम्हाला तुमच्या जोडीदारापासून दूर जावे लागू शकते. वाटेत अचानक तुमचे वाहन बिघडल्याने तुम्ही अस्वस्थ व्हाल. आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका.

**मकर :** व्यवसायात गुंतलेल्या लोकांना नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्याने यश मिळेल. आयात-निर्यात क्षेत्रात गुंतलेल्या लोकांना फायदा होईल. सरकारी क्षेत्रात काम करणाजयांना संघर्ष करावा लागेल.

**कुंभ :** काही वाद होण्याची शक्यता आहे. नफ्याचा एक नवीन मार्ग उघडेल. वाईट संगत टाळा. अन्यथा, मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. कुटुंबासोबतचे संबंध सुधारतील.

**मीन :** आजचा दिवस आनंदाचा आणि नफ्याचा असेल. लोकांना नोकरीत त्यांच्या सहकाजयांशी अधिक समन्वय निर्माण करावा लागेल. व्यवसाय क्षेत्रात काम करणाजया लोकांना व्यवसायात नफा मिळण्याचे संकेत आहेत.

## शब्दकोडे क्रमांक २१४७




**आडवे शब्द :-**
१) जुना, प्राचीन
५) धोकादायक
९) वाळवी
११) गरजू नडलेला
१३) जागर, झोपेचे खोबरे
१५) किंमत
१६) दंत
१७) नर्तक (चेष्टेत)
१८) चौकशी, विचारपूस
२०) आश्रय
२२) पुरुष
२४) कॅल्क्युलेटरला मराठी शब्द
२५) एक भटकी जमात
२६) शिकारीचा प्राणी
२७) कुचेष्टा, उनाडपणा
३१) वेळ, मृत्यू
३२) रचलेले कारस्थान
३५) उंटाच्या पाठीवरील उंचवटा, भिस्त
३६) तारणपत्र
३९) चकचकीत
४२) निमग्न, रममाण
४३) मान्य करणे
४४) मार्गक्रमण
४६) हालचाल
४९) गोजी, पाडी,
५१) प्लॅटफॉर्मला मराठी शब्द
५२) बंदी
५३) गुरे राखणारा
५४) मैत्रीण
५५) पशू, श्वापद
५७) वनबाला, एका जुन्या नटीचे नाव
६०) शल्य, मनाला टोचणारी रुखरुख
६१) युद्धासाठी उतावीळ झालेला
६३) कामाची गर्दी
६५) थेट
६७) कप्पा, चोळीचे कापड
६८) मनाने घेतलेली भीती
७०) सोने
७२) भारतभर प्रवास
७४) उत्तराधिकारी
७६) मासे पकडणारी जमात
७७) नग, उंच डोंगर
७८) गोष्ट

**उभे शब्द :-**
२) रंगढंग करण्याचे विलासमंदिर
३) होडी
४) दृष्टी
५) झाडाचे टॉनिक
६) एखादी गोष्ट फुगवून सांगणे
७) साप
८) जे करावयास पाहिजे ते न करता नको ते करणाऱ्या वृत्तीचा
१०) सर्व, एकूणएक
१२) नमस्कार
१४) योग्य, उचित
१५) सेवक
१८) चावट
१९) अनेकवेळा
२१) श्रीरामाची चरित्रगाथा
२३) रसदार
२८) डावा
२९) खेकडा
३०) रत्नाकर
३१) सापाने सोडलेली त्वचा
३३) एकाग्र नजर
३४) नवऱ्याचा भाऊ
३७) जादू, हस्तलाघव
३८) खोदकाम
३९) जन्ममृत्यू
४०) पालट
४१) दरवाजा
४३) सामान
४५) चावणारा
४७) केसांची बट
४८) बढाई, बडबड
४९) कावळ्याचे ओरडणे
५०) मुख, चेहरा
५१) फसणे
५३) फुलांचा राजा
५५) पाणी
५६) जेवणातील दोन पदार्थ
५८) दुष्ट माणूस
५९) छोटा, लहान
६०) च्या सह
६२) च्या - - बद्दल
६४) इमारतीच्या पायात भरण्याचा दगडी प्रकार
६६) कोवळी फांदी
६९) हुक्की, लहर
७१) बशीचा जोडीदार
७३) भास
७४) वाचा, किराणा व्यापारी
७५) पडसे

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अहोरात्र काम करून केला खारघरचा वीजपुरवठा सुरळीत

**मुंबई, दि. २६ : प्रतिनिधी**

पनवेल शहर विभागांतर्गत भिंगारी उपविभागातील ३३ के व्ही अधिराज उपकेंद्रास पुरवठा करणाऱ्या मुख्य वाहिनीवर फॉल्ट होऊन केबलला आग लागली. त्यासोबत असणारा केबल डक्ट मधील इतर केबल सुद्धा आगीच्या भक्षस्थानी पडल्या व सेक्टर २९ येथील मुख्य स्विचिंग उपकेंद्रास पुरवठा करणाऱ्या इतर उच्चदाब वाहिन्या नादुरुस्त झाल्या. त्यामुळे, खारघर येथील टाटा-१ व टाटा-२ तसेच सेक्टर ३५ व सेक्टर ३६ येथील वीजपुरवठा खंडित झाला होता. महावितरण खारघर उपविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २० तास अविरत काम करून वीजपुरवठा सुरळीत केला.मा. मुख्य अभियंता, भांडुप परिमंडल श्री. संजय पाटील व वाशी मंडळ चे अधीक्षक अभियंता श्री. दीपक पाटील हे स्वतः लक्ष देऊन वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना



मार्गदर्शन केले व काम सुरु असलेल्या जागेवर जाऊन कामाची पाहणी केली. अहोरात्र अथक परिश्रम करून आज दि. २५ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजता सर्व फीडर चार्ज करून बाधित झालेल्या वीजपुरवठा यशस्वीरित्या पूर्ववत करण्यात आला आहे.

३३ के व्ही अधिराज फिडर जळाल्यामुळे ३३ केव्ही चे ६ केबल नादुरुस्त झाले होते. १२६ वितरण रोहित्र बाधित झाले होते व २ उपकेंद्र बंद पडले होते, खारघर येथील टाटा-१ व टाटा-२ मधील १२ रोहित्र, एसव्हीकेएम कॉलेज येथील २ रोहित्र बाधित झाला होता. यामुळे, सेक्टर ३५ चा वीजपुरवठा खंडित झाला होता. सर्व केबल डक्ट मध्ये असल्यामुळे व सदर डक्ट कॉंक्रीट रस्ताखाली बंदिस्त असल्याने फॉल्ट शोधणे अत्यंत कठीण होते. तसेच, पूर्ण डक्ट मधून खूप धूर येत होता. अग्निशमन दलाचा मदतीने आग विजावण्यात आली. नंतर खोदकाम करून नादुरुस्त केबल काढून दुसरे नवीन केबल टाकण्यात आले. सदर काम खूप अवघड असुन वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी रात्रभर युद्धपातळीवर काम करून वीजपुरवठा यशस्वीरित्या सुरु केला. वीजपुरवठा खंडित असून पण बाधित ग्राहकांनी दाखवलेल्या संयम व सहकार्याबद्दल महावितरण त्यांचे आभारी आहे.

# आई कामाला गेली अन् चिमुरडीचे अपहरण

## पोलिसांनी मोठ्या शिताफीने आरोपीला केलं जेरबंद

**बदलापूर, दि.२६ : प्रतिनिधी**

बदलापूरमध्ये एका चिमुकलीचे अपहरण झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.बदलापूर पश्चिमेकडील रमेशवाडी परिसरात राहणाऱ्या या चिमुकलीची आई कामाला गेली होती.याचाच फायदा घेत त्या आरोपीनं चिमुकलीचं अपहरण केले. या घटनेची माहिती मिळताच बदलापूर पश्चिम पोलिसांनी मोठ्या शिताफीने तपासाची चक्रे फिरवत मुलीची मध्य प्रदेशमधून सुटका केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली असून या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.घडलेला विषय अतिशय संवेदनशील असल्याकारणाने आणि चिमुकलीचा जीव धोक्यात असल्यानं पोलिसांनी या गुन्ह्याच्या तपासात खूप काळजी घेतली . पोलिसांनी चार पथकं तयार केली. ही चार पथक पाठवून आरोपीच्या शोधात विविध ठिकाणी ती रवाना केली होती.

पोलिसांनी ज्या ठिकाणाहून मुलीचं अपहरण झाले होते त्या ठिकाणच्या परिसरापासून ते रेल्वे स्टेशन आणि शहरातून बाहेर जाणाऱ्या महामार्गाच्या परिसरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे तपासून काढले आहेत. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता आरोपी एका ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे माग काढत आरोपी मध्य प्रदेशला गेल्याचे तपासात समजले आहे. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने मध्य प्रदेशमधील छिंदवाडा या भागातून आरोपीला ताब्यात घेतले आहे यासाठी बदलापूर पोलिसांनी मध्यप्रदेश मधील उमरेठ पोलिसांची मदत घेत या आरोपीला जेरबंद केले. दरम्यान, या चिमुकलीची पोलिसांनी सुखरूपपणे सुटका केली आहे. आरोपींना या चिमुकलीचं अपहरण का केलं होतं हे कारण अजून समोर आलेले नाही. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहे.

# तोतया सीबीआय अधिकाऱ्यांसोबत बिल्डरच्या घरी छापा

## कॉंग्रेसच्या पर्यावरण विभागाच्या प्रदेशाध्यक्षावरही गुन्हा; कॉंग्रेसकडून पदावरून हकालपट्टी

**वसई, दि. २६ : प्रतिनिधी**

कॉंग्रेसच्या पर्यावरण विभागाच्या प्रदेशाध्यक्षासह सीबीआय अधिकारी असल्याची बतावणी करून पैसे मागण्यात आल्याची तक्रार वसईतील बिल्डरने केल्यानंतर बोरीवलीच्या कस्तुरबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर कॉंग्रेसच्या पर्यावरण विभागाचे प्रदेशाध्यक्ष समीर वर्तक यांची पदावरून हकालपट्टी करण्यात आली आहे.

वसईतील बिल्डर अनिल गुप्ता यांच्या बोरीवली येथील राहत्या घरी दोन जण सीबीआयचे अधिकारी असल्याची बतावणी करत चौकशीच्या बहाण्याने घुसले होते. तुमच्या विरुद्ध समीर वर्तक यांची तक्रार असल्याचे सांगत तोतया सीबीआय अधिकाऱ्यांनी समीर वर्तक यांनाही बोलावून घेतले. यावेळी समीर वर्तक यांच्याशी तडजोड करून घ्या, अन्यथा तुम्हाला परिणाम भोगावे लागेल, अशी धमकी देऊन ते निघून गेल्याची फिर्याद अनिल गुप्ता यांनी कस्तुरबा पोलीस ठाण्यात दिली. पुरावा म्हणून त्यांनी घराबाहेरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात झालेले चित्रीकरणही पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. त्यानंतर पोलीस ठाण्यात समीर वर्तकसह दोन अज्ञात इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी समीर वर्तक यांची पदावरून हकालपट्टी केली आहे. तसेच याप्रकरणी चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश कॉंग्रेसचे वसई विरार जिल्हाध्यक्ष ओनिल अल्मेडा यांना दिले आहेत.

कॉंग्रेस जिल्हा उपाध्यक्ष

> पर्यावरणाची हानी केलेल्या व्यावसायिकाविरुद्ध मी केलेल्या पर्यावरण विषयातील तक्रारीमुळे सूडबुद्धीने हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजकीय प्रगती रोखण्याचे हे षडयंत्र आहे.
>
> **- समीर वर्तक**

आर्नोल्ड जिगुर व अन्य चार जणांविरोधात बेकायदा बांधकाम केल्याप्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात एमआरटीपी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आर्नोल्ड जिगुर यांच्यासह इतर चार जणांनी वसई विरार महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक संदेश राणे करीत आहेत.

याप्रकरणी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी वसई विरार शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष ओनील आल्मेडा यांच्याकडून संपूर्ण प्रकारणाचा लेखी अहवाल मागवला आहे. समीर वर्तक यांनी लेखी खुलासा त्वरित न दिल्यास त्यांच्यावर कठोर कारवाईचे आदेश आहेत. पर्यावरण विभागाच्या नावाखाली अनेक ठिकाणी केलेल्या भ्रष्टाचार आणि वसुली बाबतची माहिती जिल्हा कॉंग्रेसकडून मागवण्यात येत आहे. कॉंग्रेस पक्षाच्या व पदाच्या नावावर ज्यांनी ज्यांनी वसुली केली आहे,त्या सर्वांवर कडक कारवाईची मागणी आता जिल्हा कॉंग्रेसच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून होत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात कॉंग्रेसमधील वसूलीबाज पदाधिकाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार असल्याचे कॉंग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

# फुटबॉल खेळण्यावरून हाणामारी

**भाईंदर, दि. २६ : प्रतिनिधी**

मीरा रोड येथील पूनम क्लस्टर इमारतीच्या आवारात मुले फुटबॉल खेळत असताना झालेले भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या एकाला तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. अबुहुजेफा खान मुलांसोबत फुटबॉल खेळत असताना युवराज सिंग याचा त्याच्याशी वाद होऊन भांडण विकोपाला गेले. अबुहुजेफा खान याचे काका अन्वर युसुफअली भांडण सोडवण्यासाठी गेले असता संतापलेल्या युवराज सिंग याच्यासह मित सिंग, आर्यन सिंग यांनी अबुहुजेफाला बेदम मारहाण केली. यात तो गंभीर जखमी झाला. याप्रकरणी अब्जुचर खान याच्या तक्रारीवरून युवराज, मित आणि आर्यनविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 40 लाखांची चोरी करणारा गजाआड

**भाईंदर, दि. २६ : प्रतिनिधी**

१५ जूनच्या रात्री घरातील कपाटातील सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह ४० लाखांहून अधिकचा ऐवज लुटून नेल्याप्रकरणी कैलास पटेल (२२, रा. चारकोप, कांदीवली, मुंबई) या तरुणाला काशिमीरा पोलिसांनी अटक केली आहे. मीरारोड येथील विजय पार्कमधील ड्रिमलँड पार्क इमारतीत राहणाऱ्या नूतन धीर यांच्या घरात काम करणाऱ्या कैलास पटेल यातरुणाने घरातील कपाट असलेले ४० लाख रुपयांहून अधिक किंमतीचे सोन्या-चांदीसह मौल्यवान दागिने चोरून नेले होते. याप्रकरणी नूतन धीर यांच्या तक्रारीवरून कैलास पटेलविरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी कैलासला अटक केली आहे.

# वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**भाईंदर, दि. २६ : प्रतिनिधी**

मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील वरसोवा खाडीपूलावर अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. विठोबा अनंत मुरकर (२६, रा. आझाद चाळ, अप्पा पाडा, कुरार गाव, मालाड, मुंबई) असे त्याचे नाव आहे. २५ मेच्या पहाटे विठोबा मुरकर आपल्या दुचाकीवरून महामार्गावरील गुजरातच्या दिशेने निघाले होते. पहाटेच्या सुमारास एका पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. यात गंभीर जखमी झालेल्या विठोबा मुरकर यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक फरार झाला. याप्रकरणी काशिगाव पोलीस ठाण्यात २२ जूनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खारघरमध्ये डांबरीकरण झालेले रस्ते पुन्हा खोदले, नागरिकांना मनस्ताप

**पनवेल, दि. २६ : प्रतिनिधी**

खारघर रेल्वे स्थानकापासून सेक्टर १० रस्ता , हिरानंदनी पासून तर सेक्टर १२ च्या दिशेने जाणारा रस्ता यांसह शहराच्या बहुतेक सगळ्याच भागांत खोदकाम सुरू असल्याने नागरिकांना मोठा मनःस्ताप सहन करावा लागत आहे. यापैकी अनेक रस्त्यांवर काही दिवसांपूर्वीच डांबरीकरण झाले असताना, या रस्त्यांवर पुन्हा खोदकाम केले जात असल्याने पनवेल महानगरपालिका विविध विभागांमधील समन्वयाचा अभाव पुन्हा अधोरेखित झाला आहे. सेक्टर १० मधील बँक ऑफ इंडिया चौक तसेच कोपरगाव गेट क्रमांक ५ रस्त्यावरील खोदकाम नेमके कशासाठी सुरू आहे, याचा थांगपत्ता महापालिकेच्या अधिकाऱ्यांनाही नाही. काही महिन्यांपूर्वी जल व मलवाहिन्या टाकण्याचे काम केले होते. यानंतर आता पुन्हा एकदा गेट क्रमांक पाच रस्त्यावर जलवाहिन्यांसाठी खोदकाम करून त्या खड्ड्यावर माती टाकून सोडून दिल्याने जवळपास अर्धा रस्ता बंद झाला आहे.

# अंबरनाथ नगरपरिषदेतील 52 सफाई कामगारांच्या वारसांना नोकरीचे नियुक्ती पत्र

**अंबरनाथ, दि. २६ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे तात्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदेच्या आदेशाने व खा . डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सहकार्याने व आमदार डॉ.बालाजी किणीकर यांच्या सतत च्या पाठपुराव्याने संपूर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिका नगरपरिषद व अंबरनाथ नगरपरिषद येथील लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगार या पदावर वारसा हक्क कायद्यानुसार हक्काची नोकरी आदेश पत्र अंबरनाथ नगरपरिषद हद्दीतील वारसांना देण्यात आले आहे . यावेळी पहिल्या टप्प्यातील तब्बल ५२ वारसांना आपल्या हक्काच्या नोकरीचे आदेश पत्र दिले आहे . याप्रसंगी वारसांनी आनंदाश्रू व भावनिक होऊन आभार मानले. तर अंबरनाथ नगरपालिकेच्या कार्यालयीन अधिक्षक व प्रशासकीय अधिकारी मेघा कदम - मोहिते यांनी ही प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली आहे.

याठिकाणी अंबरनाथ नगरपरिषदचे मुख्याधिकारी व प्रशासक श्री उमाकांत गायकवाड ,मा. नगराध्यक्ष श्री.सुनिल चौधरी, सौ.प्रज्ञा बनसोडे, मा. उपनगराध्यक्ष श्री.अब्दुलभाई शेख, मा.शहरप्रमुख श्री. श्रीनिवास वाल्मिकी, उपशहरप्रमुख श्री. संदीप मांजरेकर, मा.नगरसेवक श्री. सुभाष साळुंके, श्री.रविंद्र पाटील, श्री.उमेश गुंजाळ, श्री. सुरेंद्र यादव, श्री.शिवाजी गायकवाड, श्री. चंद्रकांत भोईर, श्री. परशुराम जाधव, उत्तर भारतीय प्रमुख श्री. प्रमोदकुमार चौबे, कल्याण उपजिल्हा संघटक सौ. मीनाताई वाळेकर, महिला आघाडीच्या सौ. मालतीताई पवार, सौ. सुवर्णा साळुंके,सौ. अनिता लोटे,सौ. वासुदेवी शिरूर, सौ.विद्या जाधव,सौ. सुषमा रसाळ,सौ. सोनिया म्हात्रे, सौ. मनीषा भोईर, युवासेना कार्यकारणी सदस्य श्री. निखील चौधरी तसेच शिवसेना पदाधिकारी, महिला आघाडी, कार्यकर्ते, युवसैनिक, कार्यकर्ते, अधिकारी वर्ग उपस्थित होते.

# राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने नगरपरिषदेकडून अभिवादन

**बदलापूर, दि.२६ : प्रतिनिधी**



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज कुळगांव बदलापूर नगरपरिषदेमध्ये दि.२६/०६/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा.मुख्याधिकारी तथा प्रशासक श्री. मारुती गायकवाड यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले यावेळी नगर अभियंता विजय पाटील, उपअभियंता संदीप टेंभेकर, उपमुख्याधिकारी केतन गुजर, कर अधिकारी प्रियंका गांगर्डे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख सिद्धार्थ पवार, अमित सरमळकर, मिळकत विभागाचे महेश देशपांडे, पीएम आवासचे दिपक सोनवणे,उद्यान विभागाचे महेश लव्हटे, मधुरा पाटील, योगिता चिल्ले इत्यादी अधिकारी व नगरपरिषदेचे अन्य कर्मचारी उपस्थित होते.

# आदिवासी विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक विजय गांगुर्डे सेवेतून बडतर्फ

**वाडा, दि. २६ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या जव्हार येथील प्रादेशिक व्यवस्थापक विजय गांगुर्डे यांना धान्य खरेदीत केलेल्या कोट्यावधी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणी सेवेतून बडतर्फ करण्यात आले असून त्यांच्यावर सुमारे २७ कोटी रुपयांची वसुली लावण्यात आल्याचे आदेश महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित नाशिकच्या व्यवस्थापकीय संचालिका लीना बनसोड यांनी दिले आहेत. त्यामुळे आदिवासी विकास महामंडळात प्रचंड खळबळ माजली आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून आधारभूत धान्य खरेदी करण्यात येते. गांगुर्डे हे जव्हार येथील प्रादेशिक कार्यालयाचे प्रादेशिक व्यवस्थापक असताना आधारभूत धान्य खरेदी हंगाम सन २०२२ –२०२३ अंतर्गत शहापूर येथील उपप्रादेशिक कार्यालयांतर्गत पळशीण ( खर्डी), साकडाबाव, न्याहाडी, खांडस ( सुगवे ) व वेहलोळी या आधारभूत धान्य खरेदी केंद्रावर धान्य खरेदीत प्रचंड गैरव्यवहार झाला होता.

त्यावेळी सुमारे ८६ हजार ६३४ क्विंटल धान्य व २ लाख १७ हजार ८९७ नग बारादानाचा अपहार करून महामंडळाचे पर्यायाने शासनाचे सुमारे २६ कोटी ५१ लाख १३० रुपयांचे नुकसान केले आहे. तर रब्बी हंगामातही लागवड केली नसतानाही बोगस खरेदी दाखवून गांगुर्डे यांनी १ कोटी ४लाख ४ हजार ५८८ रुपयांचा गैरव्यवहार केला होता. अशा विविध प्रकारे गांगुर्डे यांनी बोगस खरेदी व वाहतूक दाखवून कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याने त्यांना निलंबित करण्यात आले होते.

त्यानंतर या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी तुषार मोरे यांची त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली होती. या समितीने केलेल्या चौकशीअंती गांगुर्डे यांच्यावर दोषारोप ठेवण्यात आले होते. दरम्यान नैसर्गिक न्याय तत्वानुसार गांगुर्डे यांना म्हणणे मांडण्यासाठी वारंवार संधी देण्यात आली होती. मात्र ते एकदाही चौकशी समितीपुढे हजर झाले नाहीत. वैद्यकीय कारण देत चौकशी समितीसमोर जाण्याचे त्यांनी टाळत समितीने ठेवलेल्या दोषारोपांवर लेखी खुलासा सादर केला. परंतु दोषारोप खोडून काढण्यासंदर्भात कोणतेही सबळ पुरावे ते देऊ शकले नाहीत. त्यामुळे गांगुर्डे यांचा खुलासा फेटाळून लावत त्यांच्यावर चौकशी समितीने लावलेले दोषारोप मान्य करत बडतर्फीची कारवाई करण्यात आली असून सुमारे २७ कोटी ९१ लाख ५५ हजार २३२ रुपयांची वसुली लावण्यात आल्याचे आदेश महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित नाशिकच्या व्यवस्थापकीय संचालिका लीना बनसोड यांनी दिले आहेत.

# मागील वर्षभरात भिवंडी लोकसभा विकासासाठी माझे प्रामाणिक प्रयत्न

## इतरांना जे दहा वर्षात जमले नाही, ते एक वर्षात करण्याचा माझा प्रयत्न - खा. बाळ्या मामा

**भिवंडी, दि. २६ : प्रतिनिधी**

भिवंडी लोकसभा क्षेत्रात सत्ताधारी खासदारांना जे दहा वर्षात जमले नाही,त्या कामांना मी एक वर्षाच्या काळात प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न केला आहे, अशी प्रतिक्रिया भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी बुधवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे. लोकसभा सदस्य म्हणून शपथ घेतल्याला एक वर्ष पूर्ण झाल्या निमित्ताने भिवंडीत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. लोकसभा निवडणुकीत भिवंडीकरांना टोरंट संदर्भात दिलेल्या आश्वासनावर बोलताना मागील दहा वर्षात टोरंट पावरचा ट ही कोणी उच्चारला नव्हता, पण मी त्यावर लोकसभा सभागृहात आवाज उठवला आहे.२०२७ नंतर टोरंट बाबत सर्वांच्या साथीने योग्य निर्णय घेतला जाईल असे आश्वासन यावेळी खासदार म्हात्रे यांनी दिले.शहर व ग्रामीण च्या १५ लाख लोकसंख्येच्या आरोग्याची काळजी घेणारे स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा जिल्हा रुग्णालय करावा यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्र्यांकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून राज्य आरोग्य विभागाकडून याबाबत सर्वेक्षण सुरू केले आहे अशी माहिती खा.बाळ्या मामा यांनी दिली आहे. भिवंडीकरांसाठी रेल्वे प्रवास जलद व्हावा यासाठी वसई दिवा रेल्वे मार्गावर भिवंडी ते दिवा दरम्यान रेल्वे सेवा वाढवावी तसेच लांब पल्ल्यांच्या या मार्गावरील गाड्यांना भिवंडी रोड रेल्वे स्थानकात थांबा द्यावा अशी मागणी रेल्वे मंत्र्यांकडे केली असून मुरबाड रेल्वे मार्गाचा तत्कालीन खासदारांनी पाठपुरावा केला



नव्हता, तो आपण केल्यानंतर हे काम प्रगतीपथावर पुढे सरकले आहे.शहापूरचा पाणी प्रश्न गंभीर आहे.भावली प्रकल्पाला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाढीव निधीस मंजुरी दिली.पण जलशुद्धीकरण प्रकल बनवला नाही. ठेकेदारांना पाईप लाइन टाकण्यात व श्रेय घेणाऱ्यांना ठेकेदाराची बिले मंजूर करून टक्केवारी घेण्यात स्वारस्य आहे.महसूल मंत्र्यांकडे जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव पडून होता.त्याचा पाठपुरावा केल्याने जलशुद्धीकरण केंद्र उभारण्याचा मार्ग सुकर झाला असल्याचेही म्हात्रे यांनी सांगितले.भिवंडी शहरातील वऱ्हाळ तलाव सुशोभीकरण कामासाठी केंद्राने ५३ कोटी रुपयांच्या निधी मंजूर केला पण ४० टक्के हिस्सा राज्य शासनाकडून मिळाव यासाठी माझे राज्य सरकारकडे प्रयत्न सुरू आहेत.

**वाहतूक संस्था कळीचा मुद्दा**

महामार्ग व राज्य मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या हा कळीचा मुद्दा आहे.त्याच्या सोडवणुकीसाठी शासन यंत्रणा व पोलिस प्रशासन यांच्याकडून योग्य ते सहकार्य मिळत नाही.पाच वेळा बैठका घेऊन आम्ही सांगितलेल्या उपाययोजना प्रशासनाने न राबविल्यास यापुढे कोणाला हात जोडणार नाही तर जनतेच्या रोषाला यंत्रणेला सामोरे जावे लागेल असे अधिकाऱ्यांना ठणकावून सांगितले आहे.भिवंडी ठाणे बायपास रस्त्याचे आठ पदरी कॉंक्रीटीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे.या कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तपासणी होऊन त्याचा अहवाल सादर केला जाणार आहे.तर मुंबई वडोदरा महामार्गावर भिवंडी वज्रेश्वरी दरम्यान महापे येथे वळण रस्ता दिल्यास त्याभागाचा विकास होऊन लाखो लोकांना रोजगार मिळू शकतो ही बाब केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत यासाठी अहवाल तयार करून निधी मंजूर करण्याचे निर्देश दिले आहेत.तसेच स्टेम कडील विविध ग्रामपंचायत थकीत बिल व व्याज माफी संदर्भात मी स्वतः ४ मार्च रोजी नियोजन भवन येथे बैठक घेऊन निर्णय झाला होता.त्यानंतर काम होत आहे, हे समजल्यावर १६ मार्चला माजी खासदारांनी पत्र देऊन याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला असा टोला माजी खासदार कपिल पाटील यांचे नाव न घेता लगावला.बुलेट ट्रेन प्रकल्पामध्ये जमीन विक्री व्यवहारात काही शे कोटी रुपयांचा भष्टाचार झाला आहे. याची तक्रार पोलिस आयुक्तांकडे केल्यानंतर त्यांनी आर्थिक गुन्हे शाखेस चौकशीचे आदेश दिले आहेत.लोकसभा क्षेत्रात एक केंद्रीय विद्यालय स्थापन व्हावे यासाठी केंद्रीय शिक्षणमंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला असून त्याबाबत लवकरच निर्णय होणार आहे असे शेवटी खा.बाळ्या मामा यांनी स्पष्ट केले.

# उल्हासनगरात भूमी अभिलेखांचे ऑनलाईन डिजिटलायझेशन करा

**उल्हासनगर, दि. २६ : प्रतिनिधी**

उल्हासनगर उप विभागीय कार्यालय आणि भूमी अभिलेख (सिटी सर्वे) विभागाचे ऑनलाईन डिजिटलायझेशन करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माजी नगरसेवक सतरामदास जेसवानी यांनी ठाणे जिल्हाधिकारी समवेत उपविभागीय अधिकारी यांच्या कडे केली आहे.

भारत सरकारने विविध शासकीय विभागांमध्ये माहितीचे ऑनलाईन डिजिटलायझेशन करून एक क्रांती घडवून आणली आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला किंवा विभागाला आवश्यक ती माहिती आणि व्यवहार कोणत्याही वेळी सुलभपणे व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध होऊ लागले आहेत. यामुळे अधिकारी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून होणारा गैरवापर रोखण्यासाठी अनेक त्रुटींना या डिजिटलायझेशन मुळे आळा बसला आहे.

जेसवानी यांनी सांगितले की १९७० पासून उल्हासनगर शहर हे एक निर्वासित छावणी म्हणून अस्तित्वात होते. येथे भारत सरकारमार्फत पाकिस्तानातून विस्थापित झालेल्या नागरिकांना ब्लॉक व बॅरक यामध्ये कन्व्हेअन्स डीड (सी.डी.) च्या माध्यमातून जागा वाटप करण्यात आल्या होत्या. त्या काळात संपूर्ण नोंदी प्रशासक, उल्हासनगर टाऊनशिप, उल्हासनगर यांच्या मार्फत नोंदवही व कागदांवर योजना तयार करून मॅन्युअल पद्धतीने करण्यात आल्या. नंतर या नोंदी उपविभागीय कार्यालय, उल्हासनगर टाऊनशिप, उल्हासनगर यांच्याकडे वर्ग करण्यात आल्या आहेत

त्या नंतर काही काळाने सिटी सर्व्हे कार्यालय स्थापन झाले, ज्यांनी मालकांना प्रॉपर्टी कार्ड्स वितरित केलेत . परंतु तेही केवळ प्रांत कार्यालयाने दिलेल्या नाव बदल पत्रावर व सब-रजिस्ट्रार कार्यालय, उल्हासनगरमध्ये नोंदणीकृत विक्री दस्तऐवजावर आधारित होते.

आजही उपविभागीय कार्यालय, उल्हासनगर टाऊनशिप, उल्हासनगर येथील बहुतांश अभिलेख (मालकांची रजिस्टर, सी.डी. ची प्रत इ.) खराब, फाटलेली अवस्थेत आहेत. हे दस्तावेज अद्याप स्कॅन करून ऑनलाईन उपलब्ध केले गेलेले नाहीत. त्यामुळे नागरिकांच्या मनात शंका, संभ्रम व प्रश्न निर्माण होत आहेत. तसेच हे अभिलेख नसल्यामुळे कर्मचार्यांकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून बेकायदेशीर फेरफार होण्याची शक्यता श्री जेसवानी यांनी व्यक्त केली आहे. कोणतीही अनधिकृत नोंद होऊ नये, सर्व भूमीमालकांच्या नोंदी पारदर्शक असाव्यात, याकरिता उपविभागीय कार्यालय, उल्हासनगर-३ व सिटी सर्व्हे कार्यालय, उल्हासनगर ५ येथील सर्व अभिलेखांचे ऑनलाईन डिजिटलायझेशन करण्यात यावे अशी मागणी श्री जेसवानी यांनी केली आहे.

# चटपटीत मंचुरियन

**रसगंधा**



मेन्यू कार्डमध्ये गोबी मंचुरियन हा पदार्थ हमखास असतो. बऱ्याच जणांना गोबी मंचुरियन आवडतं. चटपटीत, चविष्ट गोबी मंचुरियन खूप छान लागतं. पण हा पदार्थ तुम्ही घरीही बनवू शकता. गोबी मंचुरियनची रेसिपी जाणून घेऊ या.

साहित्य: एक गड्डा फ्लॉवर, अर्धा कप मैदा, एक चमचा आलं-लसूण पेस्ट, कांदा, सिमला मिरची, तेल, पाणी.

सॉससाठी: अर्धा कप पाण्यात दोन चमचे कॉर्नफ्लोर मिसळून घ्या. अर्धा कप टोमॅटो प्युरी, सोया सॉस, मीठ आणि पाणी.

कृती: फ्लॉवरचे मोठे तुकडे करून घ्या. कांदा, सिमला मिरचीचे लांब काप करा. आता मैद्यात आलं आणि लसूण पेस्ट घालून मिसळून घ्या. त्यात फ्लॉवरचे तुकडे घाला. सगळ्या तुकड्यांना मैदा नीट लागायला हवा. आता कढईत तेल गरम करा. फ्लॉवरचे तुकडे सोनेरी रंगाचे होईपर्यंत तळून घ्या. आता कढईतलं जास्तीचं तेल काढून ठेवा. उरलेल्या तेलात थोडी आलं-लसूण पेस्ट घाला. त्यात कांदा घालून परता. मग सिमला मिरची घाला. सॉससाठीचं सर्व साहित्य एका भांड्यात एकत्र करा. आता हे साहित्य कढईत घाला. आता कढईतलं मिश्रण घट्ट होऊ लागेल. यात फ्लॉवरचे तुकडे घालून मिसळून घ्या. गरमागरम खा.

# अस्मिता

# डोळ्यांची नियमित तपासणी गरजेची

**निरोगी राहा**



एखादी आजारी व्यक्ती डॉक्टरकडे जाते तेव्हा डॉक्टर नाडीसह तिचे डोळे तपासतात. पण यातून डॉक्टरांना नेमके काय समजते, याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? होय, डॉक्टर तुमच्या डोळ्यांकडे पाहून आरोग्याशी संबंधित अनेक गोष्टी जाणून घेऊ शकतात. शरीराच्या अनेक आजारांची लक्षणे डोळ्यात दिसू शकतात.

डोळे हा शरीरातील एकमेव असा अवयव आहे ज्यामध्ये आपण रक्तवाहिन्या थेट पाहू शकतो. त्याचप्रमाणे मेंदूचा एक भाग असणारी ऑप्टिक नर्व्ह देखील डोळ्यात दिसते. म्हणूनच डोळ्यांची तपासणी करून शरीरातील अनेक आजार शोधता येतात. ३४ टक्के लोकांना डोळ्यांच्या तपासणीद्वारे मधुमेहाचे पहिले लक्षण आढळत असल्याचे तज्ज्ञ सांगतात. डोळ्यांच्या तपासणीद्वारे ३९ टक्के लोकांचा उच्च रक्तदाब ओळखला तर ६२ टक्के लोकांना डोळ्यांच्या तपासणीमुळे उच्च कोलेस्ट्रॉलची पहिली माहिती मिळाली आहे. म्हणूनच डोळ्यांच्या नियमित तपासणीचे महत्त्व लक्षात घ्यायला हवे.तुम्हाला अचानक डोळ्यांमध्ये लाल ठिपके किंवा लहान रक्ताचे डाग दिसले तर ते मधुमेहाचे लक्षण असू शकते. शरीरात साखरेची पातळी वाढते तेव्हा डोळ्यांच्या नाजूक शिरा फुटून रक्तस्त्राव होऊ शकतो. यावर वेळीच उपचार केले नाहीत तर अंधत्व देखील येऊ शकते.

डोळे लाल होणे, खाज सुटणे आणि सूज येणे याचीही अनेक कारणे असू शकतात. डोळे लालसर दिसत असतील तर तो बुरशीजन्य संसर्ग किंवा ॲलर्जीचा परिणाम असू शकतो. ॲलर्जी ही धूळ, परागकण किंवा पाळीव प्राण्यांची असू शकते. अशा परिस्थितीत अँटीहिस्टामाइन असणारे आय ड्रॉप्स मदत करू शकतात.

# पाठलाग हसऱ्या स्वप्नांचा

**मानिनी**



जरना गर्ग या भारतीय-अमेरिकन महिलेने आयुष्यातील सर्व संघर्षांवर मात केली आणि स्वत:ची ओळख निर्माण केली. कुटुंब सांभाळून घरकाम करणाऱ्या आईपासून लोकप्रिय स्टँड-अप कॉमेडियन बनण्यापर्यंतचा एक अनोखा प्रवास तिने केला आहे. जरना मजेदार शैलीसाठी, आपल्या 'आंटी जरना' या पात्रासाठी आणि कौटुंबिक अनुभवांवर आधारित विनोदासाठी जगभरात ओळखली जाते. आज आपण तिच्या प्रेरणादायी कथेबद्दल सविस्तर जाणून घेऊ या.

जरनाचा जन्म मुंबईतला. किशोरावस्थेत तिने अरेंज्ड मॅरेज नाकारले आणि भारत सोडला. पुढे आईचे निधन झाल्यावर तिने एकटीनेच अमेरिकेत स्थिरावण्याचा निर्णय घेतला. याबाबत जरना गर्ग म्हणते की, दुसऱ्याने माझ्यासाठी ठरवलेले जीवन जगायचे नाही हे मी तेव्हाच ठरवले होते. अमेरिकेत तिने एका इमिग्रेशन वकिलाशी लग्न केले आणि नंतर ती एका मुलाची आई बनली. पुढची जवळजवळ १६ वर्षे ती घरी राहून काम करणारी आई होती. पण एके दिवशी तिने स्वतःला विचारले, माझी स्वत:ची स्वप्ने काय आहेत? ... येथूनच तिचा हसवण्याच्या विश्वातील प्रवास सुरू झाला. जरना चाळिशीनंतर स्टँड-अप कॉमेडी करू लागली. तिने भारतीय काकूंच्या मजेदार कथा, आई-मुलाचे संभाषण, लग्न आणि सांस्कृतिक अंतर आदी विषय आपल्या विनोदी सादरीकरणाचा एक भाग बनवले. तिची सिग्नेचर स्टाईल 'आंटी जरना' आज सोशल मीडियावर खूप प्रसिद्ध आहे.

जरनाने 'धिस अमेरिकन लाइफ', 'अमेझॉन प्राइम स्पेशल' आणि यासारख्या अनेक मोठ्या स्टेज शो मध्ये सादरीकरण केले आहे. जरना गर्गचा 'एनबीसी कॉमेडी शोकेस' आणि 'टॉप इमर्जिंग कॉमेडियन'मध्येही समावेश होता. तिची कथा भारतीय प्रेक्षकांसाठी, विशेषतः महिलांसाठी खूप प्रेरणादायी आहे. जरना एका मुलाखतीत म्हणते की, 'मी एक मुस्लिम मुलगी होते. अमेरिकेत आल्यावर एका हिंदू मुलाशी लग्न केले आणि आता मी एक अमेरिकन कॉमेडियन आहे. मी प्रत्येक सीमा तोडल्या आहेत.'

खेरीज वय, कौटुंबिक पार्श्वभूमी किंवा सामाजिक भूमिका एखाद्याच्या स्वप्नांना थांबवू शकत नाही, हेदेखील तिने सिद्ध केले आहे. आई म्हणूनही तिने तिच्या आवडीचे काम केले तर दुसरीकडे ती लोकांना हसवण्याचे समर्थ माध्यम बनली. थोडक्यात परंपरा आणि दबावाच्या परिस्थितीमध्ये आपली ओळख शोधणाऱ्या लाखो महिलांसाठी जरना एक प्रतीक बनली आहे, यात शंका नाही.

# प्रश्न नक्की सुटतील

**काय करू?**

माझ्या लग्नाला १३ वर्षं झाली असून आम्हाला ११ वर्षांचा मुलगा आहे. माझ्या पतीने मुलाला खूप लाडावून ठेवलं आहे. ते त्याला चुकीचं शिकवत आहेत. फारसा अभ्यास न करताही आपल्यासारखा यशस्वी उद्योजक होता येईल, असं त्यांनी मुलाला सांगितलं. तेव्हापासून तो नीट अभ्यास करत नाही. अलिकडेच त्याने मी वडिलांप्रमाणे मद्यपान करू का, असं विचारलं. यामुळे मला धक्का बसला आहे. वडिलांच्या चुकीच्या सवयी त्याच्या अंगवळणी पडत आहेत. याबद्दल मी पतीला समजावलं. पण ते सगळं हसण्यावारी नेतात. मुलावर चुकीचे संस्कार होत असल्याचं त्यांच्या गावीही नाही. यामुळे मी खूप धास्तावले आहे. काय करू? पतीला त्यांच्या जबाबदारीची जाणीव कशी करून देऊ?



मुलांवर पालकांचा प्रभाव पडत असतो. मुलं वडिलांप्रमाणेच आईचंही निरिक्षण करत असतात. आईच्या वागणुकीतूनही ती बरंच काही शिकतात. त्यामुळे तुम्ही निराश होऊ नका. तुम्हाला मुलाला कशा प्रकारे घडवायचं आहे, हे ठरवा. त्याच्यावर कोणते संस्कार व्हायला हवेत याचा आढावा घ्या. यानंतर पतीशी चर्चा करा. मुलाचं भविष्य घडवण्यासाठी आई-वडिलांची भूमिका महत्त्वाची ठरते याची जाणीव पतीला करून द्या. मुलाला प्रत्येक गोष्टीच्या दोन्ही बाजू समजावून सांगा. अभ्यास न करता यशस्वी होता येतं, असं मुलाला वाटत असेल तर या मार्गात किती काटे असतात, कोणती आव्हानं असतात, किती संघर्ष करावा लागतो हे सांगा. मुलाला प्रेरणादायी गोष्टी सांगता येतील. या वयात मुलांना बऱ्याच गोष्टींचं कुतूहल असतं. तुमच्या मुलाला मद्यपानाबद्दल आकर्षण वाटतंय. मुलांचं कुतूहल शमवण्याचा प्रयत्न करा. मुलाच्या प्रश्नांना उत्तरं द्या. त्याला टाळू नका. मद्यपानाचे दुष्परिणाम समजावून सांगा. स्वत:च्या वागणुकीद्वारे त्याच्यापुढे आदर्श उभा करा.

# कोणतीही हयगय नको

**स्कील डेव्हलपमेंट**



कार्यालयीन स्थळी यशस्वी व्हायचं असेल तर आपल्याला काही सवयी बदलाव्या लागतात. दैनंदिन कामकाजात आपण काही गोष्टींकडे दुर्लक्ष करतो. ऑफिसमध्ये उशिरा पोहोचतो, कामाचं नियोजन नीट होत नाही. या सगळ्याचा परिणाम कामावर होतो. तेव्हा कार्यालयीन स्थळी आपली छाप पाडायची असेल आणि कारकिर्दीत यशस्वी व्हायचं असेल तर काय करायला हवं याविषयी...

✻ वक्तशीरपणा हा कोणत्याही कर्मचाऱ्याचा दागिना आहे. कार्यालयीन वेळेत उपस्थित रहाणं गरजेचं असतं. शिवाय महत्त्वाची मिटिंग किंवा इतर प्रसंगी उशिरा पोहचून चालत नाही. त्यामुळे वक्तशीरपणा अंगी बाणवा. कर्मचाऱ्यांच्या वक्तशीरपणाचं कौतुक होतं. वेळेत हजर असणं तुमची कामाप्रतीची जबाबदारी दर्शवतं.

✻ ऑफिसला जाण्यापूर्वी दिवसभराच्या कामाचं नियोजन करा. यामुळे कामं झटपट होतील. कामाचे प्राधान्यक्रम ठरवा. त्यानुसार कामं करा. यामुळे तुम्हाला उशीर होणार नाही.

✻ जेवण्यात फार वेळ घालवू नका. या वेळेत वायफळ गप्पा मारत बसण्यापेक्षा वेळेचा सदुपयोग करा. सहकाऱ्यांशी कामाशी संबंधित चर्चा करा.

✻ व्यावसायिक आयुष्यात ई मेलला प्रचंड महत्त्व असतं. बरेच व्यवहार ई मेलवरच होत असतात. म्हणूनच तुमचा ई मेल आयडी नियमित तपासायला हवा. एखादी महत्त्वाची मेल उशिरा बघितल्यामुळे बरंच नुकसान होऊ शकतं. त्यामुळे मेलच्या बाबतीत कोणतीही हयगय करू नका.

✻ मिटिंग किंवा सादरीकरणासाठी पूर्ण तयारीत यायला हवं. जाऊ दे, बघू असं म्हणून पूर्वतयारी न करणं तुमची प्रतिमा बिघडवू शकतं. त्यामुळे मिटिंगमध्ये होणाऱ्या चर्चेसाठी नीट तयारी करा.

# झोप का गं येत नाही?

**संगोपन**

मुलांच्या वाढीमध्ये शांत झोप अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. पण लहान मुलांसाठी झोपण्याची योग्य वेळ कोणती हे अनेक मातांना ठाऊक नसते. चला तर, आज याविषयी जाणून घेऊ या.

बालतज्ज्ञांच्या मते, लहान मुलांना रात्री ९ ते १० च्या दरम्यान झोपवावे. याचे कारण या वेळी त्यांच्या शरीरात सर्वात जास्त प्रम ाणात वाढीस कारक असणारी संप्रेरक स्त्रवतात. ती मुलांची उंची वाढवण्यास, स्नायूंना बळकटी देण्यास तसेच रोगप्रतिकारक शक्ती सुधारण्यास मदत करतात. स्वाभाविकच या वेळी मूल गाढ झोपेत असेल तर वाढ चांगली होते. नऊ वाजेपर्यंत झोपल्याने मुलांना पूर्ण झोप मिळत असल्यामुळे ते निरोगी, तंदुरुस्त आणि आनंदी राहतात. दुसरीकडे, झोप पूर्ण झाली नाही तर मूल चिडचिडे होते. त्यांना थकवा जाणवतो आणि पुढे अभ्यास तसेच शिकण्याच्या क्षमतेवर याचा विपरीत परिणाम होतो.

हे लक्षात घेता सर्वप्रथम लहानग्यांच्या झोपण्याची नियमित दिनचर्या बनवा. झोपण्यापूर्वी मुलाला आंघोळ घाला. नंतर रात्रीचे जेवण भरवा. त्यानंतर कोमट दूध पाजा आणि पुस्तक वाचून दाखवत, गोष्टी सांगत झोपवण्याचा प्रयत्न करा. दररोज ही प्रक्रिया अवलंबल्याने, मुलाचे मन आणि शरीर आता झोपण्याची वेळ झाली आहे... हे जाणून घेते आणि तशी कृती करते.



झोपण्यापूर्वी खोलीतील दिवे बंद करा आणि ती पूर्णपणे अंधारी करा. चांगले आणि जाड पडदे लावा जेणेकरून बाहेरचा प्रकाश आत येऊ नये. यामुळे मुलांना झोपणे सोपे होते. खेरीज झोपतेवेळी खोलीचे तापमान खूप गरम किंवा खूप थंड नसावे. आरामदायी आणि संतुलित तापमानामुळे मुलांची झोप गाढ आणि आरामदायी होते.

झोपेच्या किमान दोन तास आधी मुलांना मोबाईल, टीव्ही किंवा टॅब्लेट वापरण्यापासून रोखा. ही गॅझेट्स मुलांचा मेंदूला सक्रिय करतात आणि झोप लागण्यात त्रास होतो. मुलांनी दिवसातून किमान एक तास बाहेर खेळणे आवश्यक आहे. यामुळे त्यांची ऊर्जा योग्यरित्या खर्च होते आणि थकल्यामुळे लवकर झोपी जातात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे झोपताना हलके आणि आरामदायी संगीत मुलांना शांत करते आणि लवकर झोपायला मदत करते हे जाणून घ्या. झोपताना खोलीत मंद संगीत असेल तर झोपेची गुणवत्ता सुधारते.


# वॉटरप्रूफ मेकअप आवडतो?

**सौंदर्यवर्धन**

आजकाल मेकअप फक्त फॅशनचा नाही तर दैनंदिन जीवनाचा एक भाग झाला आहे. विशेषतः महिलांसाठी ऑफिस, पार्टी किंवा प्रवासादरम्यान सुंदर दिसणे महत्त्वाचे असताना त्या वॉटरप्रूफ मेकअप वापरतात. हा मेकअप बराच काळ टिकतो आणि घाम किंवा पाण्याच्या संपर्कातही खराब होत नसल्यामुळे वापर सोयीस्कर असतो. पण हाच मेकअप हार्मोनल बॅलन्स बिघडवू शकतो, हे तुम्हाला माहिती आहे का?

शरीरात एखाद्या हार्मोनचे प्रमाण खूप जास्त किंवा खूप कमी होते तेव्हा त्याला हार्मोन असंतुलन म्हणतात. हा त्रास असेल तर पीसीओएस, थायरॉईड, वजन वाढणे, अनियमित मासिक पाळी, मूड स्विंग, झोपेच्या समस्या आणि त्वचा तसेच केसांच्या समस्या उद्भवू शकतात.

मध्यंतरी हार्वर्ड पब्लिक स्कूलने वॉटरप्रूफ मेकअप उत्पादनांचा अभ्यास केला तेव्हा त्यांना त्यात फ्लोरिनसारखे उच्च रसायन आढळले. हे वा यासारखी घातक रसायने शरीरातील इस्ट्रोजेन आणि टेस्टोस्टेरॉन सारख्या हार्मोन्सवर परिणाम करू शकतात आणि दीर्घकाळ वापरल्यास ते वंध्यत्व, आजार आणि अगदी स्तनाच्या कर्करोगाचा धोका वाढण्यासही कारक ठरतात.



वॉटरप्रूफ मेकअपमधील फेनोक्सीएथेनॉल हे रसायन प्रसाधने दीर्घकाळ टिकण्यासाठी वापरले जाते. प्रसाधनांमार्फत ते त्वचेद्वारे शरीरात प्रवेश करते आणि इस्ट्रोजेन सारख्या हार्मोन्सची नक्कल करते. त्यामुळे शरीराच्या नैसर्गिक हार्मोनल प्रक्रियेत व्यत्यय येऊ शकतो. ते थायरॉईड ग्रंथीवर देखील परिणाम करू शकते, असे संशोधनातून दिसून आले आहे.

त्याचप्रमाणे पॅराबेन्स नामक रसायन काजळ, लिपस्टिक, फाउंडेशन इत्यादींमध्ये वापरले जाते. यातून ते शरीरात प्रवेश करत इस्ट्रोजेन रिसेप्टर्स सक्रिय करते. यामुळे इस्ट्रोजेनचे प्रमाण वाढते. परिणामस्वरुप महिलांना अनियमित मासिक पाळी, मूड स्विंग, स्तनातील गाठी आणि कर्करोग अशा गंभीर समस्यांचा सामना करावा लागू शकतो. असे धोके लक्षात घेता यास प्रतिबंधित कसा करावा, हे जाणून घ्या. सर्वप्रथम मेकअप उत्पादन खरेदी करण्यापूर्वी लेबल काळजीपूर्वक वाचा आणि त्यामध्ये घातक रसायने नसल्याची खात्री करा. ते असणारी उत्पादने टाळा. महत्त्वाचे म्हणजे शक्य असेल तेव्हा नैसर्गिक मेकअप उत्पादनांचा वापर करा.

**हेअर केअर**


## वापरा द्राक्षाच्या बियांचं तेल



काळेभोर, लांबसडक केसांमुळे महिलांचं सौंदर्य खुलतं. मात्र सध्याच्या काळात केसांच्या समस्या वाढल्या आहेत. त्यातच केसांवर वाढत्या प्रदूषणाचाही परिणाम होतो. केस निस्तेज दिसू लागतात, कोरडे पडतात. केसांचं सौंदर्य टिकवून ठेवण्यासाठी बरेच उपाय केले जातात. मात्र काही नैसर्गिक उपायांनी केस चमकदार होऊ शकतात. द्राक्षांच्या बियांचं तेल केसांसाठी लाभदायी ठरतं. या तेलात केसांच्या वाढीसाठी उपयुक्त ठरणारे बरेच पोषक घटक असतात. द्राक्षाच्या बियांचं तेल लावण्याची एक पद्धत आहे. चार चमचे द्राक्षाच्या बियांच्या तेलात थोडं लवेंडर ऑईल घाला. त्यात अंडं घाला. हे मिश्रण संपूर्ण केसांना लावा. साधारण दोन तासांनी धुवून टाका. या उपायाने तुमचे केस सुंदर दिसू लागतील.

**मेक अप**


## कलर ब्लॉकिंगचा ट्रेंड




डोळ्यांचा मेक अपही खास असतो. डोळ्यांचं सौंदर्य खुलवण्यासाठी वेगवेगळ्या पद्धती आजमावल्या जातात. विविध ट्रेंड्स फॉलो केले जातात. डोळ्यांच्या मेक अपचे ग्लिटर, स्मोकी आय, कॅट आय असे बरेच प्रकार आहेत. तुम्ही या पद्धतीचा मेक अप केलाही असेल. मात्र सध्या कलर ब्लॉकिंगचा ट्रेंड आहे. या मेक अपसाठी कॉंट्रास्ट, मिक्स अँड मॅच आणि सॉलिड कलर्सचा वापर केला जातो. कलर ब्लॉकिंगमुळे डोळेच नाही तर तुमचं व्यक्तिमत्त्व उठावदार दिसतं. त्यामुळे हा ट्रेंड नक्की फॉलो करा.

**किचन टिप्स**

## कणकेत भेसळ आहे का?



आपण बाहेरून तयार कणीक आणतो. मात्र ती भेसळयुक्त असू शकते. कणकेत बोरिक पावडर किंवा मैदा घातला जातो. मात्र कणकेत भेसळ आहे किंवा नाही हे ओळखता येतं. यासाठी एका भांड्यात पाणी घ्या. त्यात चमचाभर कणीक घाला. पाण्यावर काही कण तरंगताना दिसले तर कणकेत भेसळ आहे असं समजावं.



# सेंसेक्समध्ये 1000 अंकांची वाढ तर निफ्टी 25500 च्या पुढे



मुंबई, दि. २६ प्रतिनिधी

गुरुवारी शेअर बाजारात तेजी पाहायला मिळाली. दोन्ही बेंचमार्क निर्देशांक सेंसेक्स आणि निफ्टी ५० हे हिरव्या चिन्हावर बंद झाले. हे त्या वेळी घडले जेव्हा अमेरिकन डॉलर कमकुवत झाला आणि मध्य पूर्वेतील तणाव कमी होऊ लागला.

गुरुवारी सेंसेक्सने ८२८८२ च्या पातळीवर सुरुवात केली होती आणि दिवसअखेर तो १.२१ टक्क्यांच्या तेजीसह ८३७५५ च्या पातळीवर बंद झाला. दुसरीकडे निफ्टी ५० गुरुवारी २५२६८ वर उघडला आणि दिवसअखेर तोही १.२१ टक्क्यांच्या तेजीसह २५५४९ वर बंद झाला.

निफ्टी मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकही वाढीसह बंद झाले. निफ्टी मिडकॅपमध्ये ०.५९ टक्क्यांची वाढ तर निफ्टी स्मॉलकॅपमध्ये ०.४२ टक्क्यांची वाढ पाहायला मिळाली.

या दरम्यान बीएसईवर सूचीबद्ध सर्व कंपन्यांचे बाजार भांडवल ३.३३ लाख कोटी रुपयांनी वाढून ४५७.३३ लाख कोटी रुपयांवर पोहोचले.

निफ्टी ५० मधील टॉप गेनर पाहता, श्रीराम फायनान्सचा शेअर सर्वाधिक वधारला, ज्यामध्ये ४.१७ टक्क्यांची तेजी पाहायला मिळाली. त्यानंतर जिओ फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये ३.०४ टक्क्यांची, हिंडल्कोमध्ये २.६७ टक्क्यांची, टाटा स्टीलमध्ये २.६६ टक्क्यांची आणि अदानी पोर्ट्समध्ये २.६ टक्क्यांची वाढ झाली.

निफ्टी ५० मधील टॉप लॉसर्समध्ये सर्वाधिक नुकसान डॉ. रेड्डीजला झाले, ज्यामध्ये १.५

**सेन्सेक्स 83,755**

**निफ्टी 25,549**

टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर टेक महिंद्रामध्ये ०.८७ टक्के, हिरो मोटोकॉर्पमध्ये ०.५४ टक्के, मारुती सुझुकीमध्ये ०.४१ टक्के आणि एसबीआयमध्ये ०.३८ टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली.

जरी सर्व सेक्टोरल निर्देशांकांमध्ये वाढ झाली असली तरी निफ्टी मीडियाला सर्वाधिक नुकसान झाले, जो १.०९ टक्क्यांनी घसरला. त्यानंतर निफ्टी रिअल्टीमध्ये १ टक्क्यांची आणि निफ्टी आयटीमध्ये ०.१३ टक्क्यांची घसरण झाली.

सेक्टोरल निर्देशांकांमध्ये निफ्टी मेटल हा सर्वात चांगला कामगिरी करणारा ठरला, ज्यामध्ये २.३१ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर निफ्टी ऑईल अँड गॅसमध्ये १.८६ टक्के, निफ्टी इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये १.६३ टक्के, निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये १.४८ टक्के, निफ्टी सर्व्हिसेस सेक्टरमध्ये १.३० टक्के आणि निफ्टी बँकमध्ये १.०३ टक्क्यांची वाढ झाली.

# ऑपरेशन सिंदूरची माहिती पाकिस्तानला पुरवणारा नौदलाचा कर्मचारी अटकेत

नवी दिल्ली, दि. २६ वृत्तसंस्था

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले. यानंतर गेल्या महिन्यात पाकिस्तानला माहिती पुरविणाऱ्या काही जणांना हरियाणा आणि उत्तर भारतातील विविध राज्यांमधून अटक झाली होती. आता पुन्हा एकदा दिल्लीतील नौदलाच्या मुख्यालयातून विशाल यादव नामक व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले आहे. विशाल यादव पाकिस्तानची गुप्तचर संघटना आयएसआयसाठी काम करत असल्याचा त्याच्यावर आरोप ठेवण्यात आला आहे. गुप्तवार्ता विभागाच्या माहितीनुसार, विशाल यादव सोशल मीडियाच्या माध्यमातून एका पाकिस्तानी महिलेच्या संपर्कात होता. या महिलेने प्रिया शर्मा नावाने आयडी तयार केला होता. या आयडीवर यादव संवेदनशील माहिती पाठवत होता.



दिल्ली पोलीस महानिरीक्षक विष्णू कांत गुप्ता यांनी सांगितले की, पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणांकडून केल्या जाणाऱ्या हेरगिरीचा माग काढण्यासाठी राजस्थान पोलिसांचा गुप्तचर विभाग गेल्या काही दिवसांपासून काम करत होता. त्यांच्या तपासात विशाल यादव हा पाकिस्तानी हँडलरच्या संपर्कात असल्याची माहिती मिळाली. प्रिया शर्मा नावाच्या आयडीवरून एक महिला विशाल यादवकडून नौसेना भवनातील संवेदनशील माहिती मिळविण्याचा प्रयत्न करत होती, अशी माहिती समोर आली आहे.

विशाल यादव हा हरियाणाचा राहणारा आहे. योगायोग म्हणजे याआधी अटक झालेले अनेक आरोपी हे हरियाणाचेच होते. यादव सध्या नौसेनेच्या मुख्यालयात अप्पर डिव्हिजन क्लर्क या पदावर कार्यरत होता. राजस्थान पोलीस गेल्या काही दिवसांपासून विशाल यादवच्या मागावर होते आणि त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवले जात होते.

तपास यंत्रणांना मिळालेल्या माहितीनुसार, विशाल यादवला ऑनलाइन गेमचे व्यसन जडले होते. यात त्याला मोठे आर्थिक नुकसान झाल्यामुळे तो कर्जात होता. आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी विशाल यादवने हेरगिरी केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

सोशल मीडियावर प्रिया शर्मा नावाने तयार करण्यात आलेल्या बनावट खात्याच्या संपर्कात आल्यानंतर विशाल यादवला पैशांचे आमिष दाखविण्यात आले. पैसे मिळविण्यासाठी विशाल यादव प्रिया शर्माच्या आयडीवर महत्त्वाची माहिती पुरविण्याचे काम करत होता. या बदल्यात त्याला क्रिप्टोकरंसीच्या माध्यमातून पैसे मिळत होते. विशाल यादवच्या अटकेनंतर आता डिजिटल करन्सीचा हेरगिरीत वापर होत असल्यामुळे सुरक्षा यंत्रणा आणखी सतर्क झाल्या आहेत.

राजस्थान पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितल्यानुसार, ऑपरेशन सिंदूरदरम्यान विशाल यादवने लष्करी कारवाईशी संबंधित संवेदनशील माहिती शत्रू देशाला पुरविली.

विशाल यादवची अटक झाल्यानंतर त्याला आता जयपूरमधील केंद्रीय चौकशी केंद्रात ठेवण्यात आले आहे. राष्ट्रीय यंत्रणा आणि लष्कराच्या विभागासह भारतीय गुप्तचर संस्थांकडून त्याची चौकशी केली जात आहे. यादवने किती माहिती पुरवली आणि यात आणखी किती लोक सामील आहेत, हे शोधण्याचे काम यंत्रणांकडून केले जाणार आहे.

# नापिकीला कंटाळून तरुण शेतकऱ्याने जीवन संपविले

लातूर, दि. २६ प्रतिनिधी

निलंगा तालुक्यातील आंबेगाव (मसलगा) येथील शेतकरी मच्छिंद्र गोरोबा सुरवसे (वय ३८) यांने नापिकीला कंटाळून शेतातील चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आपले जीवन संपविले. ही घटना बुधवारी रात्री उघड झाली. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी असा परिवार आहे. परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, मच्छिंद्र यांना एकत्रित कुटुंबातील अंबुलगा मेन शिवारातील सर्व्हे नंबर २८ मध्ये ७ एकर जमीन आहे. त्यांच्या वाटणीला २ एकर जमीन येते. आज सकाळी घटनेची माहिती मिळताच गावाचे सरपंच, उपसरपंच, चेअरमन आदीसह नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती तलाठी व पोलिसांना देण्यात आली. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# गुजरातमध्ये आपला झटका!

## एक आमदार वाढत नाही तोच दुसरा सोडून गेला

बोटाद, दि. २६ वृत्तसंस्था

गुजरातमध्ये नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकीत आपच्या उमेदवाराचा विजय झाला आहे. त्याने आमदारकीची शपथही घेतली नाही तोच आपच्या दुसऱ्या आमदाराने पदांचा राजीनामा दिला आहे. बोटादचे आमदार उमेश मकवाना यांनी आप हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सिद्धांतावरून भटकला असल्याचा आरोप करत पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला आहे. तर दुसरीकडे आपने पक्षविरोधी कारवायांचा ठपका ठेवत मकवाना यांना पाच वर्षांसाठी पक्षातून निलंबित केले आहे.



मकवाना यांनी राजीनामा देताना मी पक्षाचा कार्यकर्ता म्हणून काम करत राहीन. मी बोटाडमधील लोकांमध्ये जाईन. काही लोकांना भेटून वेगळा पक्ष स्थापन करायचा की नाही यावर चर्चा करेन, असेही म्हटले आहे. तर प्रदेश अध्यक्ष इसुदान गढ़वी यांनी मकवाना यांच्यावर कारवाई केल्याचे जाहीर केले आहे. मकवाना यांनी मुख्य प्रतोद आणि राष्ट्रीय संयुक्त सचिव पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांना पक्षातून निलंबित करण्यात आले आहे.

ज्या काळात गुजरातमध्ये 'आप'ला कोणीही ओळखत नव्हते, त्या काळात मी सत्ताधारी भाजप सोडून आम आदमी पक्षात सामील झालो होतो. परंतू, पक्ष आंबेडकरांच्या सिद्धांतावरून भटकला आहे. राजीनाम्याचे हेच कारण असल्याचे मकवाना यांनी स्पष्ट केले आहे. पक्षाविरुद्ध बंडखोरी आणि राष्ट्रीय नेत्यांवर बोट ठेवल्याने आपने ही कारवाई केली आहे.

आपची कारवाई झालेली असली तरी त्यांची आमदारकी कायम राहणार आहे. यामुळे बोटादमध्ये पोटनिवडणूक लागणार नाही. यापूर्वी भूपत भयानी यांनी राजीनामा देऊन भाजपमध्ये प्रवेश केला होता. आता मकवाना यांनी पक्षातील पदांचा राजीनामा दिला आहे.

# उत्तराखंडमध्ये प्रवाशांनी भरलेली बस पूर आलेल्या नदीत कोसळली

रुद्रप्रयाग, दि. २६ वृत्तसंस्था

उत्तराखंडमधील रुद्रप्रयाग जिल्ह्यातील घोलतीर येथे आज सकाळी प्रवाशांनी भरलेली बस अलकनंदा नदीत कोसळून भीषण अपघात झाला आहे. मुसळधार पावसामुळे नदीला पूर आला असल्याने अपघाताची तीव्रता अधिकच वाढली आहे. बद्रिनाथ राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या या अपघाताबाबत माहिती मिळाल्यानंतर प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली असून, मदत आणि बचाव कार्य सुरू केलं आहे.

या अपघाताबाबत माहिती देताना आपत्ती व्यवस्थापन विभागाचे सचिव विनोद कुमार सुमन यांनी सांगितले की, अपघातग्रस्त वाहन हे टेम्पो ट्रॅव्हलर असण्याची शक्यता आहे. ही गाडी प्रवाशांना घेऊन जात होती. तसेच या गाडीमधून १८ ते २० प्रवासी प्रवास करत असल्याची प्राथमिक माहिती आहे. आपत्ती व्यवस्थापनाचं पथक घटनास्थळी पोहोचलं असून, आथापर्यंत पाच ते सात प्रवाशांना वाचवण्यात आलं आहे. तर एका व्यक्तीचा मृतदेह हाती लागला आहे.

दरम्यान, अपघातात जखमी झालेल्यांमध्ये ९ वर्षांच्या दोन मुलांचा समावेश असून, अपघातग्रस्त वाहनामधील १० जण अद्याप बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे.

# 'येरे येरे पैसा ४' मध्ये काम करण्याची सलमानची इच्छा

'येरे येरे पैसा' आणि 'येरे येरे पैसा २' या यशस्वी चित्रपटांनंतर आता प्रेक्षकांच्या मनोरंजनाची ट्रिपल डोस घेऊन 'येरे येरे पैसा ३' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या बहुप्रतीक्षित चित्रपटाचे टायटल साँग नुकतेच एक भव्य सोहळ्यात लाँच करण्यात आले. विशेष म्हणजे या सोहळ्याला बॉलिवूडचा दबंग अभिनेता सलमान खान आणि महेश मांजरेकर याची विशेष उपस्थिती होती, ज्यामुळे कार्यक्रमाचे आकर्षण अधिकच वाढले. या वेळी सलमान खान याने गाण्याचे कौतुक करत चित्रपटाच्या संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या.



या जबरदस्त गाण्यात वैशाली सामंत आणि आदर्श शिंदे यांच्या दमदार आवाजाने अधिकच रंगत आणली असून अमितराज यांनी संगीताला उर्जा आणि झिंग दिली आहे. या चित्रपटातील इतर गाण्यांना पंकज पडघन यांचे संगीत लाभले आहे. तर हे गाणे सचिन पाठक (यो) यांनी लिहिले आहे. 'येरे येरे पैसा ३' या गाण्यातील सर्व कलाकारांची एनर्जी पाहून यंदाचा भाग आणखीन धमाल आणि मनोरंजनाने भरलेला असणार, याबद्दल कोणतीही शंका नाही.

या गाण्याबद्दल आणि चित्रपटाबद्दल सलमान खान म्हणतो, '' हे गाणे अप्रतिम झाले आहे. गाण्यावरूनच चित्रपट काय जबरदस्त असेल याचा अंदाज येतोय. चित्रपटाची संपूर्ण टीम जबरदस्त आहे. या सगळ्यांना माझ्याकडून खूप शुभेच्छा आणि या चित्रपटाच्या चौथ्या भागात मला सहभागी व्हायला नक्कीच आवडेल.''

**लोकरंजन**

**सिनेरंग**

## शशिकांत धोत्रे निर्मित आणि दिग्दर्शित "सजना" सिनेमाचा हिृदयस्पर्शी ट्रेलर प्रदर्शित

प्रेमाच्या गंधाने सुरू झालेली एक सुंदर गोष्ट, जेव्हा नात्यांमध्ये गुंतते तेव्हा त्या निरागस प्रेमातूनच जन्म होतो एक आगीत भडकणारा सुड! मराठी चित्रपटसृष्टीत एक वेगळीच लाट घेऊन येत आहे "सजना" चित्रपटाचा हा ट्रेलर. जो नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. विशेष म्हणजे ट्रेलर हा केवळ एक साधा रिलीज नसून, तो एक खास प्रसंग ठरला आहे. या ट्रेलरचे थेट प्रक्षेपण मराठीतील विविध मनोरंजनशी संबंधित चॅनेलच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर लाईव्ह स्ट्रीम करण्यात आला. म्हणजेच सजना चित्रपटाचा ट्रेलर मराठी एंटरटेनमेंट डिजिटल मीडिया नेटवर्कवर एकत्रितपणे थेट प्रक्षेपित करण्यात आला. ह्या ट्रेलर मध्ये सुंदर प्रेमाची सुरुवात, विचारसरणीतील अंतर, भावनिक संघर्ष, सुडाची भावना आणि प्रत्येक वळणावर धक्कादायक ट्विस्ट आपण पाहू शकतो.



शशिकांत धोत्रे आर्ट निर्मित आणि प्रस्तुत "सजना" सिनेमातील ह्या ट्रेलर मध्ये नायक आणि नायिकेच्या आयुष्यात येतात अनेक संघर्ष. मैत्रीचं प्रेमात रूपांतर, प्रेमाचं तुटणं आणि त्यातून उगम पावणारा सुड हे सगळं अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आलं आहे. प्रत्येक वळणावर गोष्ट बदलते, पात्रांचे रंग बदलतात आणि कथा एका अनपेक्षित शेवटाकडे प्रवास करते. शेवट अकल्पनीय आहे. जेव्हा प्रेक्षकांना वाटतं की सर्व काही संपलं, तेव्हाच ही कथा घेते एक अनपेक्षित वळण, जे तुमचं मन सुन्न करतं. त्यामुळे एक विलक्षण सिनेमॅटिक अनुभव सिनेप्रेमींना ह्या चित्रपटाच्या माध्यमातून मिळणार आहे. 'सजना' या चित्रपटाची निर्मिती स्वतः शशिकांत धोत्रे ह्यांनी केली आहे तर कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन सुद्धा शशिकांत धोत्रे ह्यांनी केलं आहे. छायाचित्रण रणजित माने ह्यांनी केलं आहे. संगीत ओंकारस्वरूप ह्यांचं असून सिनेमातील रोमान्टिक गाणी भुंगा म्युझिकच्या बॅनरखाली बनले आहेत. "सजना" हा सिनेमा आपल्या जवळच्या चित्रपटगृहात २७ जून २०२५ पासून प्रदर्शित होणार आहे !!

## सन मराठी' वाहिनीवर मंतरणार प्रेमाची जादू 'तुझ्यासाठी तुझ्यासंगं'



**टेलीरंग**

'सन मराठी' वाहिनीवर लवकरच तुझ्यासाठी तुझ्यासंगं या नव्या मालिकेतून एका नव्या प्रेमकथेचा रोमांचक प्रवास सुरु होतोय. पहिल्या नजरेतल्या प्रेमाची नाजूक, निरागस आणि मनाला स्पर्श करणारी एक अनोखी कहाणी या मालिकेतून आपल्या भेटीस येणार आहे. नुकताच या मालिकेचा प्रोमो प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांनी या प्रोमोला भरभरून, उत्स्फूर्त, सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. तेजा (अभिनेता अशोक फळदेसाई) आणि वैदेही (अभिनेत्री अनुष्का गीते) ही जोडी अनुक्रमे नायक नायिकेच्या रुपात या मालिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहे. पहिल्या नजरेतलं प्रेम खूप वेगळंच असतं. जिच्यावर प्रेम जडलंय तिला अंदाजही नसताना त्या व्यक्तीसाठी झुरत राहण्यात देखील मन आनंदी असतं. तेजाचं सुद्धा असंच काहीसं झालेलं आहे. तो पहिल्या नजरेत वैदेहीच्या प्रेमात पडला पण वैदेहीला या गोष्टीची अजिबात कल्पना नाही. तेजाच्या प्रेम व्यक्त करण्याच्या रांगड्या आणि अनोख्या पद्धतीमुळे वैदेहीच्या मनात गैरसमज निर्माण होतो पण मालिका पाहणारी तरूण मात्र नक्कीच फिदा होईल. जिद्दी, प्रेमळ, बंडखोर पण मनाने अत्यंत सच्चा अशा विरोधाभासाने भरलेला तेजा आणि ठाम, आत्मविश्वासू आणि बेधडक वैदेही असा प्रेमाचा हा सामना रंगणार आहे.प्रोमोमध्ये तेजाचं रांगडं व्यक्तिमत्त्व, आणि वैदेहीच्या प्रेमासाठी त्याची धडपड पाहून प्रेक्षक मालिका पाहण्यासाठी उत्सुक झाले आहेत.लवकरच प्रेक्षकांना प्रेमाची नवीन परिभाषा 'तुझ्यासाठी तुझ्यासंग' मालिकेतून पाहायला मिळणार आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# रील बनवताना १३व्या मजल्यावरून पडून २० वर्षीय तरुणीचा मृत्यू

बंगळुरू, दि. २६ वृत्तसंस्था

बंगळुरूमध्ये एका बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या १३ व्या मजल्यावरून पडून एका २० वर्षीय तरुणीचा मृत्यू आहे. संबंधित तरुणी रात्री उशीरा आपल्या मित्रांसोबत पार्टी करायला गेली होती. त्यानंतर तिथेच तरुणीने रील बनवायला सुरुवात केली. परंतु, अचानक तोल गेल्याने ती लिफ्टच्या शाफ्टमध्ये पडली. या घटनेत तरुणीचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात अपघाती मृत्युची नोंद करण्यात आली असून पोलिसांनी पुढील तपासाला सुरुवात केली आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मयत तरुणी बिहारची रहिवासी असून एका शॉपिंग मार्टमध्ये काम करायची. घटनेच्या दिवशी ती आपल्या मित्रांसोबत परिसरातील बांधकामाधीन इमारतीच्या १३ व्या मजल्यावर पार्टी करायला गेली होती. त्यावेळी रील बनवत असताना ती लिफ्टच्या शाफ्टमध्ये पडली आणि तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर तिचे मित्र घटनास्थळावरून पळून गेले.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मयत मुलगी मित्रांसोबत पार्टी करण्यासाठी बांधकामाधीन इमारतीच्या १३व्या मजल्यावर गेली असताना तिच्यासोबत अशी दुर्दैवी घटना घडली. याप्रकरणी परप्पाना अग्रहारा पोलीस ठाण्यात अपघाती मृत्युची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# धर्मशालामध्ये पुरात दोघांचा मृत्यू

धर्मशाला, दि. २६ वृत्तसंस्था

नैऋत्य मान्सून पश्चिम हिमालयीन क्षेत्रात आपले रौद्र रूप दाखवत आहे. हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. हिमाचलच्या कुलू आणि धर्मशाला जिल्ह्यांमध्ये पाच ठिकाणी ढगफुटी होऊन आलेल्या पुरात दोन जणांचा मृत्यू झाला आहे, तर ११ जण बेपत्ता आहेत. उत्तराखंडमध्ये केदारनाथ धाम यात्रा मार्गावर मोठे भूस्खलन झाले आहे. चीन सीमेला जोडणाऱ्या रस्त्यावर दरड कोसळल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. जम्मूच्या कटरा येथील माता वैष्णोदेवी धाम यात्रा मार्गावरील हिमकोटी येथे दरड कोसळल्याने वाहतूक १० तास बंद होती.

# सर्व सरकारी कामात कन्नड भाषेचा वापर अनिवार्य

## कर्नाटकातील काँग्रेस सरकारचा मोठा आदेश

बंगळुरू, दि. २६ वृत्तसंस्था

गेल्या काही काळापासून महाराष्ट्रात मराठीप्रमाणेच कर्नाटकात कन्नड भाषेबाबत बराच वाद सुरू आहे. अशातच, कर्नाटकातील सीएम सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वातील काँग्रेससरकारने सर्व सरकारी विभाग, महामंडळे, मंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकृत कामात कन्नड भाषेचा सक्तीने वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्याच्या मुख्य सचिव शालिनी रजनीश यांनी बुधवारी याबाबतचे परिपत्रक जारी केले. कन्नड भाषा व्यापक विकास कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्यामुळे आणि सार्वजनिक जीवनातून कन्नड भाषा हळूहळू नाहीशी होण्याच्या भीतीने सरकारने हे पाऊल उचलले आहे. मुख्य सचिवांनी जारी केलेल्या या परिपत्रकात स्पष्ट केले आहे की, आता सर्व प्रकारचे सरकारी आदेश, नियुक्त्या, बदल्या, रजा-संबंधित आदेश, सूचना, कार्यालयीन पत्रव्यवहार, अंतर्गत फाइल नोट्स आणि रेकॉर्ड बुक इत्यादी केवळ कन्नड भाषेत तयार करावेत. केवळ केंद्र सरकार, इतर राज्ये आणि न्यायालयांशी केलेल्या पत्रव्यवहाराला या नियमातून सूट देण्यात आली आहे.

यासोबतच कार्यालयांच्या नामफलकांवरही कन्नड भाषेतच छापणे अनिवार्य आहे. याशिवाय, प्राप्त झालेल्या सर्व पत्रांना आणि अर्जांना केवळ कन्नडमध्येच उत्तर देणे आवश्यक असेल. कायदेविषयक कामकाज आणि सर्व प्रकारची अधिकृत कागदपत्रेदेखील कन्नडमध्ये तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या सूचनांचे पालन न केल्यास संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर वैयक्तिकरित्या शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असा इशाराही परिपत्रकात देण्यात आला आहे.

## बीडमध्ये भीषण अपघात

# हेल्मेटची क्लिप घुसून प्राध्यापकाचा मृत्यू

बीड, दि. २६ प्रतिनिधी

बीड-परळी राष्ट्रीय महामार्गावर शिरसाळा गावाजवळ एका दुचाकी अपघातात प्रा. अमोल लव्हाळे यांचा मृत्यू झालाय. दुचाकीवरून जात असताना एका दुचाकीची जोरदार धडक बसल्यामुळे ते समोर चाललेल्या हायवावर आदळले. या धडकेत ते गंभीर जखमी झाले आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. ही दुर्घटना आज सकाळच्या सुमारास घडली. अमोल लव्हाळे हे आपल्या दुचाकीवरून जात असताना मागून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर त्यांचे वाहन नियंत्रणात राहिले नाही आणि समोर चाललेल्या हायवावर जोरात आदळले. लव्हाळे यांनी सुरक्षिततेसाठी हेल्मेट घातले होते. मात्र प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, हेल्मेटची क्लिप त्यांच्या मानेत घुसल्याने गंभीर रक्तस्त्राव झाला. हीच जखम त्यांच्या मृत्यूचे कारण ठरली, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे.अपघातानंतर लव्हाळे यांना तातडीने शिरसाळा येथील खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तिथे आवश्यक उपचार न झाल्याने त्यांना पुढे परळी येथील दुसऱ्या खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र तेथे पोहोचेपर्यंत उशीर झाल्यामुळे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# पत्नीचा बांबूने वार करून खून

## पती दोन मुलांना घेऊन पसार

सांगली , दि. २६ प्रतिनिधी

कौटुंबिक वादातून बांधकाम कामगार पतीने पत्नी शिलवंती पिंटू पाटील हिचा डोक्यात बांबूने वार करून निर्घृण खून केला. गुरूवारी पहाटे हा प्रकार घडला. खुनानंतर पती पिंटू पाटील हा दोन लहान मुलांना घेऊन पसार झाला. संजयनगर पोलिसांना माहिती मिळताच पिंटू पाटील याच्या शोधासाठी पथक मंगळवेढा परिसरात रवाना केले. पिंटू पाटील हा मूळचा मंगळवेढा तालुक्यातील हुलजंती गावचा रहिवासी आहे. काही वर्षापासून तो सांगलीत राहतो. गवंड्याच्या हाताखाली किंवा मजुरीची कामे तो करत होत. काही दिवसांपासून पिंटू आणि शिलवंती यांच्यात किरकोळ कारणांवरून सतत वाद होता. या वादास कंटाळून शिलवंती दि. १३ जून रोजी घर सोडून निघून गेली होती. पिंटूने संजयनगर पोलिस ठाण्यात ती बेपत्ता झाल्याची फिर्याद दिली होती. शिलवंती ही पुण्याजवळ बहिणीकडे गेली होती. शनिवारी ती पतीकडे परत आली होती. त्यानंतर दोघांमध्ये पुन्हा वादावादी सुरू होती. शिलवंती परत आल्याचे संजयनगर पोलिसांना सांगितले नव्हते. गुरूवारी पहाटेच्या सुमारास पिंटूने बांबूने शिलवंतीच्या डोक्यात वार करून तिचा खून केला. त्यानंतर दोन्ही मुलांना घेऊन शेडला बाहेरून कडी लावून तो पसार झाला. पिंटूने पलायन केल्यानंतर सांगोल्यातील ओळखीच्या व्यक्तीला हा प्रकार सांगितला. व्यक्तीने संजयनगर पोलिसांना कळवले. त्यानंतर संजयनगर पोलिसांनी बांधकाम सुरू असलेले ठिकाण शोधले. शेडची कडी काढल्यानंतर आतमध्ये शिलवंती पाटील ही मृतावस्थेत पडल्याचे आढळले.

महासागर PALGHAR RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, **Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK, Executive Editor- Shashi Karpe**

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक : **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) कार्यकारी संपादक - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com**
RNI No.: MAHAMAR/2014/62313